
# वालावल दर्शन


म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सं. नं. 234

REFBK-0010198

गुं. फ. आजगांवकर

दक्षिण कोंकणांतील इतिहासप्रसिद्ध गांवाची ओळख

# वालावल-दर्शन

वि.
अनुक्रम
क्रमांक

REFBK-0010198

REFBK-0010198

किमत दोन रुपये

: प्रकाशक :

**फ. र. प्रभु**

मु. पो. आजगांव,

ता. सावंतवाडी

जि. रत्नागिरी

✦

: लेखक :

**गं. फ. आजगांवकर**

३३६/२ भाई जीवन लेन,

मुंबई २

✦

सर्वाधिकार सुरक्षित

✦

। कव्हर ।

**श्री. एस्. बी. परुळकर**

लिथो आर्टिस्ट यांच्या सौजन्यानें

✦

: मुद्रक :

**म. बा. जोशी**

ज्ञानविलास, प्रेस,

२७ बुधवार, पुणें २

✦

प्रस्तुत ग्रंथाचें सर्व उत्पन्न वालावल येथील श्रीदेव रामेश्वर देवालयाच्या जीर्णोद्धारासाठीं दिलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम 23282 वि: ...
क्रमांक ... 2338 ...... नों: दि: 2/5/5...

## अर्पण पत्रिका

*आमचे सुहृद व आशियांतील*
*सुप्रसिद्ध ' थि ग्रेट रॉयल सर्कस ' चे*
*मालक नि चालक श्रीमान्*
**सीतारामपंत वालावलकर व नारायणराव वालावलकर**
*या उभयतांस त्यांच्या अंगांतील*
*उद्योगप्रियता, चिकाटी, महत्त्वाकांक्षा, साहस*
*आणि वालावल गांवाबद्दल जिव्हाळा*
*या गुणांवर लुब्ध होऊन हा*
*ग्रंथ समर्पण केला आहे.*

—गुं फ. आजगांवकर

# लेखकाचे दोन शब्द



'वालावल–दर्शन' ह्या ग्रंथामुळें दक्षिण कोकणांतील एका इतिहास-प्रसिद्ध गांवाचा परिचय महा-राष्ट्राला होईल अशी मला उमेद आहे. आजगांवदर्शन आणि कुडाळ-देशकर ह्या माझ्या दोन्ही ग्रंथांतून कोंकणचीं ऐतिहासिक साधनें मीं संग्रहित केलीं आहेत. त्याच उद्देशानें टाकलेलें हें पुढचें पाऊल ! वाढत्या महागाईमुळें ग्रंथाचा संक्षेप करणें जसें भाग पडलें तसेंच बरीच महत्त्वाची माहिती गाळावी लागली. पण त्याला इलाज नव्हता.

वालावल गावीं जाऊन येण्याचा प्रवासखर्च व स्थानिक छायाचित्रांसाठीं आलेला सर्व खर्च श्रीमती राधाबाई तुकाराम देसाई यांनीं केला. याबद्दल त्यांना धन्यवाद ! ग्रंथलेखनाच्या कामीं सौ. विजया आजगांवकर, श्री. स. फ. आजगांवकर, श्री. बाबुराव राजीवडेकर, श्री. तुकाराम सहदेव देसाई, श्री. दि. रा. देसाई यानीं मला मदत केली.

ग्रंथप्रकाशनाचें सर्व श्रेय वालावल गांवचे एक सुविद्य ग्रामस्थ श्री. सीतारामपंत गोविंद वालावलकर B. A. ह्यांना आहे. त्यांनीं वेळोवेळीं दिलेल्या सहकार्यामुळें हें कार्य लवकर पुरें झालें. धि ग्रेट रॉयल सर्कसचे मालक श्री. सीतारामपंत वालावलकर व श्री. नारायणराव वालावलकर ह्यांनीं प्रस्तुत ग्रंथप्रकाशनाचा आर्थिक भाग स्वतः स्वीकारून आपल्या गांवाबद्दल त्यांना असलेली आत्मीयता व अभिमान व्यक्त केला याबद्दल त्यांना धन्यवाद ! श्री. वासुदेव सीताराम वालावलकर यांनीं वालावल गांवचा मोठा नकाशा

मेहनतीनें तयार करून दिला. ‘मठ गांवचा शिलालेख’ हा रावबहादूर बांबर्डेकरांचा ग्रंथ, मठ गांवचा शिलालेख, हें अ. ब. वालावलकर यांचें टीकात्मक पुस्तक, आणि ‘श्रीदेव नारायण वालावली’ ही गौडब्राम्हण मासिकांतील श्री. अ. रा. देसाई यांची प्रदीर्घ लेखमाला यांतून वालावल येथील श्रीदेवनारायण देवस्थानची विपुल ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध झालेली आहे. जिज्ञासूंनीं ती अवश्य वाचावी. वरील लेखकांच्या लिखाणाचा मी जरूरीपुरता उपयोग केलेला असून त्याबद्दल ग्रंथकर्त्यांचा मी आभारी आहें.

देवांचे फोटो झारापकर फोटो स्टुडिओ सावंतवाडी यांनीं घेतले आहेत.

रामनवमी, २९ मार्च १९५८ गुं. फ. आजगांवकर

स्थळप्रत. अनुक्रमांक दि: नों: दि:

# विषय-प्रवेश


रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिणेस आजच्या कुडाळ महालांत कुडाळ-पासून सहा मैलांवर कुडाळ कवठी व कुडाळ पाट ह्या मार्गांवर ‘वालावली’ किंवा ‘वालावल’ ह्या नांवाचा एक निसर्गरम्य व इतिहासप्रसिद्ध गांव आहे. सुप्रसिद्ध परदेशी लेखक टी. बी. जर्विस यानें म्हटल्याप्रमाणें चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं चंद्रभान व सूर्यभान प्रभुदेसाई ह्या नांवाचे दोन महा-प्रतापी कुडाळदेशकर गौडब्राह्मण राजे होऊन गेले. प्राचीन कुडाळ प्रांतावर त्यांची अधिसत्ता होती. ह्या बंधुद्वयांची ‘वालावल’ ही जन्मभूमि असल्यानें ह्या त्यांच्या गांवाला आणि श्रीदेव नारायण ह्या त्यांच्या कुलदैवताला राजकीय महत्त्व आलें होतें. निदान अकराव्या शतकापासून श्रीदेवनारायण हें देवस्थान ह्या गांवांत अस्तित्वांत असून चंद्रभान व सूर्यभान प्रभुदेसायांनीं त्याला आजचें बादशाही वैभव प्राप्त करून दिलें असें ऐतिहासिक उल्लेखांवरून दिसतें. त्यांनीं ह्या व इतर देवस्थानांची जी कायमची व्यवस्था लावून ठेवली आहे त्याची अनेक लेखकांनीं आपापल्या पुस्तकांतून प्रशंसा केलेली दिसते.

वालावल येथील देवस्थान व्यवस्थेचें इनामरजिस्टर छापील तीनशें पृष्ठांच्या ग्रंथाएवढें मोठें आहे. अशा प्रकारची देवस्थान–व्यवस्था ह्या भागांत दुसरीकडे पहावयास सांपडत नाहीं. राजे प्रभुदेसाई यांचा ह्या वालावल गांवांत, कुळाचें रान ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भागांत राजवाडा होता व घोड्यांच्या पागा होत्या असें सांगतात. त्या काळीं बांध-लेल्या दोन दगडी वाटा मात्र आज दृष्टीस पडतात. श्रीदेव नारायण देवा-लयांतील प्रेक्षणीय कोरीव काम पाहिल्यावर ज्याचें मन थक्क होणार नाहीं असा माणूस विरळाच ! देवस्थानकडे जडजवाहीर व रोकड पैसा मिळून एक लाखाहून अधिक धन असून, त्याला हात लावण्यास कोणीहि धजत नाहीं. हें सारें श्रीदेवनारायणाचें आहे, अशी लोकांची दृढ श्रद्धा आहे. ‘कोंकणाख्यान’ च्या कर्त्यानें ह्या देवस्थानबद्दल पुढील उद्गार चार शतकांपूर्वी काढलेले आहेत ते असे :—

"देशाचें मुख मण्डन ।। वालावली मुख्य प्रधान ।। तेथील सांगेन महिमान ।। चित्त देवोनि परिएसीं ।। ते क्षेत्रीं देव श्रीनारायण ।। उत्कृष्ट पूजा नित्यपुराण ।। हरिकथा आणि जागर ।। सदा सर्वदा होतसे ।। भेरी दुंदुभीचा गजर ।। ध्वज पताका पल्लव छत्र ।। ढोल चामरें अपार ।। चमत्कार नानापरी ।। टाळ मृदंग शंख मोहरीं ।। वाद्यें वाजती कुसरी ।। क्षेत्र महिमा महाथोरी ।। कोणी सरी न पावत ।। महाजागृत देवस्थान ।। तेथील न वर्णवे महिमान ।। जमदग्नि वत्सगोत्री ब्राह्मण ।। तया क्षेत्रामाझारी ।। ( कोंकणाख्यान )

गांवाची मूळ वसाहत प्रथम दक्षिण सरहद्दीला आज जेथें रामेश्वराचें स्वयंभु जागृत देवस्थान आहे, त्या भागांत होती. परंतु पुढच्या कालांत म्हणजे तेराव्या शतकापासून उत्तर सरहद्दीवर कर्ली नदीच्या कांठानें वसाहत झाली. चौदाव्या शतकांत प्रभुदेसायांची सत्ता विकसित झाल्यावर त्यांचें निवासस्थान असलेल्या ह्या उत्तरभागाचा विकास होणें क्रमप्राप्त होतें.

१७ व्या शतकांत आरमाराला महत्व आलें आणि कर्ली नदींतून



आरमारी जहाजें फिरूं लागलीं. कांहीं काल वालावल हा आरमारी तळ होता. १८ व्या शतकानंतर ह्या भागाला व्यापारी महत्व आलें. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ह्या गांवांतून रा. ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले ह्या उद्योगपतीचा जन्म झाला आणि त्यांनीं आपल्या संपत्तीचा उपयोग ह्या गांवच्या धार्मिक, शैक्षणिक व शेतिविषयक विकासासाठीं केला इतकेंच नव्हे तर महाराष्ट्रांतील प्रमुख शहरांतून शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठीं टोपीवाले घराण्यानें लक्षावधि रुपयांचा दानधर्म केलेला आहे. त्यांच्यामुळें ह्या गांवच्या कीर्तीत भर पडली. श्री. टोपीवाले यांनीं बांधलेल्या इंग्रजी, मराठी शाळा, ग्रंथसंग्रहालय, अन्नछत्र वगैरे संस्था आज चालू आहेत.

गांवच्या दक्षिणेस रामेश्वराचें सर्वांत प्राचीन देवस्थान असून

तें जागृत आहे. गांवांत वाघाची शिकार केल्यावर व्याघ्रांबर त्या देवालयांतच आणून ठेवावें असा दंडक आहे. दुसरें जागृत देवस्थान श्रीदेवी माऊलीचें असून तें वालावल चेंदवण सरहद्दीवर आहे. ह्या देवीस सहस्रावधि लोक नवस करतात आणि आपल्या भक्तांना ती पावते.


प्राचीन काळीं वालावल हा गांव अत्यंत सुपिक, पाणथळ व समृद्ध होता. गांवांत सात भव्य बंधारे घालून शेतीसाठीं पाण्याची व्यवस्था केलेली होती. जिकडे तिकडे हिरवींगार शेतें, फळाफुलांच्या बागा व सुखवस्तु लोक होते हें आजतागायत चालत असलेल्या वसंतोत्सवाच्या रुढीवरून दिसून येतें. पाणथळ प्रदेश ह्या अर्थानें कुडाळी भाषेंत 'वोलच् वल्–वोल:वल्–वालावल' असा शब्दप्रयोग गांवचें चालू नांव रूढ होतांना झाला असावा.

गांवच्या पश्चिम हद्दीनें कुपीचा प्रख्यात डोंगर असून, ह्या डोंगरांत प्रचंड प्रमाणांत खनिज संपत्ति आहे. आज फक्त त्यांतील सिलिका तेवढी निर्यात केली जाते.

गांवचा उत्तरभाग अत्यंत सुपीक व बारमाही पिकांचा असल्यानें लोकवस्ती दाट आहे. दक्षिण भाग भरडी आणि डोंगराळ असल्यानें आज मागासलेला आहे. ह्या भागाच्या सुधारणेकडे लक्ष देणें जरूर आहे.

गांवांतील लोकांचा आजचा आहार अत्यंत साधा व रहाणी गरिबीची आहे. आहारांत मुख्यतः कुळीथ, नाचणी, भात, हरीक हीं धान्यें असून कांहीं लोक मस्त्याहारी आहेत. नारळ, सुपारी, भात, लाकडांचे भारे विकणें हीं उपजीविकेचीं साधनें असून अल्पप्रमाणांत व्यापार चालतो. आजच्या महर्गतेंत ह्या गांवांतील कुटुंबें हलाखींत जगत आहेत. दक्षिण कोंकणांतील इतर गांवाप्रमाणेंच ह्या गांवाचें जीवन आज मुंबईंतील कमाईवर अवलंबून आहे.

विकास योजनेसाठीं हा गांव मध्यवर्ति असून दळणवळणास जलमार्ग उपलब्ध आहे. भरपूर मानवी बळ आणि सोईवार सडका आहेत. मुबलक खनिज संपत्ति आहे. दक्षिण कोंकणच्या विकास योजना अमलांत येतांना ह्या गांवचा त्यांत अंतर्भाव केला जाईल अशी आशा वाटते.


वालावली
● देऊळ
+ शाळा
○ तलाव

## गांवच्या सीमा

उत्तरेस कर्ली नदी व पलिकडे काळसें धामापूर, पूर्वेस मौजे नेरूर, दक्षिणेस मौजे तेंडोली, नैऋत्येस कसबे पाट, पश्चिमेस व वायव्येस मौजे चेंदवण.

## गांवांतील मुख्य भाग

१ वाडी वोडोसें. २ मठ. ३ देऊळवाडा. ४ मुडयाचा कोन. ५ बाजारवाडा. ६ हरिजनवाडा. ७ दारवळ. ८ राऊळवाडा. ९ गांवधड. १० घाडीवाडा. ११ न्हावीवाडा कोडबस. १२ करमळी ऊर्फ बिजोळें. १३ बांधकोंड. १४ पोडोस. १५ हुमरमळा. १६ गाळवण. १७ परकर वाडा.

## जमिनीची विल्हेवारी

| | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| क्षेत्र | ३१८९---० | ३६८४-११-७ |
| वहिवाटींत | १७३८-१३॥ | २३९३--०-० |
| इनामी | ७११---० | १२९१--८-० |
| पोट खराबा | ४६४--६ | |
| नद्या नाले | ७१--० | |
| देवरहाटी | १--३ | |
| गांवठण | २-१० | |
| तलाव | ७-३० | |
| सडका | ५-२६ | |
| मसनवट | १-११ | |
| शाळा | ५-३० | |
| धर्मशाळा | ०--४ | |
| फॉरेस्ट | १८०—० | |

गांवांतील अर्धी जमीन भरडी असून जिरायत $\frac{3}{4}$ व बागायत $\frac{1}{4}$ आहे. इनाम जमीन फक्त देवस्थानला असून तिच्यावर फक्त लोकलफंड आकारला जातो. उरलेल्या सर्व आकारावर रुपयास तीन आणे लोकलफंड घेतला जातो.

## लोकसंख्या

पुरुष १२००, स्त्रिया १५००, मुलें १३०० अशी सुमारें चार हजार आहे.

## पाणवठे

(१) श्रीदेव नारायणाच्या देवळाजवळ एक सुंदर आणि विस्तीर्ण



तलाव आहे. तलावांतील पाण्याचा उपयोग मुख्यत: पिण्यासाठीं व शेतीसाठीं करतात. तलावाचें पाणी कधींहि खराब होत नाहीं असा लौकिक आहे. तलावाच्या पूर्वेकडच्या बाजूस एक पाणी नेण्याची मूस असून गांवांतील जिरायती जमिनीस पाण्याचा उपयोग होतो. तलावाच्या उत्तर बाजूस मध्यावर गाळ काढून टाकण्यासाठीं एक मूस ठेवलेली आहे. ती उघडल्यावर पाणी रहात नाहीं. ह्या तलावाच्या तीन बाजू दगडी पायऱ्यांनीं उत्तम प्रकारें बांधून काढलेल्या आहेत. ह्या तलावाचें पाणी ( उन्हाळीं शेतीस ) सुमारें २०० एकर जमीनीस पुरतें. रामनवमीनंतर त्या तलावाच्या पाण्याचा जमीन भिजवणीसाठीं उपयोग होतो. वालावलींतील हा भाग मुखत: शेतीचा आहे. हल्लीं ह्या तलावांत पुष्कळच त्रिखल भरलेला आहे. त्यामुळें मृगापूर्वी एक महिना तळ्यांतील पाणी आटून जातें. कै. श्रीमंत नारायणराव देसाई टोपीवाले यांनीं हजारों रुपये खर्च करून ह्या तलावाची दुरुस्ती केली होती.

## तलावाची आख्यायिका

सर्व प्रकारच्या दैनंदिन कामासाठीं ह्या तलावाचा उपयोग केला जातो. असें असूनहि हें पाणी पिण्यासाठीं व देवपूजेसाठीं वापरलें जातें. ह्या पाण्यास तीर्थाप्रमाणें मान आहे. पाणी स्वच्छ रहावें म्हणून कांहीं योजना ठरविल्या तर पाणी तत्काळ बिघडतें असें सांगतात. ढोपरभर पाण्यांतसुद्धां बाहेरगांवचे लोक बुडतात. त्याला मारा झाला असें म्हणतात. तलावाच्या पायरीवर एक शंकराची पिंडी व बाजूलाच पाषाणाची मूर्ति आढळते.

(२) दारवळवाडीस लागून जाणाऱ्या वहाळास एक हंगामी बांध घालून तलाव बांधण्यांत येतो. त्याचा शेतीस व बागायतीस उपयोग होतो. ह्या तलावाची दुरुस्ती होणें आवश्यक आहे.

(३) गावडोबाचा तलाव ह्या नांवाचा एक तलाव हुमरमळा वाडीस लागून होता. हल्लीं तो बांधला जात नाहीं.

(४) बांधकोंड वाडीस लागून वरच्या बाजूला एक गिरोबाचा बांध म्हणून तलाव होता.

(५) पोडोस वाडींतहि पूर्वी एक तलाव बांधला जाई.

(६) करमळी येथें कुवांचीरांय या ठिकाणीं पाण्याचा प्रवाह आहे. हल्लीं सरकारनें विकासयोजनेंत हा तलाव बांधून पुरा केला.

## बांदघांटी

रवळनाथाच्या देवालयाजवळून सुमारें पांच फूट रुंदीचा दगडांनीं बांधलेला रस्ता पाट गांवच्या हद्दीपर्यंत जातो. ह्या रस्त्याची लांबी सुमारें साडेतीन मैल असून दुतर्फा गर्द रान होतें. त्याला कुपीचें रान असें म्हणत. हल्लीं हुमरमळा ते वालावल नवी मोटारची सडक झाल्यामुळें रस्त्याचा अर्धा भाग ओसाड पडला आहे. शेंकडों वर्षांपूर्वीं बांधलेला हा रस्ता अजूनहि आपलें अस्तित्व टिकवून आहे.

## रस्ते

कुडाळ ते कवठी हा रस्ता वालावलमधून जातो. दक्षिण सीमेस कुडाळ ते पाटपरुळ हा रस्ता जातो. दोन्ही रस्त्यांवरून एस. टी. च्या गाड्या जातात. हुमरमळा ते वालावल देऊळवाडा हा रस्ता तयार झाला असून तो बोर्डाच्या ताब्यांत दिलेला आहे. शिवाय नवीन एका रस्त्याचें काम चालू आहे.

## गांवांतील देवस्थानें

१ श्रीदेव रामेश्वर. २ श्रीदेव लक्ष्मीनारायण. ३ श्रीदेव रवळनाथ. ४ श्रीदेवी माउली. ५ श्रीदेव घाडवस. ६ श्रीदेवी खनर्बी. ७ श्रीदेवी भावई. ८ श्रीदेवी सांतेरी. ९ श्रीदेव बांदया. १० श्रीदेव आदिनारायण. ११ श्रीदेव जैन. १२ श्रीदेवी महालक्ष्मी. १३ श्रीदेव का ोबा. १४ श्रीदेव गिरोबा. १५. श्रीदेव म्हारगिरा. १६ श्रीदेव धोंगडा. १७ श्रीदेव गावडा. १८ श्री सिद्धपुरुष. १९ श्री समाधी पुरुष. २० श्रीदेव गणपति. २१ स्थान पुरुष.

## खनिज संपत्ति

कांचेच्या कारखान्यास लागणारी नंबर एकची सिलिका ह्या गांवीं मिळते. फार मोठ्या प्रमाणांत सिलिका निर्यात होते. ह्या धंद्यास सहकारी तत्त्वावर चालना दिल्यास एक चांगला ग्रामोद्योग होईल. थोड्या प्रमाणांत मँगनीज सापडतें. परंतु ह्याबाबत संशोधन झालें पाहिजे.

**उत्पन्न :**—मुख्य उत्पन्न नारळ व सुपारी. थोड्या प्रमाणांत शेती चालते.

## गांवांतील घराणीं

वालावल गांवांत कऱ्हाडे ब्राह्मणांचीं सुमारें पंधरा घरें आहेत. गांवकीचे अग्रमान कुडाळदेशकर गौडब्राह्मणांकडे आहेत. त्यांचीं सुमारें ७५ घरें आहेत. येथें कुलकर्णी ह्या नांवाचें एक सारस्वत घराणें होतें.

## उपनांवें

(१) कशाळकर, पुजारे, पित्रे, उपाध्ये, साधले, पुराणिक, भागवत, दीगे.

(२) प्रभुदेसाई, सामंत, तेंडोलकर, मठीकर, राजीवडेकर, आजगांवकर, वालावलकर, गाळवणकर.

(३) परब, मार्गी, गावडे, वालावलकर, राऊळ, घाडी, कानडे, चव्हाण, भगत, चौधुरी, मडवळ, मांजरेकर, मयेकर, करळकर, परकर, पेडणेकर, बंगे, आडेलकर, आडेकर, गंवडे, धोंगडे, पार्सेकर, कोचरेकर, हळदणकर, तेली, वेंगुर्लेकर इ.

शिवाय वालावलकर व परुळकर हीं उपनांवें लावणारीं सुमारें २२ हरिजन घराणीं व तीन चर्मकार घराणीं आहेत.



**प्रा. शाळा**—(१) पूर्ण प्राथमिक शाळा दोन आहेत. दारवळ येथें एक व दुसरी बांधकोंड येथें. बांधकोंड येथील विद्यालय प्रसिद्ध दानशूर ग्रामस्थ कै. तुकाराम लक्ष्मण देसाई यांनीं बांधलें असून दारवळ येथील नारायणराव टोपीवाले यांनीं बांधून दिलें आहे. लोअर प्रायमरी दोन शाळा आहेत.



**इंग्रजी शाळाः**—कै. नर्मदाबाई अनंत शिवाजी देसाई टोपीवाले ट्रस्ट विद्यालय नांवाची इंग्रजी शाळा कै. टोपीवाले यांनीं बांधलेली आहे. ह्या विद्यालयांत एस. एस. सी. पर्यंत शिक्षण देण्यांत येतें. विद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उत्तम असून मुख्याध्यापक म्हणून श्री. राजाराम आत्माराम आठलेकर काम पाहतात. प्रात्यक्षिक शेती शिक्षण व साबण बनविण्याचा व्यवसाय शिकविला जातो. या विद्यालयास श्रीमती राधाबाई तुकाराम देसाई व कै. रघुनाथ रामचंद्र सामंत नेवाळकर व कै. देवजी आत्माराम शृंगारे यांनीं चांगली मदत केली आहे.

## संस्था

गांवांत कै. टोपीवाले यांनीं सुरू केलेलें एक अन्नछत्र व एक लायब्ररी आहे. वाचनालय चालू असून ग्रंथालयांतील पुस्तकें ट्रस्ट विद्यालयास दिलेलीं आहेत.

## विविध कार्यकारी सहकारी सोसायटी

ही संस्था १९४८ मध्यें स्थापन झाली. हल्लीं सोसायटीचें एकूण भांडवल सुमारें आठ हजार असून शेतकरी लोकांस कर्ज देण्यांत येतें. शिवाय एक चर्मालय चालविण्यांत येतें. पूर्वीं सोसायटीमार्फत एक धान्य दुकान चालविलें गेलें होतें. हल्लीं हें दुकान बंद आहे.

## ग्रामपंचायत

मुंबई सरकारच्या नवीन धोरणाप्रमाणें एक ग्रामपंचायत इ. स. १९५६ मध्यें स्थापन झालेली आहे. ह्या संस्थेचें कार्य अजून दिसावयाचें आहे.

## वालावल ग्रामस्थ संघ, मुबई

ग्रामविकासाच्या कार्यासाठीं श्री. एस. जी. वालावलकर ह्यांनीं हा संघ स्थापन केला. सदर संस्थेनें आतांपर्यंत चांगलेंच आर्थिक सहाय्य केलें आहे.

## श्रीदेव रामेश्वर



वालावल क्षेत्रांतील हें सर्वांत प्राचीन आणि प्रमुख देवस्थान आहे. शेंकडों वर्षांपूर्वी वालावल गांवची मुख्य वसाहत येथेंच होती असें त्या ठिकाणीं असलेल्या भूभागांना जीं नांवें आहेत, त्यांवरून दिसतें. महारवाडा बाजारपेठ, चावडी हे भाग येथें आहेत. हें देवस्थान अत्यंत जागृत आहे. देवालयांत स्वयंभू शिवलिंग असून तेथें नागाचें वास्तव्य असतें असें सांगतात. शिवलिंगाला तांदळाचे प्रसाद लावले जातात. कार्तिक वद्य चतुर्थीस येथें जत्रा भरते. माघांत शिवरात्रीचा उत्सव होतो. श्रीदेव लक्ष्मी-नारायणाप्रमाणेंच येथेंही २१८ जागर होतात व त्यासाठीं नेमणुका आहेत. येथें सामंत हरिदास सगळे जागर पुरे करतात.


## श्री देव नारायण



कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मणांचीं जीं अनेक कुलदैवतें आहेत, त्यांत वालावलीच्या श्रीदेव नारायणाची प्रामुख्यानें गणना होते. जामदग्न्य वत्सगोत्रीय वालावलस्थ प्रभुदेसायांची ती कुल-देवता असून तिची स्थापना राज्य-पदाधिष्ठित प्रभुदेसायांनीं केली आहे.

श्रीदेव नारायणच्या स्थापनेबद्दल निश्चित असें एखादें चिरंजीव लिखाण देवस्थानकडे नाहीं. त्यामुळें देवतेच्या स्थापनकालाबद्दल निश्चित काहीं सांगतां येत नाहीं. तरी पण कांहीं विद्वानांच्या मतें, मूर्तीचें शिल्प अकराव्या शतकांतील चोलकालीन शिल्पाशीं जुळणारें आहे. परंतु साधारणपणें देवतेची स्थापना तेराव्या शतकांत केली असावी असें मानलें जातें. श्रीदेवाच्या विवस्त्र मूर्तीचा फोटो कलकत्ता म्युझियममधील आर्किआलॉजीचे सुपरिंटेंडेंट श्रीरामचंद्रन् M. A. यांस दाखविल्यावरून त्यानीं मूर्तीच्या शिल्पाचें ११ व्या शतकांतील चोलकालीन शिल्पाशीं कांही बावतींत साम्य दिसतें असे उद्‌गार काढले.

## देवालयाचें कोरीवकाम





देवालयाच्या महाद्वारावरील कोरीव काम व आंतील सभामंडपाचे सहा पाषाणी स्तंभ प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. ह्या खांबांची उंची सुमारें ६॥। फूट असून त्यांचा मध्यवर्ति घेरहि जवळजवळ तेवढाच आहे. खांबास वापरलेला पाषाण काळा काविन्नि गुळगुळीत असून वालावलीपासून १४ मैलांवर असलेल्या आकेरी गांवीं तो सांपडतो. प्रत्येक खांबाच्या मध्यावर एक वीत उंचीच्या देवादिकांच्या सुंदर मूर्ति वर्तुळाकार कोरलेल्या आहेत. ह्या खांबावरील कारागिरी कुडाळ येथील कुडाळेश्वराच्या व आकेरी येथील रामेश्वराच्या देवालयांतील खांबावरील कारागिरीप्रमाणें आहे.

## दीपमाळ




देवालयासमोरील दीपमाळेस वापरलेला दगडही काळा काविन्नी गुळगुळीत आहे. दीपमाळेचे पांच स्तंभ असून त्या प्रत्येकावर कलशाकृति आहेत. अशा तऱ्हेची दीपपाळ कुडाळ प्रांतांत दुसरीकडे कोठें नाहीं. कुडाळदेशकर गौडब्राह्मण जी कलशोपासना करितात त्याचें प्रत्यक्ष प्रतीक म्हणून दीपमाळेच्या पांचहि स्तंभावर ह्या कलशाकृति घडविल्या असाव्या.

## सागवानी स्तंभ

श्रीनारायण देवालयाला जो भव्य मंडप आहे त्या सभामंडपांतील उजव्या बाजूस व सभामंडपाच्या बाहेरील पडवींतून शिरतांना डाव्या बाजूस कोपऱ्यांत एक सागवानी खुंट आहे. हा खुंट सभामंडप बांधण्यापूर्वींहि तेथे होता असें दिसतें. कारण तो सभामंडपाच्या बाळंद्यांतून वर आला आहे. श्रीनारायणाचें देवालय बांधण्यापूर्वी हल्लींच्या कोनशिला समारंभाप्रमाणें उभारलेला तो आद्यस्तंभ आहे. अशा प्रकारचा स्तंभ उभारण्याची पद्धत विजयनगर स्थापन होण्यापूर्वींपासून रूढ होती.

## श्रीनारायणमूर्ति

श्रीदेव नारायणाच्या मूर्तीस प्रसिद्ध विद्वान भय्यादाजी शास्त्री ‘ अनिरुद्धाची मूर्ति ’ म्हणतात. वालावलींतील या मूर्तीचा विशेष असा कीं आजपर्यंत पाहिल्या गेलेल्या बहुतेक मूर्तीच्या डाव्या कडेस लक्ष्मीची मूर्ति असते, परंतु या मूर्तीच्या उजवीकडेस लक्ष्मी व डावीकडे गरूड आहे. नारायणमूर्ति ज्या कमलासनावर उभी आहे तें मूर्तीच्या पायापासून अलग नसून दुसऱ्या एका मोठ्या चौरस आसनावर ठेवलें आहे. कमलासनाचा पापाण मूर्तीच्याच पाषाणाच्या जातीचा आहे. श्रीदेव नारायण देवस्थान



श्रीदेव नारायण

जागृत असल्याचा तेथील लोकांचा अनुभव आहे. देवळांतील नारायण-मूर्तीच्या गाभाऱ्यांत पूर्वी कधीं कधीं ' सिंहनाद ' होत असल्याचें सांगतात. नारायण चरित्रकार रेडेशास्त्री यांनींही त्याबद्दल--

' पूर्वी जेव्हां कधि घडतसे राउळीं सिंहनाद
तेव्हां सारी गडबड उडे होतसे तूर्यनाद ।। '

असें उल्लेखिलेलें आहे. श्रीदेव नारायण ज्यांचें कुलदैवत आहे त्यांनीं दुसऱ्या कोणत्याहि क्षेत्रांत देवसेवेकरितां जावयाचें नाहीं असा निर्बंध आहे.

वालावली येथील श्रीनारायण मूर्तीचें ध्यान यौगिक आहे. श्रीनारायणाची स्थापना करणाऱ्या कल्याणी ब्राह्मण पुरुषाचा हेतुहि शुद्ध यौगिक असावा असा तर्क करावा लागतो. ही मूर्ति अनिरुद्धाची असूनहि तिला श्रीलक्ष्मीनारायण म्हणतात तें चूक आहे. तिला केवळ श्रीनारायण म्हणणें योग्य आहे. " नारायणपरो योगो नारायणपरं तप: । नारायणपरं ज्ञानं नारायणपरा गति: ।। ' या भागवती विचाराची छाप या ठिकाणीं दिसून येते. श्रीनारायणाची मूर्ति चतुर्भुज--चक्र, गदा, शंख, पद्म या दक्षिणाध: क्रमानें आयुधें घेतलेलीं असून तिचे उजवे दोन हात व डावा वरचा हात वरच्या भागीं उचलून धरलेले आहेत व डावा पुढचा हात कमरेच्या खालीं सोडलेला असून त्या हातांत कमल आहे. हें कमल अणि कमलोद्भव प्रजापति यांचा संबंध भूलोकाशीं असून या उभयतांचा संबंध बीजक्षेत्र आणि उद्भव असा अन्योन्य आहे. म्हणजे प्रजापतीची उत्पत्ति कमलामध्यें आहे. अर्थात हात खालीं सोडणें हें उर्ध्वमूल आणि अध:शाखा या वाच्यार्थानें बरोबर दिसतें. मूर्ति स्थानक असून ती लिंगधारी मूल-स्तंभाला स्पर्श करून जणूं स्तंभाच्या आधारानें उभी आहे. ( यानक, स्थानक, आसनस्थ आणि शयनक असे मूर्तीचे चार प्रकार असतात. ) या स्तंभाला बिलगलेली ' श्री ' ची लहान मूर्ति नारायणाच्या गुडघाभर उंचीची आहे. ह्या श्रीच्या हातांत कमळाची कळी आहे. डाव्या पायाशीं गरूड बसलेला आहे. गरूड म्हणजे गरूत्मन सूर्य. हेंच नारायणाचें लांछन आहे. ह्या दोन्ही मूर्ति लहान असून त्या मूर्तीच्या खालच्या एक चतुर्थांश भागांत दाखविलेल्या आहेत.

श्रीनारायणाची नाभी हें अंतरिक्ष असें मानतात. ' ॐ नाभ्यां आसीदंतरिक्षं .... पदभ्यां भूमिः ' हें पुरुषाचें वेदोपनिषदीय वर्णन या ठिकाणीं चिंतनीय आहे. ही अनिरुद्धाची मूर्ति बनविणारा शिल्पकार खरोखर योगाभ्यासी असावा किंवा चांगला तंत्रज्ञ असावा असें वाटतें. कारण ध्यानासाठीं लागणाऱ्या साक्षात् ब्रह्माची कल्पना या मूर्तिमध्यें नखशिखांत व्यवस्थित मांडलेली आहे. देवालयाची रचना व दरवाजावरील आणि खांबावरील नवग्रहादि देवतांच्या मूर्ति व कोरीव काम अत्यंत मनोहर असून त्याचें बारकाईनें संशोधन करण्यासारखें आहे.

## श्रीदेवाचा रत्नजडित शिरपेंच

श्रीदेवाचा एक रत्नजडित शिरपेंच आहे. तो विशेषतः रामनवमीच्या उत्सवांत श्रींच्या ज्या निरनिराळ्या पूजा बांधतात त्यांतील घोड्यावरील पूजेच्या दिवशीं लावतात. घोड्यावरील पूजा वर्षांतून दोन वेळ बांधतात. एक रामनवमीच्या वेळीं व दुसरी दसऱ्याच्या दिवशीं. घोड्यावरील पूजेचा संबंध प्राचीन राज्यसंस्थापकांशीं निगडित आहे. ' हा शिरपेंच युसुफ आदिलशहानें त्या वेळचा सरदेसाई गोमप्रभु यास दिला' असें रा. ब. बांबर्डेकर यांनीं लिहिलें आहे. परंतु या शिरपेंचाच्या मागील अडकविण्याच्या बाजूस, कोरणांत जीं अक्षरें कोरलेलीं आहेत तीं अरेबिक व पर्शियन तज्ञांकडून वाचून घेण्याचा प्रयत्न झाला. तेव्हां श्री. ग्यानी ( प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई ) यांनीं तीं मराठींत असावींत असें सुचविलें.

नंतर तीं अक्षरें श्री. आचार्य, क्युरेक्टर प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम यांना दाखविलीं. तेव्हां त्यांनीं तीं ' गोम ' अशीं वाचलीं. अक्षरांची धाटणी १५ व्या शतकांतील धाटणीपेक्षां भिन्न असून जुनी आहे. यावरून असें वाटतें कीं, हा शिरपेंच १२ व्या शतकांतील गोमप्रभूचा असावा. ह्या गोमप्रभूचा उल्लेख शके १०१६ च्या शिलाहार कॉपरप्लेटमध्यें केलेला आहे. हा शिरपेंच श्रीकडे केव्हां व कसा आला किंवा श्रीकरितांच तो तयार केला गेला होता कीं काय हें पुराव्याच्या अभावीं सांगतां येणें कठीण आहे.

## श्रीदेवाचा शिक्का




श्रीनारायणाचा] एक अष्टकोनी शिक्का असून, शंख, चक्र, गदा व पद्म हीं श्रींच्या हातांतील चार आयुधें बाजूस कोरलेलीं आहेत. शिक्क्यांतील अक्षरें "श्रीनारायणदेव" अशीं आहेत. ह्या शिक्क्यांतील अक्षरांचें वळण विशेषत: ना, रा, य, द बाराव्या शतकांतील अक्षरांच्या वळणासारखें दिसतें हें डॉ. बुल्लर यांच्या तक्त्याशीं ताडून पाहिल्यावर दिसून येतें. श्रीसंस्थानचा हा शिक्का श्रीची स्थापना झाल्यावर पाडण्यांत आला. हा शिक्का देवस्थान संस्थापक चंद्रभान सूर्यभान प्रभूंनीं श्रीदेवस्थानची जी एकंदर व्यवस्था लाविली त्या वेळीं पाडला असावा.

## श्रीदेवाकडील तुलसीमाला

श्रीदेव नारायणाकडील तुलसीमाला पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाकडे प्रतिवर्षी पाठवून उलट श्रीविठ्ठलाकडील बुका परत श्रीनारायणाकडे येण्याची परंपरा फार प्राचीन आहे. श्रीदेवाच्या जाबत्यांत माळेच्या नेण्यासंबंधीं उलेख असून त्याबद्दल बालावलींतील ठिकाण 'जितवणें' करमळीकर प्रभुदेसाई यांस भोगतें. श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठोबाचे देवालयाचा काळ साधारणपणें बारावें शतक मानला जातो. तुलसीमाला पहिल्यानें श्रीविठ्ठलाकडे जाण्याच्या प्रघातावरून श्रीविठ्ठलाची स्थापना श्रीनारायणाच्या अगोदरची असली पाहिजे हें निश्चित.

## कल्याण पुरुष

कल्याण पुरुषाची घुमटी दीपमाळेवर आहे. दीपमाळेच्या मध्यभागीं एक चौरस चबुतरा असून त्याच्या चार कोनांस प्रत्येकीं एक असे चौकोनी चबुतरे आहेत. ह्या चार लहान चबुतऱ्यांवर प्रत्येकीं एकेक स्तंभ आहे.

स्तंभाची चबुतऱ्यावरील पायाची लांबी ३७ इंच आहे आणि मधल्या चौरसावरील मोठ्या स्तंभाच्या पायाची लांबी ५२ इंच आहे. या मोठ्या स्तंभाच्या पायावर चार बाजूंस चार सुंदर हत्ती कोरलेले आहेत. मधल्या स्तंभावर पशुपक्षादिकांचीं तोंडें बसविलीं असून सर्व स्तंभावर कलशाकृति आहेत. मधल्या स्तंभाच्या डाव्या बाजूस ५२ इंच लांब व ५२ इंच रुंदीचें भव्य तुलसीवृंदावन असून त्याच्या श्रीदेवनारायणाकडील दर्शनी भागावर मारुतीची मूर्ति कोरलेली आहे. मधल्या स्तंभाच्या उजवीकडे व श्रींच्या समोर डावीकडे वृंदावनाएवढीच वरून बंद अशी जी घुमटी आहे त्या घुमटीस "कल्याण पुरुषाचें स्थान" म्हणतात. ही घुमटी श्रींचे बाजूनें उघडी आहे. ह्या घुमटींत दोन मूर्ति आहेत. मोठी मूर्ति कल्याण पुरुषाची होय. ही मोठी मूर्ति वीरासन घातलेली व पाय दुमडून अर्धवट बसलेली, श्रीसमोर हात जोडलेली, परिधान केलेल्या वस्त्राचे सोगे खालीं सोडलेली अशी आहे. गळ्यांत कोरीव यज्ञोपवीत आहे. तिच्या मुकुटावरचें कोरीव काम फार उत्कृष्ट आहे. याच मूर्तिशेजारीं दुसरी एक लहान मूर्ति असून तिचें मुख पावसामुळें धुपून गेलें असावें. दोन्ही मूर्तींची पूजा श्रींचे पुजारी करतात. ह्या घुमटीस मागील बाजूनें १" × १" लांबीरुंदीचें एक गवाक्ष-दार असून तें इतक्या कुशलतेनें बनविलेलें आहे कीं, त्याच्यांतून दीड पावणेदोनशें फूट अंतरावर असलेल्या श्रीनारायणाच्या सबंध मूर्तीचें दर्शन अत्यंत सुलभतेनें व्हावें. घुमटीवर सपाट शिला बसविलेली असून तिच्यावर श्रींच्या कोरीव पादुका आहेत. त्यांच्यावर केलेला अभिषेक मूर्तीच्या मस्त-कावर पडावा अशी योजना दिसते.

"कल्याण पुरुष" हा दुसरा कोणी नसून, ज्यानें श्रीदेवनारायणाची मूर्ति तयार करवून आपल्या वृत्तीच्या मूळ गांवांत कुलदेवता म्हणून स्थापन केली, तिच्या खर्चासाठीं अर्ध्या गांवचें उत्पन्न तोडून देऊन सुव्यवस्था केली, ज्यांची कीर्ति कुडाळ प्रांतांत सर्वतोमुखीं सतत कायम आहे, त्या पराक्रमी नारायणभक्त उदारधी राजे सूर्यभान यांचीच ती मूर्ति आहे व बाजूची मूर्ति ही सूर्यभान प्रभूंचे बंधू चंद्रभान प्रभू यांची आहे. देवस्थान संस्था-पकांची प्रतिकृति पुढें उभी करून, घुमटीच्या माथ्यावर कोरलेल्या पादुका, वैकुंठनिवासी श्रीनारायणाचा भक्त जसा गरुड, तशा वालावलींत

नारायणाची स्थापना करणाऱ्या ह्या बंधुद्वयांच्या विनम्र मूर्तींनीं शिरोधार्य अशा आपल्या मस्तकावर धारण केलेल्या दिसतात.

वालावलींतील 'कुळ' नामक ठिकाणांत ह्या चंद्रभान सूर्यभान प्रभूंचा वाडा होता. या वाड्यानजीक बाग, पागा, चावडी, कुणगा हीं प्रसिद्ध ठिकाणें असून तेथें जुनें कुळाचें देऊळ होतें. ह्या देवळाच्या दोनच पायऱ्या आज अस्तित्वांत आहेत. सन १६९७ नंतर कुडाळदेशकर ब्राह्मणांचीं वालावलींतील घराणीं परागंदा होऊन त्याच काळांत राजाचें 'कुळ' नाहींसें झालें. कुळाच्या बागेंतील ठिकाणांत दोन मोठाल्या तळ्या असून त्यांचें पाणी सबंध बागेला पुरतें. राजवाड्यापासून आजूबाजूच्या भागांत व डोंगरांतून श्रीमाउलीचे देवालयापर्यंत दगडांच्या बांधीव वाटा आहेत. ह्या अवघड असल्या तरी एका घोडेस्वारास सहज जातां येईल अशा आहेत.

श्रीदेव नारायणाच्या अंगावर २०१२२ शिक्के आहेत. शिवाय श्रीच्या जामदारखान्यांत घासलेला एक शिक्का आहे.

## श्रीदेवी माउली



वालावली गांवांत श्रीदेव नारायण ह्याहून प्राचीन अशी ही एक ग्रामदेवता आहे. ह्या देवीला श्रीदेवस्थानांत घातले जाणाऱ्या गाऱ्हाण्यांत "माया" असें म्हटलें आहे. ही माया म्हणजे माउली दशभुजा असून तिची उंची सुमारें ३॥–४ फूट आहे. तिचा डावा पाय महिषावर असून उजव्या हातांतील त्रिशुळानें ती त्याच्यावर प्रहार करीत आहे. डाव्या बाजूस त्या महिषांतून उत्पन्न झालेला महिषासुर दैत्य आहे. या दशभुजा माउलीचीं आयुधें येणेंप्रमाणें :–

उजवीकडील वरून खालीं—१ चक्र, २ जंबिया, ३ बाण, ४ देवतारूपी शक्ति, ५ त्रिशूळ.

डावीकडील वरून खालीं--१ ढाल, २ धनुष्य, ३ पिधान, ४ अर्धचंद्राकृति, ५ महिषाची ओढून धरलेली जीभ.

ह्यावरून माउलीची मूर्ति महिषासुर मर्दिनीची आहे. देवीच्या उजव्या बाजूस उजव्या हातांत चवरी व डाव्या हातांत पाण्याची झारी असलेली एका स्त्रीची मूर्ति आहे. ही बहुधा दासी असावी. दोन्ही मूर्तींच्या अंगावर निरनिराळे दागिने कोरलेले दिसतात. सर्व मूर्ति महिषासुरासकट एकसंधि पाषाणावर कोरलेली आहे. श्रीमाउलीचे उजवे हातास कोपऱ्यांत पाषाणी पादुका असून त्या पादुकामागें भिंतीस टेकलेली श्रीगजाननाची मूर्ति आहे. त्याचेसमोर उजवीकडे एक शिवलिंग व त्याचे बाजूस पाषाण आहे. ह्या पाषाणास 'चेंदवणचा पूर्वस' (पूर्ववंश) म्हणतात. वालावलीच्या पूर्वसाचें स्वतंत्र देऊळ श्रीदेवीसमोर आहे. येथील पुजारी गुरव व उपाध्या असे दोघे असून गुरव लिंगायत आहे. गुरवानें मूर्तीस आंघोळ घालावयाची. अभिषेक, एकादशणी, गणपतिपूजन व समाराधना वगैरे कृत्यें उपाध्ये यांनीं करावयाचीं असा नियम आहे. मात्र मुख्य पुजारी गुरवच मानला जातो.



श्रीदेवी माउलीचें देवालय वालावली व चेंदवण ह्या दोन गांवांच्या सीमेवर डोंगरपठारावर बांधलेलें आहे. देवीच्या उजव्या बाजूस लगतच प्रसिद्ध कुपीचा डोंगर आहे. ह्या डोंगरांत वाघोबाची स्वारी नित्य ठाण मांडून असते. रात्रीच्या वेळीं देवालयाच्या नजीकच्या वापीवर पाणी पिण्याकरितां स्वारी येते. श्रींचें देऊळ असलेल्या पठारावरून पश्चिम समुद्राचें दर्शन होतें. देवालयासभोंवतीं उघडा बोडका लांबच लांब माळरानाचा भाग पसरलेला आहे. दक्षिण दिशेस कुपीचा डोंगर आणि उत्तरेस खालीं दरींत पुष्कळ झाडी असल्यामुळें ह्या दोन बाजू अरण्यमय भासतात. ह्याच दरींत पायथ्याशीं असलेल्या नारायण


तीर्थाचे कांठीं श्रीदेवनारायणाचें देऊळ आहे. श्रीदेवीचे देवालयाचा अर्धा भाग वालावलींत व अर्धा भाग चेंदवण गांवांत आहे. शिवाय गर्भागारांतील श्रीच्या मूर्तीची स्थापनाहि अशीच म्हणजे देवीचें एक पाऊल वालावलींत व दुसरें चेंदवणांत अशा तऱ्हेनें केली आहे. यामुळें देवालयाचा संबंध दोन्ही गांवांतील गांवकर मंडळीशीं येतो. वालावलींतील जामदग्न्य वत्सगोत्री व चेंदवणांतील काश्यपगोत्री प्रभु हेच ह्या देवालयांतील मानकरी होत. त्यांच्या पूर्ववंशाचे पाषाण आजतागायत ह्या देवालयांत पूजिले जातात. माउलीच्या देवालयाच्या उजव्या अंगास एक मोठें व दीपमाळेजवळ एक लहान अशीं दोन तुळसीवृंदावनें आहेत. हीं अनुक्रमें वालावली व चेंदवण येथील मागें दिलेल्या दोन गोत्रीयांचीं होत. ह्यावरून हें देवालय वरील दोन गांवांचें समाईक देवस्थान आहे. ह्या देवालयांत नवरात्राचा मोठा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव दोन्ही गांवांतील ग्रामस्थ मानकरी सहकार्यानें पार पाडतात. हें देवस्थान जागृत असून देवी सर्वांच्या नवसास पावते असें समजतें. चेंदवणचे एक सुप्रसिद्ध ग्रामस्थ श्रीमान कै. रामचंद्रपंत बळवंतराव चेंदवणकर यांनीं श्रीदेवी माउलीच्या देवालयाच्या बांधकामास बरेंच मोठें आर्थिक सहाय्य केलें होतें.

## घाडवंश

श्रीनारायण देवालयाच्या डाव्या बाजूस श्रीच्या विस्तीर्ण पटांगणावर घाडवंशाचें देऊळ बांधलेलें आहे. ह्या देवालयाचे मुख्यतः दोन भाग आहेत. गर्भागार आणि मुखशाला. गर्भागारास प्रशस्त खिडक्या आहेत. देवळाचा घुमट चार समद्विभुज त्रिकोणाचा शंक्वाकृति लांकडी बनविलेला असून त्यावर कौलें आहेत. देवालयाच्या मुखशालेंतील दहा खांब पाषाणी असून त्यावरील शिल्प साधारण प्रतीचें आहे. खांबाचा आकार लहान असून रचना व शिल्प साधारणपणें श्रीनारायण देवालयाच्या मुखशालेंतील खांबासारखें घडविलें आहे. मुखशालेचा घुमटहि शंक्वाकृति आहे. गर्भागाराचें द्वार लांकडी असून मध्यभागीं श्रीगजाननाची साध्या कोरणीची एक मूर्ति आहे. मुखशाला उघडी असून पुढें सभामंडप नाहीं. सभामंडपाची जागा सोडून पुढें बऱ्याच अंतरावर एक साधी एकस्तंभी जांभेथर दगडांची दीपमाळ आहे.

ह्या देवालयास घाडवँसाचें देऊळ म्हणतात. वँस म्हणजे वंश. घाड या शब्दावरून घाडी असा अर्थ. तेव्हां घाडी ह्या नांवाच्या मराठ्या जातीच्या पूर्वजांचे पाषाण ह्या देवालयांत असावेत अशी सहज कल्पना येते. घाडी म्हणजे 'देवस्की करणारा व देवतांना दिलेले बळी कापणारा विरतीक' आणि ह्या देवाचा पूजारीहि तोच आहे. बारांचा घाडवंश आणि राज्याचा घाडवंश ह्या दोघांची पूजा घाडीच करतो.

**घाडवंशाचे देवालयांतील अंतरंचना**




वरील आकृतींत दाखविल्याप्रमाणें देवालयांतील मूर्तींची रचना आहे. नं. १ पासून नं. २ पर्यंतची जागा भिंतीपासून सोडलेली आहे. तेवढ्याच भागाला एक पेढी आहे आणि नं २ पासूनच्या मूर्ति व पिंडी यांचा क्रम पुढीलप्रमाणें:—

"भुंकेचा ब्राह्मण, कऱ्हाड ब्राह्मण, परबवंश,
बाराचा घाडवंश, राज्याचा घाडवंश." यापुढें
आणखी कांहीं देवता व पिंडी आहेत.

नं. २ ही मूर्ति 'भुंकेच्या ब्राह्मणा'ची आहे. भुंकेचा ब्राह्मण म्हणजे कुडाळदेशकर गौड ब्राह्मण होय. ही मूर्ति सुमारें एक फूट उंचीची एकसंधी पाषाणाची असून तिच्या उजव्या हातांत ढाल व डाव्या हातांत कमंडलू आहे. मूर्तीला दाढी असून गळ्यांत कोरीव यज्ञोपवीत आहे.

नं. ३ ही मूर्ति 'कऱ्हाडे ब्राह्मणाची' आहे. हा वालावल येथील कऱ्हाडे ब्राह्मणांचा मूळ पुरुष.

१३१९ (stamp)

नं. ४ ही मूर्ति परब वंश म्हणजे परब नांवाच्या मराठे लोकांच्या पूर्वजांची आहे. मूर्तीच्या हातांत ढाल व तलवार आहे.

नं. ५ ही मूर्ति नसून खालच्या बाजूस काटोला व वर निमुळता होत गेलेला एक लहान दगड आहे. ह्यालाच गांवचा घाडवंश आणि गाऱ्हाण्यांत बाराचा घाडवंश म्हटलें आहे. बारा विरतिकांत घाडी हा पहिल्या नंबरचा विरतीक असल्यामुळें त्यास हें नांव दिलें आहे. ' बारांचा घाडवंश, बारांचा पूर्वस, बारापाचांचें गणित एक कर ' असे जे गाऱ्हाण्यांत उल्लेख आहेत त्या सर्वांचा अर्थ एकच आहे. तेव्हां ही पिंडी गांवांतील विरतीक घाडी याच्या पूर्वजाच्या नांवाची आहे.

नं. ६ ही मूर्ति ' राज्याचा घाडवंश ' ह्या नांवानें संबोधिली असून सुमारें दोन फूट उंचीची आहे. तिच्या उजव्या हातांत तीक्ष्ण धारेचें शस्त्र असून डाव्या हातांत ढाल आहे. मूर्तीचा दगड गुळगुळीत असून शिल्प अगदीं अलीकडील आहे. ह्या मूर्तीला ' राज्याचा घाडवंश ' असें म्हणतात. परंतु ही मूर्ति कोणाच्या राज्याचा वंश हें समजण्यास कांहीं आधार नाहीं. कुडाळप्रांतावर, चालुक्यानंतर, मांडलिक आणि स्वतंत्र या नात्यानें कुडाळदेशकर गौडब्राह्मणांनींच इ. स. १६९७ सालपर्यंत राज्य केलें. त्यानंतर मराठे सावंतांची सत्ता चालू झाली.

ह्या घाडवंशाच्या देवालयांत घाडवंशाची मूर्ति तर एका बाजूस आहे. शिवाय घाडवंशाच्या देवळांत इतर वांशिक मूर्ति कां ? आणि सर्व ज्ञातींचीं मूर्तिरूप वांशिक स्थानें त्या देवळांत असतांना त्याला घाडवंशाचें देऊळ असें कां म्हटलें जावें ? वगैरे गोष्टी समजणें कठीण.

नं. १ ची जागा, भिंतीपासून नं. २ चे मूर्तीपर्यंत सुमारें ३८ इंच लांब असून ४० इंच रुंद आहे आणि हीच जागा एखाद्या पेढीसारखी थोडी उंच असून भिंतीकडील बाजूनें आंत घुसलेली दिसते. ज्या ठिकाणीं हीं सर्व वांशिक स्थानें आहेत त्या पट्टीची लांबी १५ फूट असून, कांहीं मूर्ति उजवीकडे भिंतींत कोरण करून व आडव्या बाजूस ठेविल्या आहेत. नं. १ ची जागा ( ३८ इंच लांबीची ही पेढी ) म्हणजे कुडाळदेशकर ब्राह्मणांच्या " राज्याच्या पाटाचें स्थान " आहे असें कै. अनंत सिताराम देसाई, बी. ए. एल्एल्. बी. यांनीं आपल्या हस्तलेखांत म्हटलें आहे.

कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांस जेव्हां राज्यप्राप्ति झाली तेव्हां त्यांनीं आपल्या मुळभुंकेच्या ह्या मुख्य गांवांत, श्रीनारायण ह्या कुलदेवतेच्याहि आधीं राज्याचा निदर्शक असा जो पाटा त्याची स्थापना केली आणि तेव्हांपासून त्यास ( हल्लीं घाडवंशाचें देऊळ ज्यास म्हणतात त्या देऊळास ) 'पाटचाचें देऊळ' म्हणत. ह्या पाटचावर कलशादि देवतांची पूजा केली जात असे. पुढें १३ व्या शतकांत वैष्णवी धर्माच्या लाटेनें चंद्रभान सूर्यभान या राजबंधूंनीं परमपूज्य अशा ह्या पाटचानजीकच श्रीनाराण ह्या विष्णुदेवतेची कुलदेवता म्हणून स्थापना केली.

( गौड ब्राह्मण १९४२ अं. २ )-



## श्रीदेव गणपति

हें देवस्थान वालावल हुमरमळा रस्त्यावर मध्यावर आहे. गाणपत्य बाळूकाका आरावकर यांनीं दृष्टांत झाल्यामुळें ह्या देवस्थानची स्थापना केली. हें देवस्थान जागृत असून बाहेरगांवचे लोक दर्शनासाठीं मुद्दाम येत असतात.

**श्रीदेव कानोबा**--गाळवणे वाडींत श्रीदेव कानोबाचें प्राचीन व जागृत देवस्थान आहे. देवालयांत तीन समाध्या आहेत. येथें नवरात्रांत मोठा उत्सव होतो. समाप्तीच्या दिवशीं म्हणजे दसऱ्याच्या दिवशीं कुडाळदेशकर ब्राह्मण, मराठा व भंडारी ज्ञातीचीं तीन जोडपीं प्रसादास (जेवण्यास) बोलवावीं लागतात. ह्या देवस्थानच्या पूजेसाठीं गाळवणकर देसाई घराण्यास सुमारें २॥ रु. लोकलफंडाची जमीन (मठो नांवाचें ठिकाण) भोगत असतें. येथून पाऊण मैलावर भैरोबाचें स्थान आहे.

**गिरीबुवांचा मठ**--दारवळ वाडीपासून दोन फर्लांगावर वालावल कुडाळ रस्त्याच्या डाव्या बाजूला हें देवस्थान आहे. येथील बुवा हा ब्रह्मचारी असावा सागतो.

**महालक्ष्मी**--देवालयांत दोन फूट उंचीची काळया पाषाणाची महालक्ष्मीची चतुर्भुजा मूर्ति आहे. डाव्या बाजूस पायांकडे पाठीमागें तिचें वाहन सिंह आहे. तिच्या उजव्या हातांत तिच्याच उंचीचा दंड असून डाव्या हातांत ढाल आहे. दुसऱ्या हातांतील आकृति अस्पष्ट आहे. ही मूर्ति एका लहान पेढीवर उभी आहे. तिच्यासमोर डावीकडे एक अर्धवट पुरलेलें शिवलिंग असून त्याच्या बाजूस कोरलेली अस्पष्ट अशी जुनाट शस्त्रधारी पुरुषमूर्ति आहे. जवळच ब्राह्मण व गणपति यांच्या नांवाने पूजलेले पाषाण आहेत. शिवलिंग, गणपति व ब्राह्मण आणि मूर्तीचें ध्यान ह्यावरून ही मूर्ति श्रीदेवी भवानीची दिसते.



**श्रीदेव रवळनाथ**:–ही ग्रामदेवता असून फार प्राचीन देवस्थान आहे. देवस्थानच्या व्यवस्थेसाठीं जमिनी नाम दस्तीवार करून देण्यांत आल्या आहेत. या ठिकाणीं दसरा व शिमगा हे मोठे उत्सव होतात.

**श्रीदेव वेताळ:**–श्रीदेवी भावई म्हणून जें देवस्थान आहे त्याच्या पूर्वेस उलटून ठेवलेल्या दोन दगडांच्या मूर्ति आहेत. मूर्तींचें शिल्प प्राचीन आहे. त्यांच्या पाठीवर चंद्र व सूर्य यांच्या आकृति आहेत. चंद्रसूर्य असेपर्यंत ह्या मूर्ति उघडूं नयेत असें जाणते लोक सागतात.

**जैन:**–श्रीनारायणाचे देवळापासून सव्वा मैलावर गांवधडीस हें देऊळ आहे. देवळाच्या मागें तीन निरनिराळचा मूर्ति आहेत. मूर्तींचें शिल्प जुनें आहे. ह्या मूर्ति लगत असलेल्या वहाळाच्या बाजूस आम्र-वृक्षाखालीं पुरलेल्या सांपडल्या. मोठ्या मूर्तीच्या गळयांत यज्ञोपवीत आहे. डाव्या हातांत दंड व उजव्या हातांत शंखाकृति आहे. कानांत कुंडलें आहेत. तिच्या उजव्या बाजूस हात जोडून उभी असलेली एक मूर्ति असून डाव्या बाजूस उजव्या हातांत एक जंबिया उगारून धरलेली दुसरी मूर्ति आहे. ब्राह्मणी सत्तेचें उच्चाटण झाल्यानंतरच्या कालांत कांहीं अनुचित प्रकार ह्या भागांत घडले असें ऐतिहासिक कागदपत्रांवरून दिसतें. ( पहा कों. इ. साधनें ले. ७७ ).

## देवस्थानचे पुजारी

(१) श्रीदेव नारायणाची पूजा कऱ्हाडे व कुडाळदेशकर ब्राह्मण करतात.
(२) श्रीदेव रामेश्वराची पूजा गुरव करतात.
(३) श्रीदेव माऊलीची पूजा गुरव करतात.
(४) श्रीरवळनाथाची पूजा राऊळ करतात.
(५) घाडवंसाची पूजा घाडी करतात.
(६) कानोबाची पूजा कुडाळदेशकर ब्राह्मण करतात.
(७) महारगिऱ्यांची पूजा महार करतात.
(८) गिरोबाची पूजा घाडी करतात.
(९) खनरबीची पूजा चौधुरी करतात.
(१०) भावईची पूजा मराळ करतात.

[ कुडाळदेशकर ब्राह्मण खेरीजकरून इतरांस देवाच्या नोकरीनिमित्त व पूजेनिमित्त देवस्थान इनाम जमिनी आहेत. ]

## वालावलींतील प्रचलित गाऱ्हाणें

" बा देवा म्हाराजा समर्ता, आज तूं देव रवळनाथ, तर म्हाराजा आज तुकां सांगणा करतों आसों. गांव संबंधान् देसधाम रोगराय तूं आज एशिक बांध, गांवार् रखवाली खरी कर, आपली शेवा चाकरी करून घे. या परमाणां तूं रवळनाथ, राजीं जा, नारायेनाची समजी घाल, कल्याण पुरसाक्, भुकेच्या बिरामनाक्, करडया बिरामनाक्, परबूवंसाक, बारांच्या घाडवसाक्, राज्याच्या घाडवसाक् खासा चवाठो, या परमानां तूं खळनाथ राजी जा. पावनायक्, राजी कर, पावनायच्या पुर्वसाक्, खनरबे भावयक, विऱ्या बांधयाक् आदिनारायणाक्, मायेक राजी-कर, मायेच्या पूर्वसाक्, बारांच्या पूर्वसाक्, रामेसरा जैनाक्, कानोबा भरगिऱ्याक गिऱ्या गावड्याक्, सांतेरी स्थानपुरुसाक्, जैन महालक्ष्मीक आज घोंगड्याची तूं समजूत घाल, पूर्वेच्या गुंड्याचा गणित पुरां कर, बारा पांचांचा गणित ऍक कर, देसधाम दूर कर आणि शेवाचाकरी करून घेरे म्हाराजा."

गाऱ्हाणें म्हणजे देवास नारळ ठेवून, आपलें, आपल्या कुटुंबाचें, गांवाचें व गांवांतील रहिवाशांचें रक्षण करण्याकरितां केलेली देवाची सूत्रमय प्रार्थना. हें गाऱ्हाणें गांवांतील ग्रामसत्तेचे अधिकारी, देवाचे विरतीक व इतर लोक ह्या सर्वांसमक्ष घाड्याकडून देवास घालण्याचा प्रघात आहे.

### श्रीक्षेत्र वालावली येथील

# श्रीदेव नारायणाचे वार्षिक उत्सव

**चैत्र शुद्ध प्रतिपदा** :–(१) गुढी पाडव्यापासून एकादशीपर्यंत रामनवमीचा उत्सव होतो. पाडव्याच्या दिवशीं सकाळीं उपाध्ये पंचांग-पूजन करून वर्षफल सांगतात. नंतर हरिदास गायन करतात. नंतर लोकांस खिरापत वाटतात. नंतर सर्व लोक देवास नारळ ठेऊन राम-नवमीच्या उत्सवाबद्दलचें सांगणें करतात. हा नारळ देसाई व मराठा



गांवकर मिळून ठेवतात. प्रतिपदेपासून द्वादशीपर्यंत देवळांत तीन वेळ चौघड्याची नौबत होते. [ पहांटेस ६ वा., दुपारीं १२ वा., सायंकाळीं ६ वा. ]. रोज सायंकाळीं ६ वाजतां देवाची महापूजा, मंत्रपुष्प, पुराण झाल्यावर पालखींतून मिरवणूक निघते. देवळांत पालखी आल्यावर पालखींतील उत्सवमूर्ति सभामंडपाच्या व मुखशाळेच्या मध्यावर सहासनावर ठेवण्यांत येते. नंतर कलावंतिणींचें नृत्य व गायन होतें. अखेर कीर्तन होतें. अशा प्रकारें नऊ दिवस कार्यक्रम असतो.

## रामनवमी

सकाळीं श्रीदेव नारायणाची उत्सवमूर्ति सिंहासनावर ठेऊन पुराण सांगण्यास सुरवात करतात. पुराण संपल्यावर हरिदास रामजन्माची सुरस कथा सांगतात. दुपारीं १२ वाजतां रामजन्म होतो. नंतर बाळाची पालखींतून मिरवणूक निघते. मग उत्सवमूर्ति देवाच्या गाभाऱ्यांत ठेवतात. मिरवणूक देवळांत आल्यावर बाळ देवास मानवून नंतर लोकांस दर्शन घडवितात. त्यानंतर प्रसाद वाटण्यांत येतो. चैत्र पंचमीपासून चार दिवस देवाच्या निरनिराळ्या पूजा बांधण्यांत येतात. रामनवमी दिवशीं घोड्याची पूजा बांधतात. ह्या दिवशीं देव घोड्यावर बसलेले दिसतात. ही घोड्यावरची पूजा वर्षांतून तीन वेळ बांधतात. रामनवमीस ( चैत्र शु. नवमी ), दसऱ्यास ( आश्विन शुद्ध १० ) व दहीं काल्यास (कार्तिक शुद्ध १४).

## वसंत उत्सव

चैत्र वद्य प्रतिपदेपासून वैशाख शु।। पौर्णिमेपर्यंत नित्याचे जागर होतात. ह्या दिवसांत ब्राह्मण व इतर ग्रामस्थ वसंतउत्सव साजरा करतात.

ह्या उत्सवांत ऋतुमानाप्रमाणें मिळणाऱ्या फळांचा नैवेद्य देवास दाखवून तो फलाहार लोकांस वाटला जातो. वसंत पूजेच्या उत्सवाचे जागर पूर्वी देवस्थानच्या उत्पन्नांतून होत असत. परंतु वसंतोत्सवांतील पूजा करणारे लोक फलाहार वगैरेचा खर्च स्वत: करूं लागले आणि कालांतरानें हा सर्वच खर्च ग्रामस्थांना करावा लागूं लागला. वैशाख शु।। १५ स देवळांत टिपर पाजळण्यांत येऊन वैशाख महिन्यांतील उत्सवाची सांगता होते.

## श्रीदेव नारायणाकडील जागर

देवाचे एकंदर जागर दोनशें अठरा आहेत. दर महिन्यास नित्य-जागर आठ असतात. [ सोमवार ४, एकादशी २, पौर्णिमा १, अमावास्या १ ].

वरील दरमहा आठप्रमाणें वर्षास होणाऱ्या९६नित्य जागरांना लागणारें तेल देवस्थान इनाम ठिकाण **जंजाळपाडें** उपभोगणार कृष्णा नारायण तेली वगैरे यांजकडून दर जागरास अर्धा शेरप्रमाणें मिळत असतें. इतर जागरांना लागणारें तेल देवस्थान इनाम ठिकाणांतून मिळावयाचें.

**देवांना पावणेर**––ज्येष्ठ व आषाढ महिन्यांत नित्याचे आठ जागर होतात. आषाढ शुद्ध अष्टमीस देव पावणेरास जातात. दशमी दिवस देव धर्मशाळेंत जातात व तेथें पावणेर होतो. पूर्वी हा पावणेर गोंधळकर करीत असत. हल्लीं पावणेराचें जेवण मराठे गांवकर करतात. हा दशमीचा पावणेर आटोपल्यावर देव श्रीरवळनाथाच्या देवालयांत जातात. देवाच्या तरंगांचीं नांवें– भूतनाथ, रवळनाथ, पावणाई, कालिका अशीं आहेत.

**महा एकादशी**-आषाढ शुद्ध एकादशीस पंढरपूरप्रमाणें येथें मोठा उत्सव होतो. सकाळीं नित्याची देवपूजा झाल्यावर कुडाळदेशकर गौड ब्राह्मण शुचिर्भूत होऊन श्रीदेवनारायणाची पूजा करतात,नंतर सर्व लोक देवदर्शनाचा लाभ घेतात. दुपारीं १२ वाजल्यापासून रात्रीं बारा वाजेपर्यंत ब्राह्मण लोक पौमानाची आवृत्ति करतात. नंतर जागरास सुरवात होते. ह्या जागरांतील पुराण कीर्तन वगैरे कार्यक्रम पहाटेंपर्यंत चालू असतात. पहांटेस काकड आरती होते.

**श्रावण महिना** सर्व महिनाभर जागर होतात. यांतील नित्याचे आठ जागर सोडून बाकीच्या जागरांस तेल व खिरापतीचे नारळ देण्यासाठीं देवस्थान इनाम ठिकाण ' किराचें टेम ' उपभोगणार कृष्णाजी नारायण देसाई यांनीं द्यावयाचें. दररोज तेल पाऊण शेर व नारळ दोन. ह्या जागरास लागणारी पानसुपारी देवस्थान इनाम ठिकाण' आगर 'उपभोगणार पुजारी यांनीं द्यावयाची.

**पोवत्याची पौर्णिमा** श्रावण शुद्ध पौर्णिमेस पोवत्याची पौर्णिमा असते.

**जन्माष्टमी** श्रावण व ॥ ८ स जन्माष्टमीचा उत्सव होतो. त्या दिवशीं वाटाण्याच्या घुगऱ्या व वीस नारळांची खिरापत वाटण्यांत येते. हे नारळ पुजारी घराण्यानें द्यावयाचे. यासाठीं त्यांना देवस्थान ठिकाण इनाम आहे. देसाई कुडाळदेशकर घरीं कृष्णपूजा करीत नाहीं.

**भाद्रपद** नित्याचे आठ जागर होतात.

**शिवलग्न** आश्विन महिन्यांत नित्याचे आठ जागर होतात. त्याशिवाय शु ॥ ८ व ९ स असे दोन जागर जास्त होतात. विजयादशमीस शिवलग्नाचा मोठा उत्सव होतो. हा उत्सव गांवांतील मराठे–गांवकर यजमानपणा घेऊन स्वतः करतात. ह्या उत्सवांत श्रीदेव रवळनाथाच्या देवालयांतील तरंगें श्रीदेव नारायणाचे देवालयांतील उत्सव संपल्यावर पावणेरास येतात. तीं तेथें आषाढ शु ॥ १० मीपर्यंत असतात.

## कार्तिक महिन्याचे जागर

आश्विन शु॥११ पासून कार्तिक शु ॥ ११ पर्यंत कार्तिक महिन्याचे जागर होतात. या जागरांस नित्य आठ जागरांस मिळणारें तेल वजा करून बाकी जागरांस पूर्वीं देवस्थान उत्पन्नांतून तेल मिळत असे. सदर जागरांस रोज पानसुपारी व दोन नारळांची खिरापत वांटण्यासाठीं देवस्थान इनाम मिळकत पुजारी यांजकडे आहे. पहांटेस कांकडआरती होते.रोज चार पायली-प्रमाणें पोहे, जमलेल्या लोकांस प्रसाद म्हणून वाटण्याची पद्धत आहे. हे पोहे, देवस्थान इनाम मिळकत ' पोहयांचा कुणगा ' वगैरे ठिकाणांतून उपभोगणार गणेश नारायण व कृष्णाजी नारायण देसाई यांजकडून मिळावयाचे. या जागरांत, दोन्ही एकादशींच्या दिवशीं शिल्लक राहिलेले

आठ पायली पोहे,कार्तिक शु.१२दिवशीं श्रीची स्वारी लवाजम्यासह पालखींतून श्रीमाऊलीच्या भेटीस जेव्हां जाते तेव्हां त्या ठिकाणीं होणाऱ्या तुलसीविवाहानंतर वाटले जातात. हा तुलसीविवाह मराठे—गांवकर करतात.

नंतर श्रीची पालखी त्याच दिवशीं देवालयांत परत येऊन देवालयाच्या समोरील तुलसी वृन्दावनाजवळ ती ठेवण्यांत येते. तुलसीविवाह प्रथम गाभाऱ्यांत होतो व नंतर वृंदानाजवळील पालखींतील मूर्तिबरोबर होतो. विवाहाचा कार्यक्रम आटोपल्यावर मुखशाळेमध्यें तीन खंडी पोहयांची रास करतात. हे पोहे, गणेश नारायण व कृष्णाजी नारायण देसाई यांचेकडून देवस्थान इनाम मिळकतींतून देतात. देव, ब्राह्मण, देसाई, गांवकर वगैरे मानकरी व देवस्थान नोकर, इतर जमलेले लोक यांना हे पोहे **विवाहाचा प्रसाद** म्हणून वाटण्यांत येतात. पोहयांबरोबर मिळणारे साठ नारळ दोन पायली पोहयांस एक याप्रमाणें वाटले जातात.

टीपः—वरील तुलसी लग्नादिवशीं जाणारी पालखी घेण्याचें काम पूजारी यांचे माणूस गंवडे वगैरे लोक करतात.

## महाएकादशी

कार्तिक शु ।। ११ ही महा एकादशी असल्यामुळें पंढरपूर येथील उत्सवाप्रमाणेंच या ठिकाणीं उत्सव होतो. या दिवशीं नित्य देवपूजा झाल्यानंतर कुडाळदेशकर गौड ब्राह्मण श्रीदेवनारायणाची पूजा करतात. नंतर दुपारीं बारापासून रात्रौ बारा वाजेपर्यंत पौमान गायिलें जातें. मग पुराण झाल्यावर देवाची पालखी मिरवणुकींतून निघते. ( ह्या दिवसापासून दर सोमवारीं मृग नक्षत्रापर्यंत ही पालखी निघत असते. ) या पालखीसाठीं होणाऱ्या खर्चाचें तेल कृष्णाजी नारायण देसाई यांनीं देवस्थान इनाम मिळकतींतून द्यावयाचें आहे. ( दर सोमवारीं पाऊण शेरप्रमाणें ) एकादशी दिवशींचा पालखीचा कार्यक्रम आटोपल्यावर वालावलकर दशावतारी हे दशावतारी जत्रेचें मुहूर्ताचें गणपतिपूजन करतात. यावेळीं श्रीदेव लक्ष्मीनारायणाचा प्रसाद म्हणून नारळ घेतात व आपल्या पेटींत ठेवतात आणि दुसऱ्या दिवसापासून आपापल्या नेमणुकीच्या जत्रांस सुरवात करतात. पहांटेस कांकड आरती होऊन उत्सव समाप्त होतो. सदर

एकादशीच्या जागरास लागणारें पंधरा शेर तेल कृष्णाजी नारायण देसाई देवस्थान इनाम मिळकतींतून देतात. दोन्ही महाएकादशीच्या दिवशीं श्रीक्षेत्र पंढरपूर येथें देसाई घराण्यांतील लोकांनीं जावयाचें नाहीं असा संकेत आहे.

## वैकुंठ चतुर्दशी

कार्तिक शु ॥ १४ स श्रीदेव नारायणाची जत्रा भरते. पुराण कीर्तन वगैरे कार्यक्रम झाल्यावर वालावलकर दशावतारी आपली जत्रा करतात. पहांटेस दह्याचें गाडगें दारवळकर देसाई यांनीं फोडावयाचें व जत्रेचा उत्सव संपवावयाचा. या उत्सवास लागणारें तेल व गाडगें वगैरे खर्चासाठीं देवस्थान इनाम ठिकाण ‘ डोबा ’ दारवळकर देसाई यांचेकडे आहे.

## टिपरांची पौर्णिमा

कार्तिक शु॥ १५ ला सकाळीं टिपरांच्या समाराधनेसाठीं तांदूळ वांटावयाचे असतात. हे एक खंडी सोळा पायल्या तांदूळ देवस्थान इनाम मिळकत ‘ टिपरांचें तळें ’ उपभोगणार कृ. ना. देसाई यांनीं द्यावयाचे. हे तांदूळ देव, ब्राह्मण, देसाई, गांवकर व देवस्थान नोकर यांना नियमाप्रमाणें वांटले जातात. दुपारीं टिपरांची समाराधना होते. समाराधनेचें जेवण श्रीदेवालयाच्या आंतील गाभाऱ्यासमोरील चौकांत बसून ब्राह्मण करतात. जेवणांत मुख्यतः कोहाळा वापरावयाचा असतो. कार्तिक शु॥ १२ च्या पोहच्यांचें तीन खंडी माप व वरील उत्सवांतील तांदुळांचें माप करणें हें काम मराठा गांवकरानें करण्याची वहिवाट आहे. संध्याकाळीं टिपर पाजळण्यांत येतात. सदर टिपरांस लागणारें एक मण पांच शेर तेल गणेश नारायण देसाई यांनीं देवस्थान इनाम मिळकतींतून द्यावयाचें. टिपर पाजळल्यावर देवाचे जागरास सुरवात होते. पुराण कीर्तन आटोपल्यावर देवाची दृष्ट काढतात. ही दृष्ट मराळ विर्तिकानें काढावयाची, नंतर ब्राह्मण मंत्राक्षता देतात. तुळशीचा महाप्रसाद देतात.

## कोजागिरी

आश्विन शु॥ १५:–कोजागिरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशीं जागर

आटोपल्यानंतर रात्रौ देवाचा प्रसाद म्हणून नारळाचें पाणी व गूळ वाटला जातो. या पौर्णिमेस लागणाऱ्या जागराच्या खर्चास देवस्थान जाबत्यांत नेमणूक आहे.

कार्तिक वद्य प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत नेहमीप्रमाणें सोमवार, एकादशी, अमावास्या हे जागर होतात.

## मार्गशीर्ष

मार्गशीर्ष शु।। प्रतिपदेपासून मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेपर्यंत नित्य जागर होतात. यांतील सोमवार, एकादशी, पौर्णिमा या जागरांचें तेल वजा करून बाकी जागरांस देवस्थान उत्पन्नांतून तेल वगैरेसाठीं जाबत्याबरहुकूम नेमणूक मिळते. मार्गशीर्ष व।। प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत सोमवार एकादशी अमावास्या याप्रमाणें जागर होतात.

## पौषांतील जागर

**पौष** प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत सोमवार एकादशी पौर्णिमा हे जागर होतात. पौष वद्य प्रतिपदेपासून तों माघ शु।। पौर्णिमेपर्यंत नित्य माघ महिन्याचे जागर होतात. यांतील सोमवार, एकादशी, पौर्णिमा, अमावास्या हे नेहमीचे जागर वजा करून बाकी जागरांस दत्तात्रय रामचंद्र उपाध्ये हे रोज पाऊण शेरप्रमाणें तेल, देवस्थान इनाम मिळकत भोगून देत असतात.

**माघ महिना**—माघ शु।। पौर्णिमेदिवशीं टिपर पाजळतात. या टिपरांस लागणारें तेल आत्माराम नारायण टिपरे हे देवस्थान इनाम मिळकत भोगून देत असतात. टिपर पाजळल्यावर माघ महिन्याची सांगता होते.

## महाशिवरात्र

माघ वद्य प्रतिपदेपासून माघ वद्य अमावास्येपर्यंत नेहमीप्रमाणें सोमवार एकादशी, अमावास्या हे जागर होतात. याशिवाय व।। चतुर्दशी दिवशीं महाशिवरात्रीचा उत्सव होतो. ह्या उत्सवास खिरापतीसाठीं वीस नारळ, पुजारे यांनीं देवस्थान इनाम मिळकतींतून द्यावयाचे. याशिवाय वाटाण्याच्या घुगऱ्या व जागरास तेल देसाई वकीलांनीं द्यावयाचें असतें.

## फाल्गुन

फाल्गुन शु।। १ पासून फाल्गुन वद्य अमावास्येपर्यंत नेहमीप्रमाणें सोमवार एकादशी पौर्णिमा अमावास्या हे जागर होतात.

ह्या देवालयाकडे वरील सर्व होणाऱ्या जागरांस मृदंग वाजविण्याचें काम व धुपारतीच्या विस्तवासाठीं ढोण ठेवणें हीं कामें चालू वसंत राजाराम वालावलकर व त्याचे पोटभागदार मिळून करीत असतात. याबद्दल त्यांना देवस्थान इनाम ठिकाण आगर व ढोणाचा डोंगर व बोंदाचा कुणगा (मृदंगास पीठ लावणें) भोगत आहे.

त्याचप्रमाणें जागरास पुराण सांगण्याबद्दल देवस्थान इनाम ठिकाण घराकडील आगर वगैरे मिळून दामोदर शिवराम भट पुराणिक यांस भोगत आहे. याशिवाय त्यांना कोल्हापूर सरकारची गांवांतील नेमलेल्या पारपतदार मार्फत नेमणूकहि मिळत असते. त्याचप्रमाणें हरिदासबुवा रामचंद्र अनंत स्वरमंडळी यांनाही वरील सर्व जागरांस कीर्तन करण्या-साठीं जाबत्याप्रमाणें इनाम मिळकत भोगत आहे. देवळांतील नित्य झाडलोट व देवस्थानकडून मिळणाऱ्या तेलाची दिवाबत्ती करणें व देवळांत हजर रहाणें वगैरे सर्व कामांबद्दल देवस्थान इनाम मिळकत भोगत आहे.

## श्रीदेवनारायणास लागणारे प्रसाद


सफेत देवचापयाच्या फुलांच्या पाकळ्यांचे प्रसाद लागतात. सोमवार व एकादशी ह्या दिवशीं प्रसाद लावले जात नाहींत. प्रसादाच्या खुणा समजूं शकणारीं गांवांत दोनचार माणसें आहेत. प्रत्येक प्रसादाला एक विवक्षित अर्थ आहे. उजव्या अगर डाव्या बाजूच्या प्रसादावर बरेवाईटपणा अवलंबून नाहीं. देवाचा पुजारी प्रसाद लावतो.

अनुक्रमांक 23282 वि. ... 441
क्रमांक 2378
दिनांक 21514

# वालावलीच्या विकासाचें स्वरूप

लेखकः– एस. जी. वालावलकर

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी महात्मा गांधींनीं सांगितलें कीं, भारताचा




आत्मा त्याच्या असंख्य खेडयांत आहे आणि तेव्हांपासून ग्रामीण जीवन समृद्ध करण्याबद्दलच्या कल्पना व योजना सुरू झाल्या. अगदीं अलिकडे आपली प्रथम पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून समाज–विकास–योजना व नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिस यांच्यामार्फत ग्रामसुधारणेचें काम व त्याच्या बरोबर खेडुतांचा दर्जा व सर्वांगीण संस्कृतिसंवर्धन यांसाठीं खुद्द सरकारतर्फेच जारीचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर बऱ्याचशा खेडयांतील सुशिक्षित व समंजस व्यक्तींनीं आपल्या गांवच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं ग्रामसंस्था सुरू केल्या आहेत. यामुळें या कार्याला जास्तच

बळकटी येत आहे. थोडक्याच अवधींत मुंबई राज्यांतील सर्व भाग नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिसखालीं यावयाचा आहे. साहजिकच वालावल गांवाचा समावेश ह्या योजनेंत होण्यास फार अवधी लागणार नाहीं.

सुदैवानें कै. रावबहादूर अनंत शिवाजी देसाई यांसारखे कर्तबगार श्रीमंत व आपल्या गांवाबद्दल अतिशय कळकळ असणारे सुपुत्र वालावल गावांत जन्मले व भरभराटीस आले. त्यामुळें गांवाच्या सुधारणेचें कार्य गेल्या चाळीस पन्नास वर्षांपासूनच सुरू झालें. सुमारें एकोणीसशेंपासून एकोणीसशें पसतीसपर्यंतच्या कालांत, गांवांत चांगले रस्ते, धर्मशाळा, तलाव, अन्नसत्र, ग्रंथसंग्रहालय ह्या सर्व गोष्टी रा. ब. अनंत शिवाजी देसाई व त्यांचे सुपुत्र कै. नारायणराव अनंत देसाई यांच्या औदार्यामुळें व आस्थेमुळें गांवाला उपलब्ध झाल्या. त्यानंतर मात्र सुमारें सतरा अठरा वर्षांचा काल एक तऱ्हेच्या निष्क्रियतेंतच गेला. त्यामुळें वर उल्लेखिलेल्या उपयुक्त गोष्टी सुव्यवस्थेंत ठेवतां येतील किंवा नाहीं याबद्दलच शंका वाटूं लागली. या शंकेंतूनच सुमारें पांच वर्षांपूर्वी " वालावल ग्रामस्थ संघाची " स्थापना झाली. त्याच्या कांहीं काल पूर्वी स्थापन झालेल्या " वालावल मल्टीपरपज कोऑपरेटिव्ह सोसायटीनेंहि " चांगलें कार्य केलें, त्याचप्रमाणें ग्रामस्थ संघानेंहि थोडक्याच अवधींत आपल्या मर्यादित शक्तीच्या दृष्टीनें स्पृहणीय कामगिरी बजावली. वर सांगितल्याप्रमाणें समाजविकास योजना अथवा एन. इ. एस ब्लॉक यामध्यें समावेश झाल्यानंतर वालावल गांवाला इतर गांवाप्रमाणें त्याचा फायदा मिळेलच. परंतु या गांवाचीं कांहीं खास वैशिष्ठ्यें आहेत कीं जीं दृष्टीआड करतां येणार नाहींत व त्यांच्या अस्तित्वामुळे गांवची सर्वांगीण उन्नति करणें अधिक सुलभ होईल.

गांवाच्या उत्तर दिशेला कर्लीनदीचा प्रवाह वहात असून माल-वहातुकीची चांगली सोय आहे. गांवच्या दक्षिण दिशेला असलेल्या डोंगरांत भरपूर प्रमाणांत सिलिका आढळते. गेल्या कांहीं वर्षांपासून ही सिलिका मुंबईस फार मोठ्या प्रमाणांत निर्यात होते. तिचा कांचसामानासाठीं खास उपयोग होतो. त्या दृष्टीनें सहकारी तत्वावर भांडवल उभें करून एखादा कांच कारखाना सुरू करतां आल्यास ग्रामस्थांना फायदेशीर होईल. याच

दिशेला डोंगरांतून सागाचीं झाडें आढळतात. अर्थात सागाची खास लागवड केलेली नसल्यामुळें ह्या झाडांची वाढ व संख्या मर्यादित आहे. याच्यावर खास मेहनत घेऊन शास्त्रीय दृष्टीनें सागाची लागवड केल्यास, त्याचें भरपूर उत्पन्न काढतां येईल आणि इमारतीसाठीं लागणारें लाकूड बाहेरून आणावें लागणार नाहीं. या बाजूचा बराचसा भाग डोंगराळ व उतरणीचा असल्यामुळें ती जमीन शेतीला उपयुक्त नाहीं; आणि ह्या वरकस जमिनींत जी शेती करण्यांत येते ती मुळींच फायदेशीर होत नाहीं; उलट दर वर्षी पावसाळ्यांत पाण्याच्या उतरत्या ओघाबरोबर मातीची धूप वाढत्या प्रमाणांत होऊन ही जमीन दिवसेंदिवस जास्त निकस होत जाते. अशा स्थितींत उपयुक्त फळझाडें ( आंबा, काजू वगैरे ) लावणें फायदेशीर आहे. त्यामुळें जमिनीची धूप थांबून ती जास्त सकस होईलच; शिवाय पावसाळ्यांत जें पाणी वाहून अजिबात फुकट जाते व डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या शेतीस हानिकारक ठरतें, त्यांतील बराचसा भाग जमिनींत जिरून जाईल व भूगर्भांतील पाण्याचा सांठा तेवढ्या प्रमाणांत वाढेल. या दृष्टीनें अशा डोंगराळ भागांत उपयुक्त झाडांची शास्त्रीय दृष्ट्या लागवड करणें आवश्यक ठरेल. अर्थात या कामीं शेतकी आणि जंगल-खात्यांतील तज्ञांचें सहाय्य घ्यावें लागेल.

गांवांतील कांहीं उंचवट्यांच्या जागीं लाल इमारती दगड भरपूर प्रमाणांत मिळतो. योग्य यंत्रसामुग्री व रस्ते हीं उपलब्ध झाल्यास या ठिकाणीं मिळणारे दगड इमारतीच्या कामासाठीं आसपासच्या खेड्यांतील ग्रामस्थांना स्वस्त किंमतींत मिळूं शकतील. रत्नागिरी जिल्ह्याच्या बऱ्याचशा टापूंत लाल रंगाची माती ठिकठिकाणीं आढळते. त्यावरून त्या भागांत लोखंडाच्या खाणी असाव्यात असा तर्क आहे. अर्थात शास्त्रीय दृष्ट्या त्या मातीचें पृथःकरण करून त्यांत लोखंडाचें किती प्रमाण आहे हें ठरवावें लागेल. वालावलमधील बऱ्याच भागांत ही लाल माती सांपडते. स्थानिक लोक तिचा उपयोग आपलीं मातीचीं घरें रंगविण्यासाठीं करतात.


गांवच्या कांहीं कांहीं भागांत इतर तऱ्हेची रंगीत माती आढळते

या मातीचा उपयोग, डिसटेंपर किंवा इतर जातीच्या रंगामध्यें वापरण्याच्या कामीं होण्याची शक्यता आहे. याबद्दलचें संशोधन हितकारक ठरेल.

वालावल गांवांतील प्राचीन देवस्थान हें एक पांच सहा शतकें सांस्कृतिक केंद्र होतें. ह्या देवस्थानच्या निमित्तानें त्या ठिकाणीं विद्वान शास्त्री, कलावंत व व्यापारी यांची ये-जा सुरू असे. याचा परिणाम असा झाला कीं, ज्या वेळीं आसपासचीं असंख्य खेडीं फार मागासलेल्या अवस्थेंत होतीं, त्याच वेळीं ह्या ठिकाणची सामान्य जनताहि तौलनिक दृष्टया जास्त सुशिक्षित व पुढारलेली होती. सांस्कृतिक व नैतिक दृष्टया येथील समाजाची पातळी कांहीं शतकें उंचावलेली होती. अर्थात दिवसेंदिवस इतर गांवाप्रमाणेंच येथेंही ही पातळी खालावलेली दिसली तर नवल नाहीं.

सारांश वालावल हा एक मध्यवर्ति गांव असून येथील उपलब्ध नैसर्गिक संपत्ति, सांस्कृतिक परंपरा, जलमार्गाची सोय, अगोदरच उपलब्ध असलेल्या सुखसोई ( शिक्षणसंस्था, दवाखाना, अन्नसत्र, इंग्रजी शाळा, वाचनालय, सडका, तलाव वगैरे ) ह्यामुळें ही भूमि तयार असून समाजविकास योजनेमुळें अल्पखर्चांत एक आदर्श गांव म्हणून वालावल गांवाला स्थान मिळूं शकेल अशी आशा वाटते.

# राजघराणें



भानजी प्रभुदेसाई यांचा शिक्का व सही

बाराव्या शतकाच्या आरंभीं गोमप्रभु नांवाचा राजा कुडाळ येथें राज्य करीत होता. त्यानें सबंध कोंकणप्रांत पादाक्रांत केला होता. या गोमप्रभूचा उल्लेख शिलाहार ताम्रपट शके १०१६ यामध्यें केला आहे. श्रीदेवनारायणाच्या जामदारखान्यांत एक शिरपेंच असून त्याच्या मागें कोरणांत 'गोम' अशीं अक्षरें कोरलेलीं आहेत. तो याचाच असावा. दिगवळें गांवीं सांपडलेल्या देमनृपाच्या ताम्रपटावरून (कुडाळदेशकर पा. ४६ ते ६१ ) सन १२६३ मध्यें कुडाळांत देमभूपाल राज्य करीत होता असें दिसतें. कुडाळ प्रांतांतील शिवालयें यानेंच बांधलीं. पंढरपूरच्या विठोबाच्या देवळास ह्या देमानें देणगी दिल्याचा चौऱ्यांयशींच्या शिलालेखांत उल्लेख आहे. कुडाळ येथील कर्ली नदीवर बांधलेला संध्याघाट याच्या कारकीर्दीतला.

चौदाव्या शतकाच्या आरंभीं सूर्यभान आणि चंद्रभान प्रभुदेसाई ह्या पराक्रमी बंधुद्वयांची कारकीर्द आढळते. श्रीदेवनारायण देवालयाचें अप्रतीम बांधकाम, शिल्पकाम, यांच्याकडुन झालेलें आहे. देवस्थानच्या खर्चास अर्ध्या गांवचें उत्पन्न त्यांनीं नेमणुका करून, देऊन टाकलें. ह्या बंधुंचीं स्मारकें श्रीनारायणासमोर 'कल्याणपुरुष' म्हणून उभीं आहेत असें सांगतात.

चंद्रभान सूर्यभानानंतर प्रभु हे यादवांचे अंकित बनले. पुढें यादवांची सत्ता नष्ट झाल्यावर ते स्वतंत्र झाले. पुढें विजापूरकरांच्या अविसत्तेंत प्रभु हे कुडाळ प्रांताचे सरदेसाई नेमले गेले. इ. स. १६९७ पर्यंत कुडाळ प्रांताचे सरदेसकीचे अधिकार प्रभुदेसाई यांचेकडेच होते. कुडाळच्या गादीवर बसलेला शेवटचा सरदेसाई 'नारायण प्रभु' हा होय.

जोगण प्रभु, श्रावण शु।। शनिवारीं इ. १६९७ त सावंताबरोबर लढत असतां धारातीर्थी पडला. ह्या जोगण प्रभूच्या दोन बायकांस श्रीशंभु छत्रपति यांनीं योगक्षेमाकरतां आडेली गांव इनाम दिल्याची सनद प्रसिद्ध आहे ती अशी :—

॥ श्री ॥

" स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी नाम संवत्सरे कार्तिक बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं–राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान व भावी सुभा परगणे कुडाळ यांसी आज्ञा केली ऐसीजे. जोगणप्रभु देसाई परगणे मजकूर हे पूर्वी कोट कुडाळ येथें होते. त्यांस खेमसावंतानें कोटास परीध घालून कोट हस्तगत केला. ते समयीं बरी शर्थ करून जोगणप्रभु स्वामी कार्यावर खर्च जाहला. त्यांच्या बायका काशीबाई व येसूबाई उभयता आहेत. त्यांचा योगक्षेम चालवावा हें स्वामीस आवश्यक. यास्तव स्वामी उभयतां बायकांवर कृपाळू होऊन शंभर होन निशाणी होनांचा गांव इनाम द्यावा असा सिद्धांत करून यांस नूतन इनाम कुलबाब कानू खेरीज हकदार व इनामदार मौजे अडेली तालुका तळवडें हा गांव इनाम अजरामर करून दिला असे. तरी तुम्ही मौजे मजकुरीं सदहू प्रमाणें इनाम यांस नेमून देऊन बायकांचा योगक्षेम चालवून सुखरूप रहात ते गोष्ट करणें साल दरसाल: ताजे सनदेचा उजूर न करणें. तालीक लिहून घेऊन अस्सल सनद परतोन देणें जाणिजे निर्देश समक्ष- मोर्तब असे."

जोगणप्रभूच्या मागाहून नारायण प्रभु मुलांमाणसांसह वालावलीस पळून गेला. तेथें एका रात्रींत देवस्थानची व्यवस्था लावून मालवणास कोल्हापूरकरांच्या आश्रयास जाऊन राहिला. वर निर्देश केलेल्या जोगण-प्रभूचा आजोबा कृष्ण प्रभु यानें मालवणच्या सिंधुदुर्गाच्या बांधणीच्या कामीं शिवाजी महाराजांस मदत केलेली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इ. स. १६९७ पासून पुढें कुडाळ प्रांतावर सावंतांची सत्ता प्रस्थापित झाली. [ विस्तारभयास्तव देसाई घराण्याची विस्तृत माहिती देतां आलेली नाहीं. —लेखक ]

# उद्योग आणि व्यापार क्षेत्रांतील व्यक्ति

## कै. महादेव गोविंदशेठ वणजारी

दक्षिण कोकणांतील एक वजनदार आणि दानशूर व्यापारी म्हणून त्यांचा लौकिक होता. यांचें वालावलींतील भव्य दुकान आज इतिहासजमा झालें आहे.

## रा. ब. अनंत शिवाजी देसाई, टोपीवाले



'शतेषु जायते शूर:
सहस्रेषु च पण्डितः।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता
भवति वा न वा ॥'

'टोपीवाले' हें नांव महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेर भारतांत सर्वांच्या परिचयाचें आहे हें नांव उच्चारतांच मनांत आदराची भावना निर्माण होते. प्रतिकूल परिस्थिति, शिक्षणाचा अभाव, हातांत ना पैसा अशा स्थितींत मुंबईच्या किनाऱ्यावर १८६५ सालीं एका मचव्यांतून उतरलेला अनंता, काबाडकष्ट करून दीर्घोद्योग, कल्पकता व चिकाटी या गुणांच्या जोरावर पुढें क्रोडोपति बनला आणि मिळविलेल्या संपत्तीचा उपयोग आपल्या समाजबांधवांसाठीं करून त्यांच्या उत्कर्षाचा पक्का पाया त्यांनीं घातला. स्वतःच्या उत्कर्षाबरोबर स्वज्ञातीला उत्कर्षाप्रत नेणारा अशा प्रकारचा अलौकिक पुरुष शतकांतून एखादाच निर्माण होतो.

श्री.भाऊसाहेब ७ मे १८५३ रोजीं कुडाळ पेटयांतील वालावल गांवीं जन्मास आले. परंतु कांहीं अपरिहार्य संकटामुळें बालपणींच आपल्या वडिलांबरोबर त्यांना आपलें जन्मगांव सोडून झारापी गांवीं रहावें लागलें. त्या ठिकाणीं कुडाळ–सावंतवाडी रस्त्यावर एक लहानशी झोपडी बांधून ते खाण्याचे पदार्थ विकत असत. याच ठिकाणीं छोटया अनंतानें व्यापाराचा श्रीगणेशा गिरविला होता. अनंता बारा वर्षाचा होतो न होतो तोंच वडील निधन पावले आणि चरितार्थाचें कांहींच साधन नाहीं असें पाहून एका शेजाऱ्याकडून खर्चासाठीं म्हणून एक रुपया घेऊन अनंतानें कोंकण सोडलें.

ग्रँटरोड स्टेशनच्या बांधकामावर मजुर म्हणून काम करणारा अनंता कांहीं दिवसांनीं माणिकजी पेटीट मिलमध्यें काम करून थोडथोडा पैसा संग्रहीं टाकून पुढें थोडयाच अवधींत फेरीवाल्याचा धंदा करूं लागला. याच सुमारास एक सरकारी कंत्राट घेण्याची लहर अनंताला आली. परंतु अनुभव नसल्यामुळें त्याला त्यांत नुकसान सोसावें लागलें. तरीही खचून न जातां इ. स. १८७५ सालीं झवेरी बाजारांत त्यानें एक लहानसें टोप्यांचें दुकान उघडलें. ह्या दुकानाचा व्याप वाढतां वाढतां इतका वाढला कीं मुंबईंतील व्यापारी वर्गांत भाऊसाहेब टोपीवाले या नांवानें ते ओळखले जाऊं लागले. पुढें भाऊसाहेबांनीं सर्व प्रकारच्या टोप्या बनविण्यास सुरुवात करून त्यासाठीं लागणारा माल ते विलायतेहून मागवूं लागले. कल्पक व शोधक बुद्धीच्या भाऊसाहेबांना नुसत्या टोप्यांच्या धंद्यांत समाधान वाटेना. तेव्हां १८८४ मध्यें जर्मन सिल्व्हरचे पत्रे, गोप, लहान लहान दागिने आणि भांडीं बनविण्यास त्यांनीं सुरुवात केली. याही धंद्याचा व्याप अतिशय वाढून जर्मनसिल्व्हरचे पत्रे त्यांना विलायतेहून मागविणें भाग पडलें. पुढें १९०१ मध्यें लॅमिंग्टन रोडवर त्यांनीं स्वतः एक कारखाना सुरू केला. शिवाय १८८१ मध्यें पिक्चर्स खातें उघडून प्रसिद्ध रविवर्म्याचीं हिंदू देवतांचीं चित्रें विकण्याचा जोडधंदा सुरू करून आपल्या व्यापारास त्यांनीं बळकटी आणली.

## श्री. शिवाजी अनंत देसाई टोपीवाले

रावबहादूर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव.



सुदरराव ह्या नांवानें ते ओळखले जात. त्यांचा जन्म २४ सप्टेंबर १८८३ मध्यें झाला. वडिलांच्या दुकानीं पिक्चर डिपार्टमेंटमध्ये ते नोकरी करीत. ते स्वभावानें मानी, करारी आणि स्वतंत्र वृत्तीचे होते. दुकानच्या. नोकरांनीं आपापलीं कामें वक्तशीरपणें व व्यवस्थित केलीं पाहिजेत, यावद्दल त्यांचा कटाक्ष असे. त्यावरून त्यांचे नोकरांबरोबर कित्येकदां खटके उडत. रावबहादुरांना आपला मुलगा वरचढ झाला असें वाटे. त्यांच्यांतील मतभेद पुढें विकोपास गेले आणि वडिलांच्या इच्छेप्रमाणें ते १९०८ मध्यें घराबाहेर पडले. ह्या गोष्टी घडण्यांत कांहीं मतलबी ज्ञातिबांधवांचा हात नसेल असें म्हणवत नाहीं. ह्या क्रोडोपतीच्या मुलाला पुढें कांहीं वर्षे वनवासी जीवन कंठावें लागलें. गिरगांव नाक्यावरील सार्वजनिक नळावर आंघोळ करून तेथील फूटपाथवर झोंपून त्यांनीं उपाशीपोटीं दिवस काढले. रावबहादुरांची आपल्यावर अवकृपा होईल म्हणून त्यांना कोणीहि आपल्या घरीं आश्रय देईना. मुंबई हायकोर्टांत त्यांनीं लावलेला दावा त्या वेळीं फार गाजला. अखेर कांहीं बड्या व्यक्तींनीं मध्यस्थी करून सुंदररावांना दावा मागें घेण्यास भाग पाडलें. ह्या व्यवहारांतहि मध्यस्थांनीं त्यांना तोंडघशीं पाडलें असें सांगतात. पुढें त्यांच्या मातोश्रींनीं

त्यांना गुप्तपणें बरीच मोठी रक्कम उद्योग धंदा करण्यासाठीं दिली. त्यावरून तिच्या थोर मातृहृदयाची कल्पना येते. पुढें सुंदररावांनीं आपल्या नांवानें गिरगांव नाक्यावर स्वत:चें दुकान काढलें आणि तें आजतागायत चालू आहे. सुंदररावांनीं पत्नीच्या मृत्यूनंतर आपल्या मुलास स्वत:कडे नेलें. श्री. गजाननराव हे हल्लीं आपल्या वडिलांचें दुकान चालवितात. त्यांना एक शिवाजी नांवाचा मुलगा आहे. १ जानेवारी १९४० मध्यें सुंदरराव उर्फ शिवाजी अनंत देसाई हे मुंबई येथें निधन पावले. महाराष्ट्रांतील एका श्रेष्ठ दानशूर उद्योगपतीच्या ज्येष्ठ पुत्राला स्वाभिमानासाठीं गृहत्याग करण्याचा प्रसंग यावा, त्याचे वाजवी हक्क त्याला नाकारले जावे आणि ज्ञातिबांधवांकडून त्याला सहानुभूति लाभूं नये, ह्या साऱ्याच घटना खेदजनक होत !

## श्रीमंत नारायणराव टोपीवाले

जन्म १८८५ ] [ मृत्यु २७ ऑक्टोबर १९३३

कै. रा. ब. अनंत शिवाजी यांच्या मागून नारायणराव दुकानाचे चालक झाले. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत मोठा दानधर्म केला. बोर्डी येथील भिसेस्कीमला त्यांनीं कित्येक हजार रुपयांची मदत केली. नारायण देवालयाचा सभामंडप त्यांनींच बांधला. सावंतवाडी येथील टेक्निकल स्कूल, वालावल येथील इंग्रजी मराठी शाळा त्यांनींच स्थापन केल्या. विद्यावृद्धि फंड, दाभोली मठ, वसतिगृह, फॉरिन एज्युकेशन स्कॉलरशिप यासाठीं त्यांनीं सहस्रावधि रुपये खर्च केले. १९३० च्या स्वदेशीच्या चळवळींत कॉंग्रेस हॉस्पिटलला त्यांनीं १० हजार रुपये देणगी दिली. आजोळीं मुणगें येथें नर्मदाबाई स्कूल काढलें. सरकारनें त्यांना रावसाहेब ही पदवी देऊं केली; पण त्यांनीं तिचा स्वीकार केला नाहीं. त्यांच्या स्मरणार्थ श्री. मोतीरामशेठ यांनीं राजापूर येथें ॲग्रिकल्चर कॉलेज स्थापन केलें.

# दानशूर श्रीमान मोतीरामशेठ टोपीवाले



श्रीमान मोतीरामशेठ नारायणराव देसाई टोपीवाले यांचा जन्म २२ मार्च १९१६ मध्यें मुंबई येथें झाला. त्यांच्या आईचें नांव सौ. लक्ष्मीबाई. त्या भाद्रपद तृतियेस ( १९३२ ) वारल्या. त्यांचें माध्यमिक शिक्षण चिकित्सक व एल्फीस्टनमध्यें झालें. क्रिकेट्, बॅडमिंटन, टेनीस हे त्यांच्या आवडीचे खेळ. २७ ऑक्टोबर १९३३ मध्यें नारायणराव वारल्यावर धंद्याची जबाबदारी त्यांच्या शिरावर पडली. टोपीवाला मेडिकल कॉलेजला त्यांनी पांच लक्ष रुपयांची उदार देणगी दिली.

वसई येथील टोपीवाला कॉलेजला त्यांनीं एक लक्ष रुपये दिले. राजापूर येथील शेतकी कॉलेजहि त्यांच्याच देणगीमुळें अस्तित्वांत आलें. त्यांनीं ज्ञातींत व ज्ञातीबाहेर शैक्षणिक, वैद्यकीय, आणि धार्मिक संस्थांना दिलेल्या देणग्यांचा एकूण आंकडा सुमारें तीस लक्ष रुपयांबाहेर असेल. जीवनाच्या नानाविध पैलूंचा त्यांनीं घेतलेला अनुभव फार मोठा असून कोणत्याहि परिस्थितींत परमेश्वरावरील श्रद्धा तिळमात्र ढळूं न देतां धैर्यानें ताठ उभें राहण्याची त्यांची आत्मिक शक्ति अभिनंदनीय आहे. त्यांना विलास ह्या नांवाचा एक मुलगा आहे. विलासबाबूंचा जन्म ९ जानेवारी १९४५ मध्यें मुंबईंत झाला. सेंट मेरी हायस्कूलमध्यें ते ९ वींत शिकत असून बुद्धिमान व हुषार विद्यार्थींत त्यांची गणना होते.

## श्री. सीतारामपंत नारायणराव देसाई टोपीवाले.



सुप्रसिद्ध उद्योगपति व दानशूर रा. ब. अनंत शिवाजी देसाई यांचे हे नातू होत. त्यांचा जन्म २८ जानेवारी १९३३ मध्यें गोरेगांव येथें झाला. त्यांचे वडील नारायणराव ते लहान असतांनाच वारले. त्यांचें शालेय जीवन वेंगुर्ला, पंचगणी व मुंबई येथें गेलें. १९५२ डिसेंबरला ॲटोमोबाईल्सचा अभ्यासक्रम पुरा करण्यासाठीं ते विलायतेस गेले. तेथें ३।। वर्षे राहून त्यांनीं लंडन युनिव्हर्सिटीचा सेल्स व मॅनेजमेंटचा डिप्लोमा घेतला. हल्लीं अनंत शिवाजी देसाई चॅरिटीचे ते ट्रस्टी असून निगर्वी व उपकारी स्वभाचामुळें ते लोकादरास पात्र झाले आहेत.

## कै. तुकाराम लक्ष्मण देसाई



कै. देसाई १९०६ मध्यें मुंबईस आले व रा. ब. अनंत शिवाजी देसाई यांचेकडे नोकरीस राहिले. तेथें ते अल्युमिनियम खात्याचे मॅनेजर झाले. १९१७ सालीं त्यांनीं स्वतंत्र दुकान सुरू केलें. मेटल बाजाराचे ते वीस वर्षे अध्यक्ष होते. १९४२ मध्यें आषाढ शुद्ध एकादशीस ते स्वर्गवासी झाले. त्या वेळीं त्यांचें वय चौपन्न वर्षांचें होतें. त्यांनीं आपल्या जन्मगांवीं बांधकोंड येथें शालागृह बांधून दिलें असून त्या शाळेस त्यांचेंच नांव देण्यांत आलेलें आहे.



त्यांच्या पत्नी श्रीमति राधाबाई तुकाराम देसाई ह्या हल्लीं दुकानच्या चालक व मालक आहेत. त्यांनीं विद्यावृद्धि फंड, मालवण कन्याशाळा, सावंतवाडी सूतिकागृह, वालावल येथील इंग्रजी शाळा, आजगांव व बांधकोंड येथील मराठी शाळा यांसाठीं सुमारें पंचवीस हजार रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत.

## कै. राजाराम जनार्दन वालावलकर

रंगाचे प्रसिद्ध व्यापारी



## बालपण व शिक्षण

श्री. राजारामपंत वालावलकर यांचा जन्म वालावली या गांवीं ता. ५ जुलै १८७९ मध्यें झाला. त्यांचें प्राथमिक व इंग्रजी शिक्षण सावंतवाडी येथें झालें. वयाच्या १० व्या वर्षी गोव्यांतील सावर्डे या गांवीं ते नोकरीस राहिले. यांच ठिकाणीं त्यांची व प्रसिद्ध उद्योगपति दादाजी धाकजी यांची गांठ पडली. शेटजींनीं त्यांस आपल्याकडे येण्यास सांगितलें व राजारामपंतांनींहि ही संधि हातची जाऊं दिली नाहीं.

## कारकुनींतून मॅनेजर

श्री. वालावलकर हे दादाजी धाकजी यांच्या कंपनींत प्रथम कारकून म्हणून नोकरीस राहिले. थोडयाच कालावधींत त्यांच्या अंगचे प्रभावी गुण प्रकट होऊं लागले. साहजिकच शेटजींबरोबर उत्तर हिंदुस्थानच्या दौऱ्यावर जाण्याची त्यांना संधि मिळूं लागली. यामुळें पुढील पांचसहा वर्षांत दिल्ली, अमृतसर, कानपूर वगैरे बाजारपेठांची व व्यापारविषयक व्यवहाराची त्यांना चांगली माहितो होऊं शकली.

१९०५ मध्यें रंगाच्या व्यापारांत प्रसिद्ध असलेल्या अमृतसर येथील शाखेवर दादाजी धाकजी यांनीं त्यांची नेमणूक केली या शाखेवर त्यांना मॅनेजर ह्या नात्यानें नियुक्त केलें होतें. ह्यावरून त्यांच्या कर्तबगारीबद्दल शेटजींना किती आत्मविश्वास वाटत असला पाहिजे हें दिसून येतें. १९०५ ते १९११ पर्यंत पंजाब प्रांतांत त्यांनीं कपनीला चांगलाच लौकिक प्राप्त करून दिला. १९१२ मध्यें कंपनीनें मद्रास इलाख्याची रगाची एजन्सी घेतली आणि मदुरा येथें एक नवी शाखा उघडली. या शाखेवर मॅनेजर म्हणून श्री. राजारामपंत काम पहात होते. दोन वर्षांच्या कालांत त्यांनीं कंपनीच्या व्यापाराची चांगली वाढ केली. इतक्यांतच १९१४ मध्यें महायुद्धाला तोंड लागलें आणि जर्मनीहून येणारा माल बंद झाला. साहजीकच मदुरेची शाखा कंपनीनें बंद केली. १९१४ ते १९१७ पर्यंत, ते मुंबई येथें कंपनींत नोकरी करीत होते.

## स्वतःच्या पायावर

१९१८ मध्यें महायुद्ध संपतांच त्यांनीं स्वतःच्या पायावर उभें राहाण्याचें ठरविले आणि रंगाचा स्वतंत्र धंदा सुरू केला. रंगाच्य

बाबतींत प्रसिद्ध असलेल्या मेसर्स लिऑपोल्ड कॅसल्ला आणि कं. ह्या जर्मन कंपनीनें आपल्या मालाचा हिंदुस्थानभर प्रसार करण्यासाठीं एका स्वतंत्र विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक केली. या कंपनींत त्यांनीं १९२४ पर्यंत काम केलें १९२४ सालीं त्यांनीं अमृतसर व दिल्ली येथील रंगाच्या व्यापारांत प्रमुख असलेल्या 'राधाकिसन रामलाल' या कंपनी-बरोबर भागीदारी पत्करली. त्यांनीं आपले जामात श्री. रामचंद्र बळंवत चेंदवणकर याना आपल्या अमृतसर येथील शाखेंत ठेऊन रंगाच्या धंद्यांत पारंगत केलें. [श्री. रामचंद्रपंत एक आदर्श समाजसेवक व उदार वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांचा परिचय स्वतंत्रपणें इतरत्र दिला आहे.]

## युरोपची सफर

१९३७ मध्यें राजारामपंतांनीं युरोपची सफर केली. परदेश-पर्यटणामुळें त्यांच्या स्वभावांत जुन्या नव्याचा सुंदर संगम आढळेल. त्यांनीं स्वतःच्या परिश्रमानें संपत्ती मिळविली आणि समाजोपयोगी संस्थांना सढळ हस्तें मदत केली. त्यांनीं घालून दिलेली दातृत्वाची परंपरा त्यांचे चिरंजीव श्री. वसंतराव आज चालवीत आहेत.

श्री. राजारामपंतांना सर्वजण बापूजी ह्या नांवानें संबोधित असत.

## श्री. वसंतराव राजाराम वालावलकर बी. ए.

श्री. वसंतराव वालावलकर हे सेंट झेव्हियर कॉलेजमधून बी. ए. झाले. त्यांनीं फ्रेंच भाषेचा खास अभ्यास केला आहे. १९३० पासून त्यांनीं आपल्या वडिलांच्या धंद्यांत भाग घेण्यास सुरवात केली. प्रसिद्ध आगफा कंपनीचे हिंदुस्थानचे परफ्यूमरी डायरेक्ट इंपोर्टर्स म्हणून त्यांच्या-कडे एजन्सी होती. कंपनीतर्फे १९३६ मध्यें ते जर्मनीस गेले. तिकडे आठ महिने राहून त्यांनीं आपल्या धंद्यांत उपयोगी पडणारें ज्ञान संपादन केलें. नंतर युरोपखंडांतील अनेक प्रसिद्ध देशांना भेटी देऊन ते स्वदेशीं परतले.

इ. स. १९३९ मध्यें महायुद्धाला सुरवात झाल्यामुळें जर्मनीहून माल आयात होईना. अशा वेळीं त्यांनीं फ्रेंच, इंग्लिश कंपन्यांबरोबर संबंध जोडून आपला धंदा चांगल्या रीतीनें चालविला. हल्लींच १९५६ मध्यें पुन्हा जर्मनींत जाऊन व नव्या एजन्सीज घेऊन ते आले आहेत

परफ्यूमर्स असोसिएशनचे ते अनेक वर्षं अध्यक्ष असून हल्लीं खार येथें स्थाईक झालेले आहेत. अनेक स्थानिक संस्थांना त्यांनीं वेळोवेळीं सहाय्य केलेलें असून नूतन मराठा हितवर्धक संस्थेचे ते एक प्रमुख आधार आहेत. त्यांचे चिरंजीव श्री. शशिकुमार हे आंग्लविद्याविभूषित असून आपल्या आजोबांच्या पश्चात त्यांच्या धंद्याची धुरा घेऊन वडिलांना मदत करीत आहेत. सर्वांना कलेची आवड आहे.

## भिकाजी पांडुरंग वालावलकर

हें मूळ घराणें वालावलीचें असून यांचें आडनांव प्रभुदेसाई हें होय. हे वत्स गोत्री असून यांचें उपास्य दैवत 'लक्ष्मीनारायण' असून त्यांच्या सात पिढ्या मडुरें येथें गेल्या. हें घराणें बाबा राम प्रभूचें घराणें म्हणून ओळखलें जातें. हे बाबा राम प्रभू सत्यनिष्ठ, करारी, पापभीरू व आतिथ्यशील म्हणून प्रसिद्ध होते. श्री. वालावलकर यांचा जन्म १८७२ मध्यें मडुरें येथें झाला. स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर गोवा, बेळगांव, दावणगिरी, बेझवाडा येथे पेढ्या स्थापन केल्या. १९४६ मध्यें ते कालवश झाले.

### दी ग्रेट रॉयल सर्कसचे मालक

## श्री. सीतारामपंत गंगाराम वालावलकर



Infinite faith and Strength

are the only conditions


of Success.

श्री. सीतारामपंत यांचा जन्म सन १९०५ मध्यें वेंगुर्लें येथें झाला. त्यांचें प्रा. शिक्षण वेंगुर्लें येथेंच झालें. त्यांचें घराणें वालावल हुमरमळा येथील. घरची अत्यंत गरिबी असल्यामुळें त्यांना अल्पवयांतच नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडणें भाग होतें. कै. काशिनाथ विनायक छत्रे यांच्या सर्कशींत ते प्रथम उमेदवार म्हणून अंगमेहनतीचीं कामें करूं लागले. या ठिकाणीं पुरेसा पगार मिळेना म्हणून ते ताराबाई सर्कसमध्यें राहिले. थोड्याच दिवसांत ह्या नोकरीला रामराम ठोकून ते शेलार रॉयल सर्कसमध्यें महिना साठ रुपये पगारावर नोकरीस राहिले. या ठिकाणीं ते सायकलीस्ट म्हणून काम करीत होते. या ठिकाणीं सायकलवरील त्यांच्या कसरतीच्या कामांनीं त्यांना अमाप कीर्ति मिळवून दिली. थोड्याच कालावधींत त्यांना इंडियन वहादूर सर्कसमध्यें दरमहा ३०० रु. पगारावर बोलविण्यांत आलें आणि येथून त्यांच्या भाग्योदयास सुरवात झाली. सर्कशीच्या निमित्तानें त्यांना जो उत्तर हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांचा प्रवास घडला, त्यामुळें त्यांना अनेक भाषांचें ज्ञान झालें आणि मानवी स्वभावाची पारख करतां येऊं लागली. त्यांचें महत्त्वाकांक्षी मनहि त्यांना साहसास प्रवृत्त करूं लागलें. ह्यावेळीं त्यांचें वय तेवीस वर्षांचें होतें आणि घरांतून बाहेर पडून तेरा वर्षांचा कालावधि मागें पडला होता. त्यांना आपल्या आईच्या दर्शनाची फार ओढ लागली होती म्हणून ते गांवीं आले. पुढें आईच्या इच्छेप्रमाणें विवाहबद्ध झाल्यावर १९२८ सालीं देवळाली नासिक येथें मोडकळीस आलेली एक सर्कस विकत घेतली. थोड्याशा कालावधींत ह्या सर्कशीनें चांगलीच लोकप्रियता मिळविली.

**परिस्थितीवर मात**--१९३०त बिहारमध्यें जो भयंकर भूकंप झाला त्यांत त्यांच्या सर्कशीचीं सर्व जनावरें व मालमत्ता नाहींशीं झालीं. ह्या दुर्दैवी प्रसंगांतून त्यांनीं मोठ्या धैर्यानें मार्ग काढला. दोन वर्षांच्या आतच 'ग्रँड बॉंबे सर्कस' शें. वीस टक्के कमिशनवर त्यांनीं चालविण्यास घेतली. ह्या सर्कशींत पैसा मिळवून त्या भांडवलावर १९३८ सालीं त्यांनीं कलकत्ता येथें, श्री. विश्वनाथ गोविंद मादूसकर ह्या महाराष्ट्रीय व्यक्तीला भागीदारींत घेऊन आजची 'ग्रेट रॉयल सर्कस' विकत घेतली व भरभराटीस आणली.

बंगाल व कलकत्ता येथें असतांना त्यांनीं युरोपियन, इटालियन, व हिंदी अशा शंभर सवाशें उत्तम खेळाडूंचा संच जमविला. यानंतर बिहार, नागपूर, जबलपूर, वऱ्हाड, खानदेश, भोपाळ, इंदूर, गुजराथ इत्यादि ठिकाणीं प्रवास करून अलोट कीर्ति व पैसा मिळविला. १९४६ सालीं त्यांचे भागीदार श्री. मादूसकर कालवश झाले. त्यांच्या जागीं त्यांनीं श्री. नारायणराव महादेव वालावलकर यांना भागीदार म्हणून घेतलें. गौशाळा, कलकत्ता, गव्हर्नमेंट वॉर फंड, गोवर्धनदास मेडिकल कॉलेज, भोपाळ मेडीकल कॉलेज, टोपीवाला हायस्कूल, वालावल ह्या संस्थांना मिळून त्यांनीं सुमारें तीस हजार रुपये देणगीदाखल दिलेले आहेत.

## श्री. वसंतराव महादेव वालावलकर



श्री. वसंतराव यांचा जन्म २२ आक्टोबर १९१४ मध्यें वालावल येथें झाला. प्रा. शिक्षण नर्मदाबाई स्कूलमधून झालें. १९३१ मध्यें त्यांनीं काँग्रेसच्या सत्याग्रह चळवळींत भाग घेतला. त्यांना सात महिन्यांची शिक्षा झाली. १९३४ मध्यें ते आपल्या मावशी-बरोबर कराचीस गेले. त्या ठिकाणी दादाजी धाकजीकडे व एका स्टेशनरी फर्ममध्यें ते नोकरीस होते. १९४७ मध्यें ते मुंबईस आल्यावर धि ग्रेट् रॉयल सर्कसमध्यें मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून जबाबदारी सांभाळीत आहेत. त्यांना एक मुलगा आहे.




श्री. नारायणराव, श्री. मोरारजी देसाई व श्री. वसंतराव

# श्री. नारायणराव महादेव वालावलकर



श्री. नारायणराव आज धि ग्रेट रॉयल सर्कसचे भागीदार असून एक निष्णात कसरतपटु म्हणून विख्यात आहेत. त्यांचा जन्म मे १९१७ मध्यें वालावलीस झाला. त्यांचा ओढा शिक्षणापेक्षां खेळाकडे होता. वयाच्या १२ व्या वर्षी ते सीतारामपंतांकडे सर्कशींत दाखल झाले. ते सर्व प्रकारच्या खेळांत थोड्याच कालावधींत प्रवीण झाले. सर्कशींतील प्रत्येक कसरतीच्या कामाची त्यांना उत्तम माहिती आहे.

ते १९४२ मध्य परशुराम लायन सर्कसमध्यें गेले आणि तेथून पुढें जी. ए. सर्कस ऑफ् बॉंबे ह्या सर्कशींत त्यांनीं नांवलौकिक मिळवला. १९४६ मध्यें श्री. सीतारामपंतांनीं त्यांना आपल्याकडे बोलावून घेतलें आणि त्यांस भागीदार केलें. धि ग्रेट रॉयल सर्कशींत नारायणराव येतांच त्यांनीं सर्कशीला लोकमान्यता मिळवून देण्याच्या बाबतींत आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली.



श्री. वसंतराव, श्री. एस्. जीं. व श्री. नारायणराव

प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यास लागणारें धैर्य, साहस व चिकाटी हे त्यांचे गुण उल्लेखनीय आहेत. हिंस्र श्वापदांच्या मिश्र संततो-बाबत त्यांचे प्रयोग झालेले आहेत.

## श्री· दिगंबर सावळाराम वालावलकर



मृत्युगोलांतून मोटार सायकल हांकण्याचा नेत्रदीपक प्रयोग करून हजारों प्रेक्षकांना स्तिमित करणारे म्हणून त्यांची ओळख सर्कसप्रेमी प्रेक्षकांना आहे. वयाच्या १० व्या वर्षी त्यांना सितारामपंतांनीं आपल्याकडे घेतलें आणि त्या ठिकाणीं चिकाटीनें आणि साहसी वृत्तीनें त्यांनीं स्वतःचें स्थान निर्माण केलें आहे.

## श्री. अनंत अर्जुन वालावलकर

ग्रेट रॉयल सर्कसमध्यें मृत्युगोलांतून मोटारसायकल चालविणारे हे दुसरे साहसी तरुण असून त्यांची ह्या कामांतील धडाडी वाखाणण्यासारखी आहे. श्री. सीतारामपंत व नारायणराव यांनीं त्याला पुढें आणलें.

## 'वालावलकर ब्रदर्स' ठाकुरद्वार.

लोणी, तूप व सावंतवाडीच्या रंगीत सामानाचें प्रसिद्ध दुकान म्हणून वालावलकर ब्रदर्स ओळखले जातात. कै. केशव सजनाजी प्रभु वालावलकर यांचे ज्येष्ठ पुत्र कै. शिवराम केशव वालावलकर यांनीं १९०३ मध्यें हें दुकान स्थापन केलें. त्यांनीं दीर्घोद्योगानें दुकानाची भरभराट केली. ते २३ फेब्रुवारी १९५७ मध्यें वयाच्या ७५ व्या वर्षी मुंबई येथें निधन पावले. त्यांचे बंधु शांताराम केशव वालावलकर २९ फेब्रुवारी १९५६ मध्यें वयाच्या ६५ व्या वर्षीं कालवश झाले. श्री. वालावलकर यांनीं १३००० रुपये विद्यावृद्धि समाजास देणगी दिलेली आहे आणि तीहि स्वतःच्या इच्छेनें. कै. शांतारामपंतांचे चिरंजीव श्री. उद्धव शांताराम प्रभु वालावलकर हे हल्लीं

आपलें दुकान चालवित आहेत. त्यांचा जन्म १८।१।१९३२ मध्यें झाला. त्यांचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेलें आहे.

## श्री. शांताराम कृष्णाजीपंत वालावलकर

कोल्हापूर येथें यांचें मोठें कापडाचें दुकान असून त्या भागांत ते एक प्रसिद्ध व्यापारी म्हणून ओळखले जातात.

## श्री· काशीनाथ श्रीधरपंत देसाई वालावलकर

हे वालावल येथील फौजदार घराण्यांतील असून सांगली मिरज वगैरे भागांत पेट्रोल केरोसिनचे एक प्रमुख एजंट म्हणून ओळखले जातात.

## श्री. अच्युत विश्राम देसाई

अच्युतनाना या नांवानें ते ओळखले जातात. गरिबींतून स्वतःच्या कर्तबगारीवर पुढें आलेले हे गृहस्थ आहेत. मुंबईत कमिशन एजन्सीचा धंदा करतात.

## कै. साथू अर्जुन पारसेकर

हे जुन्या काळीं मंगलोरी कौलांचे व्यापारी होते. यांचीं स्वतःचीं गलबतें होतीं. यांनीं गावांत सार्वजनिक कार्य पुष्कळ केलें.

## श्री. पांडुरंग विष्णु वालावलकर



यांचा जन्म १९१० मध्यें वालावल येथें झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण वालावल येथें झालें. १९२७ ते ३० पर्यंत ते रत्नागिरीस माळवदे टेलर्सकडे टेलरिंग शिक्षणासाठीं राहिले. त्यानंतर १९३० मध्यें मसुरें येथें त्यांनीं स्वतःचें टेलरिंग शॉप उघडलें. मसुऱ्यास राहून आपली उर्जितावस्था येणें त्यांना शक्य वाटलें नाहीं. १९३७ मध्यें ते मुंबईस आले आणि डोंगरी नवरोजी हिल नं. ७ येथें त्यांनीं युनायटेड टेलर्स नांवाची फर्म सुरू केली. गेल्या वीस वर्षांतील कामगिरीमुळें 'युनायटेड टेलर्स 'ला विशेष स्थान प्राप्त झालें.

श्री. पांडुरंग विष्णु वालावलकर यांस तीन मुलगे व चार मुली आहेत. थोरला मुलगा हनुमंत टेलरिंग व्यवसायांत असून त्याचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें आहे. दुसरा मुलगा अरुण नववींत आहे.

# लेखक आणि कलावंत

## कै. अनंत सिताराम देसाई

कै. अनंतराव देसाई यांनीं जमविलेल्या ऐतिहासिक साधनांमुळें कै. रा. ब. बांबर्डेकर व कै. गणेश मुकुंद परुळेकर यांना इतिहासलेखनाचें कार्य सुलभ झालें. ते बी. ए. एल्एल् बी. होते. ते अल्पायुषी झाले.

## कै. कृष्णाजी सिताराम देसाई

कृष्णाजी सिताराम देसाई यांना ' कोकणचे कर्वे ' म्हणून ओळखलें जातें. स्त्रीशिक्षणाचे ज्वलंत पुरस्कर्ते व ध्येयनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांची ख्याति आहे. हे मालवणच्या कन्याशाळेचे जनक होत.

## आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मानसशास्त्रज्ञ डॉ. पंढरीनाथ हरी प्रभु

श्री. पंढरीनाथ प्रभु यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९११ मध्यें झाला.



त्यांचें माध्यमिक शिक्षण मालवण येथें झाल्यानंतर त्यांना पुढील शिक्षणासाठीं मुंबईस यावें लागलें. १९३० सालीं विल्सन कॉलेजमधून ते बी. ए. व १९३३ मध्यें एलएल. बी. झाले. १९३५ सालीं स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, मुंबई येथून पीएच. डी. साठीं ' हिंदु स्पेशल इन्स्टिटयूशन्स ' हा प्रबंध लिहिला. १९३७ ते ४२ च्या दरम्यान खालसा कॉलेजमध्यें तत्वज्ञानाचे प्राध्यापक व तत्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनीं काम केलें. १९३९ मध्यें युनिव्हर्सिटी लेक्चरर इन सोशॉलॉजी म्हणून त्यांची नियुक्ति झाली. १९४३ ते ५० पर्यंत मुंबई सरकारच्या शिक्षण खात्यांत त्यांनीं नोकरी केली. त्यानिमित्त त्यांना

गुजराथ कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज व अंधेरी इस्माईल कॉलेज, येथें प्राध्यापक म्हणून काम करावें लागलें. १९४८ सालीं हिंदुस्थान सरकारनें 'पोस्ट डॉक्टोरल स्काऊट' म्हणून डॉ. प्रभु यांना अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स या देशांतील विद्यापीठांत उच्च संशोधनासाठीं पाठविलें. १९४८–४९ च्या दरम्यान मिचिगन युनिव्हर्सिटी, कोलंबिया युनिव्हर्सिटी, पेन्सिल्वेनिया युनिव्हर्सिटी, ओहायो स्टेट युनिव्हर्सिटी, केंब्रिज युनिव्हर्सिटी, पॅरिस युनिव्हर्सिटी, येथें स्पेशल अॅप्लाईड सायकॉलॉजीचा अभ्यास व संशोधन केलें. १९५० सालीं त्यांच्या या आंतरराष्ट्रीय विद्वत्तेचा गौरव म्हणून टाटा स्कूल ऑफ सोशल सायन्स या संस्थेंत मानसशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून नेमणूक करण्यांत आली. युनेस्कोनेंही डॉ. प्रभु यांच्या विद्वत्तेचा गौरव करून अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशनचे पहिले हिंदी सभासद म्हणून नेमणूक केली. अमेरिकन असोसिएशन फॉर अॅडव्हान्समेंट ऑफ सायन्सचे फेलो, इंटर नॅशनल सोशालॉजिकल अॅसोसिएशनचे 'इन्डिव्हिज्युअल मेंबर' म्हणून नेमणूक झाली. डॉ. प्रभु हे आज म्हैसूर, पुणें, कर्नाटक, बडोदें, पाटणा, उस्मानिया, सागर या विद्यापीठांचे परीक्षक म्हणून काम करतात. त्यांच्या डॉक्टोरेटसाठीं लिहिलेल्या प्रबंधाची नवी आवृत्ति 'हिंदु सोशल ऑर्गनायझेशन्स' या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे. याशिवाय कित्येक पौर्वात्य व पाश्चिमात्य नियतकालिकांत मानसशास्त्रावर विविध स्वरूपाचें लिखाण त्यांनीं केलें आहे.

## श्री. आ. रा. देसाई

इतिहास संशोधक, लेखक, आणि टीकाकार ह्या विविध नात्यांनीं त्यांना महाराष्ट्रांत ओळखलें जातें. त्यांच्या लिखाणांत तर्कापेक्षां प्रत्यक्ष आधारांना फार महत्त्व आहे. त्यांचा जन्म ८ जून १९०६ मध्यें वालावल येथें झाला. मुंबईच्या एल्फिन्स्टन् हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर इंटरसायन्सपर्यंत सेंट झेव्हियरमध्यें व दोन वर्षें नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबईमध्यें त्यांचें शिक्षण झालें. १९२८ मध्यें शिक्षणक्रम अर्ध्यावर सोडून सरकारी नोकरी पत्करली. कै. रा. ब. वासुदेवराव बांबर्डेकर यांच्यामुळें

त्यांना इतिहासाची गोडी लागली. १९३५ मध्यें पुण्याच्या ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेला त्यांचा ' मठगांव शिलालेख व केसरीचा खोडसाळ अभिप्राय ' हा लेख गाजला. त्याच वेळीं पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळापुढे ' श्रीदेव नारायण वालावली ' ह्या विषयावर व्याख्यान–यानंतर ' सह्याद्रि ' मासिकांतील किल्ले सिंधुदुर्ग, हिंदू संशोधकाचें जैन वुद्धवेड आणि इतर लेख. नाशिक येथील वाङ्मय मासिकांतील विजयनगरच्या माधव मंत्र्याच्या नांवानें दिलेले तीन खोटे ताम्रपट ( पूर्वार्ध ) हा संशोधनपर लेख कलकत्ता येथील बृहन्महाराष्ट्र मासिकांत, ' ब्राह्मणांत पोटभेद केव्हां पडले ' ह्या चित्रावशास्त्री यांच्या लेखाला उत्तर. यापुढील त्यांचें महत्त्वाचें लिखाण म्हणजे मुंबईच्या गौडब्राह्मण मासिकांतून १९४० मध्यें ' श्रीदेव नारायण वालावली ' ही प्रदीर्घ लेखमाला.

' प्राचीन भारतांतील भंगी व झाडू काम ' हा लोकमान्यांत प्रसिद्ध झालेला लेख, कलकत्ता येथील रिसर्च सोसायटीच्या ' गौडप्रभा ' ह्या मासिकांत ' श्रीदेवनारायण वालावली ' हा इंग्रजी लेख, मुंबई येथील दुधसागरच्या साहित्य अंकांत ' गोमंतक नव्हे गोवेंच ' व ' प्राचीन कुडाळ-देशाची व्याप्ती ' हे संशोधनपूर्ण लेख. शिवाय अनेक नियतकालिकांतून लेखन केलेलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील प्रभुदेसाई घराण्याची ऐतिहासिक माहिती त्यांनींच लिहिलेली आहे. कुडाळी भाषेचा कोश नांवाचा ग्रंथ ते तयार करीत आहेत.

## श्री. अ. ब. वालावलकर

श्री. वालावलकर यांचा जन्म २७ डिसेंबर १८९७ मध्यें वालावल येथें झाला. कोंकण रेल्वेचे आद्य पुरस्कर्ते म्हणून त्यांना ओळखलें जातें. ते अतिशय कल्पक, वुद्धिमान, आणि धडाडीचे कार्यकर्ते आहेत. गेल्या पांच वर्षांत कोंकण रेल्वेचा प्रश्न सुटणें हीच कोंकणची खरी गरज आहे हें त्यांनीं लोकांच्या व सरकारच्या मनावर बिंबवलें. ह्या प्रश्नावरील त्यांचा अभ्यास वाखाणण्यासारखा आहे. गेलीं कित्येक वर्षे त्यांना लिपी संशो-धनाचा छंद आहे. ' प्री अशोकन ब्राह्मी ' हें त्यांचें पुस्तक १९५१ मध्यें प्रसिद्ध झालें. ' कोंकण रेल्वेची योजना ' ही त्यांची पुस्तिका १९५२ मध्यें

प्रसिद्ध झाली. पश्चिम रेल्वेंत कन्स्ट्रक्शन प्रॉजेक्ट हेड ड्राफ्स्मन म्हणून नोकरी केली. 'मठ गांवचा शिलालेख' ह्या नांवाचें एक पुस्तक सुप्रसिद्ध इतिहास संशोधक बांवर्डेकर यांच्या ग्रंथावर आक्षेप घेण्यासाठीं म्हणून त्यांनीं लिहिलें. त्यावरून त्यांची वाक्पटुता दिसून येते.

१९४५ मध्यें 'ग्रेटर बाँबे टाऊन प्लॅनिंग कमिटी' गव्हर्नरनें नेमली होती. ह्या कमिटीसमोर त्यांनीं कांहीं योजना मांडल्या होत्या. (१) ग्रँट रोड चर्चगेट ४ ट्रॅक कसे टाकतां येतील ? (२) चर्चगेट, कल्याण व बोरीबंदर विरार अशा क्रॉस ट्रॅफिकच्या डायरेक्ट सर्व्हिसेस कशा बसविता येतील ? (३) मुंबईमध्यें मीटरगेज कनेक्शन ठेवून ती लाईन पुण्याशीं जोडावी, वगैरे योजना त्यांनीं मांडल्या.

## नटश्रेष्ठ श्री. दादा लाडू वालावलकर

किर्लोस्कर नाटक मंडळींतील प्रसिद्ध तबलजी आणि नट श्री. दादा लाडू यांचा जन्म १८८३ च्या सुमारास वालावल येथें झाला. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनीं किर्लोस्कर नाटकमंडळींत प्रवेश मिळविला. कै. भाऊराव कोल्हटकरांबरोबर त्यांनीं ९ वर्षे स्त्री भूमिका केल्या. त्यांच्या अंगांतील तबला वादनाचें कौशल्य पाहून कोल्हटकरांनी त्यांना शिकविण्याकरतां इंदूर दरबारचे तबलापटु कै. बाळासाहेब पानसे व ग्वाल्हेर दरबारचे कांताप्रसाद य.ना मुद्दाम ठेवलें. श्री. दादा लाडू यांची गायनाची साथ ऐकण्याकरतां प्रसिद्ध गायक कै भास्करबुवा बखले, मरहूम अल्लादिया खाँसाहेब वगैरे मंडळी नाटकें पहाण्यास येत असत. पुढें आकस्मिकपणें त्यांचा हात निकामी झाला. त्यामुळें तबलावादनाचा नाद सोडून विनोदी नटाच्या भूमिका कराव्या लागल्या. पुढील काळांत एक विनोदी नट म्हणून त्यांचा खूपच बोलबाला झाला. ५० वर्षांचा नाटयकलेचा इतिहास सांगणारी त्यांची प्रदीर्घ लेखमाला मुंबईच्या मोहिनी मासिकांतून १९५४ ते ५५ मध्यें प्रसिद्ध झाली होती. ते हल्लीं वृद्धावस्थेंत व दारिद्र्यांत दिवस कंठीत आहेत. यांचे बंधु बाबू लाडू हे यशवंत संगीत मंडळींत नट होते.

## नटवर्य श्री. महादेव बाळकृष्ण वालावलकर

यांचा जन्म ता. २८ एप्रिल १८९० मध्यें आजोळीं झारापी ह्या गांवीं झाला. मराठी पांच इयत्तांचें शिक्षण झारापीस केल्यावर वयाच्या १४ व्या वर्षीं १९०४ सालीं कै. बाबुराव झारापकर यांनीं त्यांना मुंबईस आणून चनकसप्पा मल्लाप्पा वारद यांचे पेढीवर द. म. ८ रु. पगारावर नोकरीस ठेवलें. तेथें ते दोन वर्षें होते.

यानंतर उंबर्जे व गुमवाड या पेढीवर ३४ रु. द. म. पगारावर नौकरी केली. पुढें या नोकरीवर आयुष्य काढणें बरें नाहीं याची खात्री पटतांच गुरू संगीत विद्यालयाचे मालक गुरुवर्य अनंत मनोहर जोशी यांच्या पाठिंब्यानें त्यांनीं नाटकव्यवसायांत प्रवेश केला. सन १९१४ मध्यें त्यांनीं गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नटवर्य केशवराव भोंसले यांच्या ललितकला दर्शन नाटक मंडळींत ( अमरावती मुक्कामीं ) पदार्पण केलें. या ठिकाणीं त्यांना जेऊन खाऊन ४० रु. पगार मिळत असे. कै. केशवरावांनीं त्यांना नाट्यकलेचें उत्तम शिक्षण देऊन त्यांच्या आंगच्या गुणास उजाळा दिला. पुढें त्यांना द. म. १०० रु. पगार मिळूं लागला. त्या ठिकाणीं कंपनीच्या हिशेबाचें सर्व कामहि माधवराव पहात असत. नाटककार मामासाहेब वरेरकर यांच्या ' हाच मुलाचा बाप ' व ' संन्याशाचा संसार ' या दोन नाटकांत त्यांचा फार बोलबाला झाला. पुढें मतभेदामुळें ललितकलेला सोडून ते गंधर्व नाटकमंडळींत १४० रु. पगारावर गेले. या ठिकाणीं सौभद्र व स्वयंवर ह्या नाटकांतील त्यांची कृष्णाची भूमिका फार गाजलेली होती.

आशा-निराशा नाटकांतील 'दरबारी' संगीत कान्होपात्रांतील 'चोखोबा', द्रौपदी नाटकांतील ' भीम ' ह्या त्यांच्या भूमिका लोकप्रिय होत्या. गंधर्व नाटक कंपनीच्या ऐन ऐश्वर्याच्या काळांत माधवरावांनीं अलोट कीर्ति आणि ऐषाराम उपभोगला. अशा रीतीनें गंधर्व कंपनींत २५ वर्षें गेलीं. त्यांचा पगार १९० रु. झाला होता. कंपनीच्या पडत्या काळांतहि त्यांनीं कंपनीला सोडलें नाहीं. मिळल त्या पगारावर त्यांनीं कामें केलीं. अजूनहि बालगंधर्वांचें निमंत्रण येतांच ते मोठ्या अगत्यानें रंगभूमीवर काम करतात.

गेल्या चार पांच वर्षांत माधवराव भजनें आणि कीर्तनें यांत दंग झालेले दिसतात. त्यांचीं रसाळ कीर्तनें लोकादरास पात्र झालेलीं आहेत. नटवर्य माधवरावांना त्यांच्या भीमाच्या सर्वोत्कृष्ट भूमिकेबद्दल १९२६ सालीं डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य यांनीं "**अभिनयपटु**" ही पदवी बहाल केली होती, तर पर्तगाळी मठ–कारवार येथें १९५० सालीं रसाळ वाणी व सुश्राव्य भजन केल्यावर त्यांना '**भजनप्रेमा**' अशी पदवी मिळाली.

## श्री. पुरुषोत्तम महादेव वालावलकर ( संगीत दिग्दर्शक)

गंधर्व नाटक मंडळींतील एक प्रमुख नट श्री. महादेवराव वालावलकर यांचे हे थोरले चिरंजीव. वडिलांच्या कीर्तींत भर घालण्याइतपत त्यांची गायन आणि वादन ह्या कलांत ख्याति आहे. उत्तम हार्मोनियमवादक असून संगीतदिग्दर्शक म्हणून बेळगांव जिल्ह्यांत त्यांना बहुमान प्राप्त झालेला आहे. ते उत्तम प्रकारचे भावगीत गायक आहेत.

## रजनी सीताराम वालावलकर

सौ. रजनीबाई यांनीं नृत्यकलेमध्यें प्राविण्य मिळविलेलें असून अनेक चढाओढींत त्यांनीं सुवर्णपदकें मिळविलीं आहेत. लहानपणापासूनच वडिलांच्या प्रोत्साहनानें, 'कथ्थक व भारत नाटचम्' ह्या नृत्यकलेंत त्या पारंगत झाल्या. कॉलेजमध्यें असतांनाच बडोदा येथील सुप्रसिद्ध डॉ. खोत यांचे चिरंजीव श्री. शंकरराव खोत यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. श्री. खोत हे बी. कॉम. असून त्यांनीं युरोपचा प्रवास केलेला आहे. महेंद्र अँड महेंद्रमध्यें ते अॅडमिनिस्ट्रेटर आहेत.



### श्री. गुंडोपंत वालावलकर, कोल्हापूर

गोविंदराव टेंबे यांनीं ' माझा संगीताचा व्यासंग ' ह्या ग्रंथांत श्री. गुंडोपंत वालावलकर यांचा उल्लेख केलेला आहे. उत्कृष्ट गायक आणि हार्मोनियम वादक म्हणून त्यांची ख्याति होती. फलटण संस्थानांत त्यांना राजाश्रय मिळालेला होता. सुरवातीच्या चित्रपटांतून त्यांनीं संगीत दिग्दर्शन केलें होतें. त्यांचे दोघे चिरंजीव राजकमल चित्रमंदिरांत असतात.

### श्री. अनंत रामचंद्र पुराणिक

वालावल यथील रामचंद्रबुवा पुराणिक यांचे हे द्वितीय चिरंजीव. हे गायनवादनांत अत्यंत प्रवीण असून सांगली दरबारांत ते मान्यता पावले होते. हल्लीं मुंबईत आहेत. त्यांचे थोरले बंधु वालावलींतील उत्कृष्ट पुराणिक आहेत.

### श्री. अर्जुन गोपाळ वालावलकर

चित्रकलेची अभिजात आवड असल्यानें स्वयंस्फूर्त प्रयत्नानें त्यांनीं चित्रकलेंत प्राविण्य मिळविलें. त्यांच्या येवढा तज्ञ कलावंत रत्नागिरी जिल्ह्यांत दुसरा नाहीं. उत्कृष्ट मूर्तिकार असून त्यांचें रंगकामांतील कौशल्य अप्रतीम आहे. त्यांचें वय आज ६० वर्षांचें असून चित्रकलेची त्यांची आवड व उत्साह कमी झालेला नाहीं.

## कांहीं प्रसिद्ध व्यक्ति

### डॉ. दिनकर जगन्नाथ गाळवणकर

आपल्या शिक्षणाचा उपयोग लोकसेवा आणि लोककल्याण यासाठीं करणाऱ्या थोर देशभक्तांत अर्नाळा येथील ७५ वर्षांचे वयोवृद्ध डॉक्टर श्री. दिनकर जगन्नाथ यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या लोकोपयोगी कार्याच्या आणि गोरगरिबांबद्दल त्यांना असलेल्या सक्रीय जिव्हाळ्याच्या शेंकडो गोष्टी तिकडील लोक सांगतात. त्यांचें शिक्षण अर्नाळा, वसई व ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई येथें झालें. १९२० च्या असहकाराच्या चळ-

वळींत व त्यानंतरच्या कॉंग्रेसच्या प्रत्येक आंदोलनांत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. ते महात्मा गांधींचे एकनिष्ठ अनुयायी असून दारूबंदी चळवळीचें त्यांनीं केलेलें कार्य उल्लेखनीय आहे.

त्यांना दोन मुलगे. थोरले गंगाधर M.R.C.S. होऊन २४ वर्षे इंग्लंडलाच राहिले होते. १९५३ मध्यें ते तेथेंच कालवश झाले. दुसरे मनोहरपंत राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे कार्यकर्ते आहेत ! गाळवणकर घराणें मूळ कोकणांतील वालावल ह्या गांवचें. गाळवणें वाडींत रहाणारें घराणें म्हणून गाळवणकर असें नांव पडलें.

## श्री. महादेव तुकाराम वालावलकर

१९२० पासून महात्मा गांधींच्या तत्त्वांप्रमाणें स्वतः देशकार्यास वाहून घेणारे गृहस्थ. हे बी. ए. असून त्यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांत हरिजनसेवक संघाचें व खादीप्रसाराचें कार्य अविरत केलें आहे. अस्पृश्यतानिवारणाचें त्यांचें कार्य तर प्रसिद्धच आहे.

## श्री. आत्माराम देवराव प्रभु (वालावलकर)

श्री. आत्मारामपंत प्रभु रिझर्व बँक ऑफ् इंडियामध्यें करन्सी ऑफिसर आहेत. त्यांचे वडील देवराव नारायण हे रत्नागिरी जिल्ह्यांत पोलीस खात्यांत होते. हें घराणें करमळकर म्हणून ओळखलें जातें. पंढरपूरच्या विठोबास वालावल येथील लक्ष्मीनारायणाची तुळशीमाळ पोंचवून तेथून बुका आणण्याचा बहुमान ह्या घराण्यास परंपरेनें आजहि चालू आहे. श्री. आत्मारामपंत रत्नागिरी हायस्कूलमधून मॅट्रिक व विल्सनमधून बी. ए. झाले.

१९३० ते ३५ पर्यंत, त्यांनीं इंपीरियल बँकेंत नोकरी केली. त्यानंतर रिझर्व्ह बँकेंत त्यांनीं नोकरी पत्करली. हल्लीं मुंबई येथें करन्सी ऑफिसर म्हणून हुद्यावर काम पहातात. त्यांचा एक भाऊ मधुकर देवराव एम्.ए. असून रिझर्व्ह बँकेंतच नोकरी करीत आहे.

## श्री. बाबुराव सीताराम प्रभु राजिवडेकर

वालावल येथील एक प्रमुख कार्यकर्ते. १९०२ सालापासून सतत कॉंग्रेसकार्य करीत आलेले एक म्हणून श्री. बाबुराव राजिवडेकर यांस ओळ-

खलें जातें. त्यांचा जन्म १८८८ मध्यें वालावल येथें झाला. बालपणापासून त्यांचा राष्ट्रकार्याकडे ओढा होता. वाङ्मयाची त्यांना आवड असून पारमार्थिक विषयावर त्यांनीं बरेंच लिखाण केलेलें आहे. विनोबांच्या भूदान चळवळीवर त्यांची श्रद्धा आहे.

## दिवाण पी. बाबुराव

कै. पांडुरंग बाबुराव वालावलकर यांचें शिक्षण बी. ए., एल्एल्. बी. पर्यंत झालें होतें. हे प्रथम रतलाम संस्थानांत न्यायाधीश व पुढें दिवाण होते. त्यांना सरकारकडून केसर-इ-हिंद हें पदक मिळालें होतें. इंदूर संस्थानचे ते प्रधान होते. पुढें कांहीं वर्षें सावंतवाडी संस्थानचेहि ते दिवाण होते. रसायनशास्त्र व फोटोग्राफी यांच्या संशोधनासाठीं त्यांनीं स्वतःची लॅबोरेटरी ठेवली होती. त्यांचे तिन्ही मुलगे सुविद्य आहेत.

## डॉ. नरसिंह सीताराम देसाई

मालवण येथें डॉ. काका देसाई ह्या नांवानें ते प्रसिद्ध आहेत. ते एम्. बी. बी. एस्. असून सामाजिक कार्यांत प्रामुख्यानें भाग घेतात.

## डॉ. सदानंद केशवराव गाळवणकर

वसई येथें एक लोकप्रिय डॉक्टर म्हणून त्यांची ख्याति आहे. यांची जनसेवा पाहून १९३६ सालीं सरकारनें त्यांना कैसर-इ-हिंद हें पदक बहाल केलें. १९३६ मध्यें मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिनेटवर त्यांची निवड झाली. तेथें ते फॅकल्टी ऑफ् मेडिसीनचे सहा वर्षें सभासद होते. हल्लीं वसई येथें राहून ते आपलें जनसेवेचें कार्य करीत आहेत.

## कै. रा. सा. यशवंत जनार्दन गाळवणकर

हे मुंबईच्या ( सेक्रेटरीएट ) होम डिपार्टमेंटमध्यें सुपरिटेंडेंट होते. १९४० सालीं ते सेवानिवृत्त झाले. त्यांना त्यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल रावसाहेब ही पदवी सरकारनें बहाल केली. ते १९४५ मध्यें निवर्तले.

## श्री. पुरुषोत्तम जनार्दन गाळवणकर

यांचें घराणें अर्नाळा येथें स्थाईक होऊन सुमारें सवाशें वर्षें झालीं. या भागांत हें घराणें दातृत्व व समाजकार्य यांत अग्रेसर आहे. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहांत त्यांना कारावासाची शिक्षा झाली होती. १९२३

ते ३६ सालापर्यंत ते ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचे लोकनियुक्त सभासद होते. १९४६ मध्यें ते गौडब्राह्मण सभा मुंबई या संस्थेच्या उपाध्यक्षपदीं निवडून आले. त्यांचे थोरले चिरंजीव रिझर्व्ह् बँकेंत गॅझेटेड ऑफिसर आहेत. दुसरे डॉक्टर असून तिसरे केमिकलचा बिझिनेस करतात. चौथे अकौंटंट जनरल ऑफिसांत आहेत, आणि पांचवे सैन्यांत अधिकारी आहेत.

## श्री. दत्तात्रय पुरुषोत्तम गाळवणकर

बोर्डी येथील सूनाबाई हायस्कूलमधून मॅट्रिक व १९३८ मध्यें एलफीन्स्टन कॉलेजमधून इकॉनॉमिक्स विषय घेऊन बी. ए. झाले. आंतर-महाविद्यालयीन बॅडमिन्टन टुर्नामेंट्स मध्यें त्यांनीं एल्फिन्स्टन कॉलेजचें प्रतिनिधित्व केलें. एक वर्ष मुंबई युनिव्हर्सिटीचे, बॅडमिंटन टुर्नामेंट्स् डबल-मध्यें ते चँपियन होते.

१९३९ मध्यें रिझर्व्ह् बँक ऑफ् इंडिया मध्यें तें नोकरीस लागले. बँकिंगचा डिप्लोमा मिळविल्यावर चार वर्षे ते सुपरिंटेन्डटच्या हुद्यावर होते. नंतर डिपार्टमेंट ऑफ् बँकिंग ऑपरेशन्समध्यें गॅझेटेड ऑफिसर म्हणून त्यांची बढती झाली. रिझर्व्ह् बँकेतर्फे दुसऱ्या बँकस् तपासणी कामानिमित्त त्यांनीं हिंदुस्थानांत पुष्कळ प्रवास केला आहे. ते धार्मिक वृत्तीचे व दयाळू अंतः-करणाचे गृहस्थ आहेत.

## श्री. नरसिंह पुरुषोत्तम गाळवणकर

उत्तम खेळाडू व हुपार विद्यार्थी म्हणून बोर्डी हायस्कूलमध्यें त्यांना ओळखले जाई. एलफिन्स्टन व जी. एस. मेडीकल कॉलेजमध्यें त्यांनीं उच्च शिक्षण घेतलें. बॅडमिंटन, टेनीस, टेबलटेनीस ह्या खेळांच्या आंतरमहा-विद्यालयीन स्पर्धामध्यें त्यांनीं स्वतःच्या कॉलेजचें प्रतिनिधित्व केलें आणि प्राविण्य पदकें मिळविलीं.

१९४४ मध्यें एम्. बी. बी. एस्. झाल्यावर सुप्रसिद्ध सर्जन डॉ. बालीगा ह्यांच्या हाताखालीं के. इ. एम. हॉस्पिटलमध्यें हाऊस सर्जन म्हणून दोन वर्षे काम केलें. मुंबईच्या सुखासीन जीवनाकडे पाठ फिरवून त्यांनीं 'अर्नाळा'

येथें दवाखाना सुरू केला. एक निष्णात डॉक्टर म्हणून ह्या भागांत ते प्रसिद्ध आहेत. ते वसई तालुक्यांतील शैक्षणिक, सामाजिक व क्रीडाक्षेत्रामध्यें प्रामुख्यानें भाग घेतात.

## श्री. जगन्नाथ पुरुषोत्तम गाळवणकर

ठाणें जिल्ह्यांत पालघर येथें 'कमल फार्मसी आणि प्रोव्हिजन स्टोअर्स' ह्या नांवाची ह्यांची फर्म नांवाजलेली आहे. श्री. जगन्नाथपंत हे उत्तम क्रिकेटपटु असून ते क्रिकेट टुर्नामेंटस्‌मध्यें भाग घेत असतात.

## श्री. राजाराम पुरुषोत्तम गाळवणकर

हे दादरच्या किंग जॉर्ज हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर एल्फिन्स्टन कॉलेजमधून बी. एस्.सी. झाले. गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया ऑडिट् डिपार्टमेंटच्या अकाउन्टंट जनरल ऑफिस (मुंबई) मध्यें नोकरीस आहेत. उत्तम क्रिकेटपटु म्हणून इंग्लिश नियतकालिकांनीं त्यांचा गौरव केलेला आहे. हे धार्मिक वृत्तीचे गृहस्थ आहेत.


## श्री. जगदीश पुरुषोत्तम गाळवणकर, सेकंड लेफ्टनंट

विल्सन कॉलेजमधून १९५५ मध्यें बी.ए. झाले. उत्तम खेळाडू व आदर्श विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक आहे. १९५४ मध्यें वसतिगृहाच्या तीनशें विद्यार्थ्यांत 'उत्तम विद्यार्थी' म्हणून त्यांची निवड झाली होती. उत्तम शरीरयष्टी व आकर्षक व्यक्तिमत्त्व ह्यामुळें ते थोडयाच कालावधींत पुढें आले. २६ जानेवारी १९५३ मध्यें, दिल्ली येथें होणाऱ्या परेडमध्यें भाग घेण्यासाठीं मुंबई शहरांतील सर्व कॅडेट्स्‌मधून त्यांची निवड झाली होती. डेहराडून येथील नॅशनल डिफेन्स ॲकाडमीमध्यें शिक्षण झाल्यावर १९५६ मध्यें त्यांना आर्मीमध्ये कमिशन देण्यांत आलें. हल्लीं मद्रास रेजिमेंट (इन्फंट्री-ब्रँच) मध्यें सेकंड लेफ्टनंट आहेत.

## कॅप्टन भालचंद्र पांडुरंग वालावलकर

दिवाण पी. बाबुराव यांचे हे चिरंजीव. हे सॅण्डहर्स्टचें उच्च लष्करी शिक्षण घेतल्यावर ब्रिटिश अमदानींत कॅप्टन होते. हल्लीं कलकत्ता येथें भारत सरकारच्या नोकरींत मोठे लष्करी अधिकारी आहेत. वालावलींतील करमळीकर प्रभु देसाई घराण्यापैकीं यांचें घराणें आहे

## श्री. सीताराम गोविंद वालावलकर बी. ए.



श्री. सीतारामपंत यांचा जन्म वालावल येथें ६ मे १९०८ मध्यें झाला. त्यांचें बालपण मुंबईत मावशीकडे गेलें. ते १९२९ मध्यें विल्सन कॉलेजमधून बी. ए. झाले, १९३० मध्यें मुंबई सेक्रेटरीएटमध्यें नोकरीस राहिले '१९४६ पासून मुंबईसरकारचे ते असि. सेक्रेटरी होते. हल्लीं ॲग्रिकल्चर अँड फॉरेस्ट डिपार्टमेंटचे ते अंडर सेक्रेटरी म्हणून काम पहात आहेत. नूतन मराठा हितवर्धक ह्या ज्ञातिसंस्थेंत त्यांनीं सुमारें बारा वर्षे कार्य केलें. वालावल गांवच्या उन्नतीसाठीं १९५३ मध्यें त्यांनीं 'वालावल ग्रामस्थ संघ' स्थापन केला. ह्या संस्थेचे ते १९५६ पर्यंत अध्यक्ष होते. ह्या संस्थेमार्फत त्यांनीं मुंबईत रहाणाऱ्या वालावल ग्रामस्थांना एकत्र आणून गांवाच्या उत्कर्षास चांगलाच हातभार लावला आहे. त्यांचे चिरंजीव श्री. वासुदेवराव हे बर्माशेलमध्यें नोकरी करतात. प्रस्तुत ग्रंथप्रकाशनाच्या कामीं सीतारामपंतांनीं दिलेलें सहकार्य मोलातीत आहे.

## श्री. वासुदेव सीताराम वालावलकर



श्री. सीतारामपंतांचे हे चिरंजीव. त्यांचा जन्म १९३१ मध्यें वालावल येथें झाला. त्यांचें बालपण व शिक्षण मुंबईत झालें. १९४७ मध्यें मॅट्रिक झाल्यावर पुढें ते कॉलेजमध्यें दाखल झाले. पदवी परीक्षेपर्यंत न जातां अर्ध्यावरूनच ते चित्रकलेकडे वळले. ड्रॉइंग व पेंटिंगचा डिप्लोमा घेतल्यावर आर्किटेक्चरचा कोर्स पुरा करण्यासाठीं ते १९५४ मध्यें लंडनला गेले. परंतु आजारी पडल्या-

मुळें त्यांना १९५६ मध्यें स्वदेशी परतावें लागलें. हल्लीं ते बर्माशेलमध्यें इंजिनिअरिंग डिपार्टमेंटमध्यें नोकरी करीत असून आर्किटेक्चरच्या परिक्षेस आर. आय्. बी. ए. बोर्डामार्फत बसणार आहेत.

## श्री. अनंत शांताराम वालावलकर

श्री. अनंतराव हे आज बॉंबे टेलिफोन कंपनींत असि. इंजिनियरच्या हुद्यावर आहेत. त्यांचा जन्म ७।३।१९१९ मध्यें पालघर येथें झाला. मनोरकर ह्या नांवानें हें घराणें पालघर येथें ओळखलें जातें. ह्या घराण्याचें गोत्र वत्स असून मूळ गांव वालावल (जि. रत्नागिरी). ते क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनीस, हुतूतु, हॉलिबॉल इत्यादि खेळांत प्रवीण असून त्यांनीं अनेक प्राविण्यदर्शक पदकें मिळविलीं आहेत. १९४० मध्यें व्ही. जे. टी. आय्. मधून ते एल्. एम्. ई. होऊन १९४५ पासून टेलिफोन कंपनींत नोकरीस राहिले.

## श्री. रामचंद्र महादेव वालावलकर

नटश्रेष्ठ श्री. महादेवराव वालावलकर यांचे हे द्वितीय चिरंजीव. यांचा जन्म ३१ मार्च १९२६ मध्यें सावंतवाडी येथें झाला. सावंतवाडी हायस्कूलमधून मॅट्रिक. वेळगांवच्या लिंगराज कॉलेजमधून अर्थशास्त्र हा विषय घेऊन बी. ए. (ऑनर्स) झाले. पुढें मुंबईच्या पोद्दार कॉलेजमधून १९४९ मध्यें बॅंकिंग घेऊन बी. कॉम. झाले. हल्लीं मुंबईंत सेल्सटॅक्स इन्स्पेक्टर म्हणून काम पहातात.

### पालघर येथील ‘ मनोरकर ’ घराणें

## श्री. बाळकृष्ण पांडुरंग वालावलकर

हे बी. बी. सी. आय्. लाईनवर गजदुरी (लाकडांची मोजणी) करीत. बाळा गज्दूरकर म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांचे चिरंजीव शांतारामपंत हे सुरवातीस जंगलचे कॉन्ट्रॅक्टर होते. नंतर १९३० मध्यें ते विरक्त झाल्यामुळें धंदा बंद केला. ते उत्तम फोटोग्राफर व प्रेस रिप्रेझेन्टेटिव्ह म्हणून नांवाजले.

## श्री. पांडुरंग बाबूराव वालावलकर

हे हल्लीं अर्नाळा येथें आहेत. त्यांनीं आपलें सर्व आयुष्य विद्यादानांत घालविले. त्यांनीं वालावल येथें पहिली ग्रामपंचायत स्थापन केली. त्यांचा सुशील स्वभावाचा मुलगा डॉ. मधुकर अकालीं वारला. गावांत तो लोकप्रिय होता.

## कै. डॉ. बाबुलनाथ गंगाराम वालावलकर

हे ग्रेट रॉयल सर्कसचे मालक श्री. सीतारामपंत यांचे द्वितीय बंधु. उत्तम आयुर्वेदिक डॉक्टर आणि परोपकारी गृहस्थ म्हणून त्यांचा लौकिक आहे. ते अकालीं कालवश झाले.

## कै. विनायक गंगाराम वालावलकर

लोकांच्या नेहमीं उपयोगी पडणारे आणि कोणत्याहि बिकट प्रसंगीं धाऊन जाणारे हे गृहस्थ होते. श्री. सीतारामपंतांचे हे धाकटे बंधु. ते ऐन तारुण्यांत वारले. त्यांची आठवण लोकांना आजहि आहे.

## श्री. काशिनाथ नारायण आजगांवकर

वालावलीच्या दक्षिण भागांत ह्यांनीं केलेलें शैक्षणिक कार्य अमर आहे. बांधकोंड येथील पूर्ण प्राथमिक शाळेचे हे पहिले शिक्षक व संस्थापक. यांनीं मासिक दोन रुपये वेतनावर काम करून शाळेला चांगले दिवस आणले.

## श्री. हरि विष्णु वालावलकर

प्राथमिक शिक्षक म्हणून यांनीं लौकिक मिळविला आहे.

## श्री. विश्राम विष्णु वालावलकर

हे आज ठाणा येथें कलेक्टरचे चिटणीस आहेत. कांहीं काल कुडाळ येथें महालकरी होते. सांगली येथें मामलेदार म्हणून त्यांनीं काम केलें आहे. यांचें इंग्रजी शिक्षण कुडाळ हायस्कूलमधून झालें.

## कै. लक्ष्मण रामचंद्र देसाई

आजगांवचे प्रसिद्ध जमीनदार व देवभक्त कै. अंबाजी नाना यांचे हे ज्येष्ठ जामात. अंबाजी नानानीं ह्या गरीब पण होतकरू मुलास आपली मुलगी दिली. त्यांना मळेवाडच्या जकातीवर नोकरीस ठेवलें व इतर मदत वेळोवेळीं केली. पुढें उदयास आलेले प्रसिद्ध दानशूर गृहस्थ कै. तुकाराम लक्ष्मण देसाई यांचे हे वडील.

## कै भिकाजी लक्ष्मण देसाई

जन्म १८७१ मृत्यू १९१७.

घरची अत्यंत गरिबी असल्यामुळें हे १८८२ सालीं लहान वयांत

मुंबईस आले. मुंबईंतील एका प्रख्यात मारवाड्याकडे त्यांनीं नोकरी केली. त्यांनीं आपल्या मागाहून आपल्या सर्व बंधूस नोकरीस आणलें

## कै. रामचंद्र लक्ष्मण देसाई

(जन्म १८८३ मृत्यू. १४ जा. १९३७)

कै. रामचंद्र ऊर्फ दादा बांदकोंडकर ह्या नांवानें हे गावांत प्रसिद्ध होते. ही व्यक्ति गांवांत गोर गरिबांच्या फार उपयोगी पडली. यांनींच प्रथम आपल्या घरांत मराठी शाळा सुरू केली.

## कै. विष्णु जगन्नाथ देसाई

काका मेथाजी ह्या नांवानें हे प्रसिद्ध होते. कै रा. ब. अनंत शिवाजी यांचे हे उजवे हात. त्यांच्या मागाहून ते कांहीं वर्षे टोपीवाला घराण्याचे सल्लागार होते. लोहार चाळींत त्यांचें पिक्चरचें दुकान होतें. त्यांचे चिरंजीव नरसिह विष्णू देसाई हे मुंबईंत नोकरीधंदा करतात.

## कै. सहदेव भाऊ दारवळकर

मालवण येथील प्रसिद्ध पेढीवाले वाघ यांच्याकडे हे आयुष्यभर नोकरीस होते. वाघ घराण्याचा नांवलौकिक वाढविण्यास यांचे श्रम कारणीभूत आहेत.

## श्री. विनायक लक्ष्मण देसाई

प्रसिद्ध व्यापारी कै. तुकाराम लक्ष्मण देसाई यांचे हे बंधु होत. यांचें शिक्षण जुन्या काळीं मॅट्रिकपर्यंत झालें. कांहीं काल ते पोष्टांत होते. नंतर ते बहारेन येथें गेले व तेथेंच त्यांनी एस. नारायण आणि कंपनी ह्या नांवाचें दुकान खोललें. १९४२ सालीं महायुद्धाच्या धामधुमींत ते स्वदेशी आले. त्यांचे सर्व मुलगे सुविद्य असून श्री. नारायण व रमाकांत बहारेन येथें नोकरी करतात.

## श्री. तुकाराम सहदेव देसाई

वालावल गांवांतील एक प्रमुख सार्वजनिक कार्यकर्ते. देवस्थानचे कमिटीदार, सहकारी सोसायटीचे सरपंच, आणि गांवांतील विविध संस्थांचे एक आधारस्तंभ ह्या नात्यानें गेलीं वीस वर्षे त्यांनीं गांवाची विविध प्रकारें सेवा केलेली आहे. श्रीदेव नारायण देवस्थानकडील सर्व कामें त्यांच्या देख-

रेखीखालीं चालतात. त्यांचे वडील कै. सहदेव रामचंद्र देसाई हे मालवणचे सुप्रसिद्ध व्यापारी वासुदेवराव वाघ यांचे पेढीवर मुख्य मुनीम होते.

## श्री. लक्ष्मण भिकाजी देसाई

सुप्रसिद्ध कै. तु. ल. देसाई यांचे हे पुतणे. यांचें इंग्रजी शिक्षण मॅट्रिक-पर्यंत झालें. त्यांनीं भारतांतील धार्मिक क्षेत्रांचा प्रवास केलेला असून अध्यात्मिक क्षेत्रांत त्यांचें स्थान उच्च दर्जाचें आहे. लहानपणापासून ईश्वरभक्ति व भगवदभजन ह्या गोष्टीकडे त्यांचा ओढा आहे. कांहीं काल ते तु. ल. देसाई फर्मचे भागीदार होते. हल्लीं त्यांचें वास्तव्य कुडाळ येथें असून तेथें त्यांनीं शिवानंदाश्रम स्थापन केला आहे. साध्या, सरळ व निर्भीड स्वभावामुळें ते लोकप्रिय झाले आहेत.

## श्री. नारायण शांताराम वालावलकर

यांचें वास्तव्य हल्लीं कोल्हापूर येथें आहे. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यावर ते नोकरीकडे वळले नाहींत. ते आर्यसमाजांत काम करूं लागले. तेथें त्यांनीं संस्कृत व हिंदी भाषांत प्राविण्य मिळविलें. हल्लीं ते तेथें मोठ्या अधिकारावर आहेत. ते संस्कृतचे पंडित आहेत.

## श्री. बळवंत गोपाळ वालावलकर

यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण मांगल्याचा मठ वेंगुर्ला येथें झाल्यावर ते मुंबईंत जनरल पोष्टांत नोकरीस राहिले. आस्थेवाईक समाजसेवक व व्यवस्थित हिशेब लेखक असल्यामुळें त्यांचा ज्ञातिसंस्थेला व इतर समाज-बंधूंना फार उपयोग झाला.त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. मनोहर हे एम्‌एस्. सी. झाले असून हाफ्‌किन् इन्स्टिटयूटमध्यें रिसर्च ऑफिसर म्हणून काम करतात

## कै. अनन्त गोविंद सामंत ( हरदास घराणें )

वालावल हुमरमाळा पडोस येथें 'हरदास' ह्या आडनांवानें क. सामंत यांचें घराणें ओळखलें जातें. कै. विठ्ठल गोविंद व अनंत गोविंद हे कीर्तनाचा व्यवसाय करीत. कै. अनंत गोविंद यांस दोन मुलगे. थोरले श्रीकृष्ण अनंत सामंत हे मुंबईस नोकरी व स्वतंत्र धंदा करतात. दुसरे विनायक अनंत हे गांवीं श्रीदेव रामेश्वराची कीर्तनी नोकरी व कारपेंटरी करितात. ह्या भागांत विनायक हरदास ह्या नांवानें ते सर्वांच्या परि-चयाचे आहेत. त्यांनीं आपल्या पडोस वाडींतील रस्ता, साकव, व पूल हीं

कामें पुढाकार घेऊन मेहनतीनें पुरीं केलीं. ते उत्तम मॅकॅनिक्स व स्वतंत्र वृत्तीचे कल्पक आहेत. त्यांचा थोरला मुलगा चि. प्रभाकर हा मुंबईस इलेक्ट्रिक वायरमन् म्हणून स्वतंत्रपणें काम करतो.

### श्री. रामकृष्ण पांडुरंग वालावलकर

दावणगिरी भागांत हे एक प्रख्यात पेढीवाले म्हणून ओळखले जातात

### श्री. पुरुषोत्तम विश्राम वालावलकर बन्धू

श्री. पुरुषोत्तम विश्राम वालावलकर बंधु हे म्हापसें येथें प्रथम मोटर ड्रायव्हर सारखी नोकरी पत्करून स्वतःच्या कर्तबगारीवर चांगले पुढें आले. गावांत त्यांनीं प्रा. शिक्षण देणारी एक शाळा सुतारवाडा येथें बांधली आहे

### श्री. दाजीसाहेब राजीवडेकर

हे सखाराम अण्णांचे पुत्र असून फार गरिबींतून पुढें येत आहेत. ते मुंबईंत बनामहॉल लेनमध्यें अलायन्स आर्ट प्रिंटिंग प्रेस चालवीत आहेत.

### श्री. गो. आ. नागोळकर

ही गावांतील एक लोकप्रिय अशी व्यक्ति आहे. यांचें स्टेशनरीचें एक लहानसें दुकान आहे. ग्रामपंचायतीचे हे उपसरपंच आहेत.

### श्री. संभाजी कृष्णा म्हापणकर

हे परकर वाडींत रहाणारे गृहस्थ असून त्यांनीं मुंबईंतील लोकांची एक संस्था काढून आपल्या वाडीच्या उत्कर्षासाठीं झटत आहेत.

### कै. दत्तात्रय बुवाजी देसाई

हे मुंबईत प्रसिद्ध टोप्यांचे व्यापारी म्हणून ओळखले जात. हे ईश्वर भक्त गृहस्थ होते.

### श्री. आत्माराम अनंत देसाई

हे हुमरमळेकर देसाई घराण्यांतील असून अत्यंत गरिब स्थितींतून एक मोठे कॉन्ट्रॅक्टर बनले. कर्नाटकांत हे आपल्या गोड स्वभावानें मान-मान्यतेस पोहोंचले आहेत.

### श्री. चंद्रकांत बळवंत देसाई


हे तरुण गृहस्थ चांगले कलाकार असून आपल्या गांवांत कळकळीनें व सहकार्यानें कांहीं तरी भरीव कार्य करणारे गृहस्थ आहेत.

## श्री. विनायक विश्राम गाळवणकर

हे बापू गाळवणकर म्हणून ओळखले जातात. गांवांतील लोकांशीं अत्यंत स्नेहानें वागून सार्वजनिक कार्य करण्याची त्यांची वृत्ति स्पृहणीय आहे.

## श्री. विष्णु चंद्रोजी वालावलकर

हे गृहस्थ वालावल येथें विद्यमान आहेत. त्यांनीं आपल्या मुलांना शिक्षण देऊन पुढें आणलें. त्यांची पत्नी सत्यभामा ही सालस व प्रेमळ स्त्री





होती. त्यांना मुलगे पांच. थोरला केशव गांवीं आहे. दुसरे विश्राम हे मामलेदार आहेत. तिसरे हरी हे प्राथमिक शिक्षक आहेत. चौथे पांडुरंग यांचें मुंबई येथें टेलरिंग दुकान आहे. पांचवे महादेव विविध वृत्त कचेरींत आहेत.

## श्री. अनंत केशव वालावलकर

यांचा जन्म १९३१ मध्यें वालावल येथें झाला. रत्नागिरीच्या पटवर्धन हायस्कूलमधून १९४९ मध्यें मॅट्रिक झाले. ते बलवंत व विचार ह्या पत्रांतून स्फुट लेखन करतात. ते दक्षिण रत्नागिरी सेवालदलाचे कार्यकर्ते आहेत.

## श्री. दत्तात्रय लक्ष्मण वालावलकर

जन्म १९२२ मध्यें मुंबई येथें झाला. वसई येथील आर. पी. कॉलेज

मधून १९४२ मध्यें मॅट्रिक झाले. इंटरपर्यंत शिक्षण घेऊन पुढें वेस्ट कंपनींत नोकरीस राहिले. हल्लीं सिनियर असिस्टंट तिकीट अँड कॅश, ह्या हुद्यावर आहेत.

### श्री. आत्माराम विठ्ठल वालावलकर

यांचा जन्म वालावल येथें झाला. १९३९ मध्यें मॅट्रिक झाले. नंतर नॅशनल बँक ऑफ् इंडियामध्यें नोकरीस राहिले.

### कै. धोंडी कृष्णा वालावलकर

वालावल येथें मृदंग वाजविण्यांत व सुरेल गायनांत प्रसिद्ध होते. सध्यां त्यांचे नातु मुंबईस नोकरी धंद्यासाठीं आहेत.

### श्री. गजानन वासुदेव प्रभु

जन्म वालावल येथें झाला. प्राथमिक शिक्षण वालावल येथें. १९३६ मध्यें मॅट्रिक. नंतर कस्टममध्यें नोकरी करून १९५१ मध्यें खालसा कॉलेजमधून बी. ए. (ऑनर्स) झाले. सध्यां ते वालावल ग्रामस्थ संघाचे उपाध्यक्ष आहेत. यांचे बंधू नारायण, वासुदेव प्रभु हे वालावल येथें प्रसिद्ध व्यापारी गणले जातात.

### श्री. गजानन दत्तात्रय देसाई

यांचा जन्म १९१८ मध्यें वालावल येथें झाला. प्रा. शिक्षण गांवीं झाल्यावर ते मुंबईंत १९३३ मध्यें आले. दूध विकत घेऊन त्याची किरकोळ विक्री करण्यास सुरवात केली. आपल्या दीर्घोद्योगानें आणि मनमिळाऊ स्वभावामुळें त्यांनीं दुधाची स्वतंत्र डेरी उभारली असून त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या सुमारें ७५ म्हशी आहेत. दूधवाले देसाई म्हणून गोरेगांव येथें ते ओळखले जातात.

### श्री. वसंत तुकाराम देसाई

जन्म ९ डिसेंबर १९२७ मध्यें वालावल येथें. मुंबई नगरपालिकेंत प्यूनच्या जागेवर नोकरी करून सॅनिटरी इन्स्पेक्टरचा अभ्यासक्रम पुरा केला. हल्लीं सॅनिटरी इन्स्पेक्टर म्हणून काम पहातात.

### श्री. दिगंबर रामचंद्र देसाई

जन्म १५ एप्रिल १९१९त वालावल येथें. प्रा. शिक्षण वालावल येथें.

पुढें इंग्रजी शिक्षण मुंबईत. १९३६ मध्यें बहारीन पर्शियन गल्फमध्यें धंद्या साठीं. १९४१ मध्यें स्वदेशीं येऊन तुकाराम लक्ष्मण देसाई फर्ममध्यें नोकरीस. १९४६ मध्यें भारत अल्युमिनियम स्टोअर स्थापन केला. हल्लीं स्वतंत्रपणें व्यापार करतात.

## श्री. गजानन धोंडो वालावलकर

हे एक्साईज अँड प्रोहिबिशन डिपार्टमेंटमध्यें प्रथम रायटर म्हणून नोकरीस राहिले. हल्लीं ते हेड अकाउंटंट्च्या हुद्यावर आहेत. त्यांचे वडील धोंडोपंत हे समाजकार्यकर्ते आहेत.

## कै. बाबूकाका आरावकर

वालावल गांवांत कऱ्हाडे ब्राह्मणांत ही एक थोर मनाची उपकारी व्यक्ती होऊन गेली. ते उत्तम वैद्य होते. गोरगरिबांस फुकट औषधाबरोबर अन्नपाण्यासहि ते पैसे देत असत. कै. अनंत शिवाजी देसाई यांनीं ह्या व्यक्तीच्या वागणुकीवर खूष होऊन अन्नछत्र सुरू केलें व कै. बाबूकाकांनीं तें उत्तम रीतीनें चालविलें. ते उत्तम वैदिक होते.

## श्री. काकासाहेब आरावकर

गांवांतील विद्यमान वैदिकांत त्यांचा पहिला क्रमांक लागतो. ते उत्तम ज्योतिषी आहेत.

## श्री. बाळूकाका आरावकर

यांनीं करमळी येथें श्रीगणपतीचें देवस्थान स्थापन केलें.

## शेतकरी

गांवांत राहून शेतीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींपैकीं कांहीं नांवें पुढें दिलीं आहेत—

१. मुकुंद लक्ष्मण प्रभु; २. केशव रामचंद्र देसाई; ३ गणेश अनंत प्रभु; ४. सीताराम शिवा कोचरेकर, ५. धाकू भिकाजी राऊळ; ६. हरी गणेश चौधुरी; ७. नारायण गोविंद वालावलकर, ८ राघो राम परब; ९. पांडुरंग गोपाळ मांजरेकर; १०. कृष्णा लक्ष्मण हळदणकर; ११. रघु बाबाजी गुंजकर; १२. सोमा कृष्णा घाडी.

## श्री. केशव रामचंद्र देसाई

हे शेतकरी पेशाचे गृहस्थ बांधकोंड येथें रहातात. कोणत्याहि सार्वजनिक कार्याला त्यांची मदत असते. लोकांच्या उपयोगी पडणारी ही व्यक्ति आहे.

## श्री. कृष्णाजी नारायण देसाई

श्री. दादा गांवकर ह्या नांवानें ते ह्या भागांत प्रसिद्ध आहेत. ते उत्तम आयुर्वेदिक डॉक्टर आहेत. सार्वजनिक कार्याबद्दल त्यांना जिव्हाळा आहे.

## श्री. मोरेश्वर बाबुराव प्रभु

वालावल येथील हायस्कूलमधील हे एक विद्यार्थीप्रिय शिक्षक असून ते हिंदीचे चांगले शिक्षक आहेत.

## श्री. विश्राम नारायण वालावलकर

वालावल गांव म्हटला म्हणजे तेथें विश्रामची आठवण केलीच पाहिजे. मुंबईत त्यांचा टोप्यांचा कारखाना होता. एक चांगले कारागीर म्हणन त्यांची ख्याति आहे. हे एक निःस्वार्थी असे गृहस्थ असून ईश्वरभक्त म्हणून त्यांना लोक ओळखतात.

## श्री. द. सो. माडये

हे कराची येथें नॅशनल बँक ऑफ इंडियामध्यें नोकरीस होते. हल्लीं गांवीं असून तेथील सामाजिक कार्यांत तळमळीनें भाग घेतात.

## श्री. रंगोबा पुजारे

हे बाबुकाका आरावकर यांचे जामात. श्रीदेव नारायणाचे हे मुख्य पुजारी आहेत. यांनीं बांधलेल्या श्रीदेव नारायणाच्या अलंकारिक पूजा प्रेक्षणीय असतात. ते चांगले मूर्तिकार आहेत.

## व्यापारी

गांवांत व्यापार व्यवसाय करणाऱ्या कांहीं प्रमुख व्यक्तींचीं नांवें पुढीलप्रमाणें :—

१. हरी गोविंद मुणणकर
२. मनोहर भिकाजी वालावलकर

३. वसंत कृष्णाजी देसाई
४. गोपिनाथ आत्माराम नागूळकर
५. नारायण वासुदेव वालावलकर
६. दिनकर वासुदेव सामंत
७. गोविंद कृष्णा साळसकर
८. शामसुंदर वामन राजीवडेकर

## गवंडी

१. वासुदेव रामचंद्र गंवडे
२. केशव पुंडलिक गंवडे
३. बाबुराव विष्णु गंवडे

## श्री. नारायण अनंत पारसेकर

हे मुंबई नेव्हल डॉकयार्डमध्यें हल्लीं नोकरीस आहेत. घरच्या गरिबी-मुळें लहानपणीं शिक्षण घेतां आलें नाहीं. वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांना श्री. विनायक लक्ष्मण देसाई यांनीं मुंबईस आणून दुकानावर ठेवलें. कांहीं काल फिटर मध्यें काढून नंतर सध्यांच्या जागीं त्यांनीं प्रवेश मिळविला. हल्लीं वरील ठिकाणीं ते सुपरवायझर आहेत. त्यांना प्रभाकर नांवाचा एक मुलगा असून त्याचें शिक्षण चालू आहे.

---

23282 दि:
क्रमांक 234 नों: दि:

## श्रीदेव नारायण व इतर देवस्थानें यांजकडे नक्त नेमणुका-संम्बधानें दरसाल जमाखर्च व्हावयाचा त्याबद्दल माहिती--

रु. आ. पै

२१३०--२-० जमा रुपये

(८३९-१५-१०) इतलाग सदरांतून नेमणुका मिळतात त्याबद्दल

| | | |
|---|---|---|
| सुपरिटेंडेंट देवस्थान व सेरी यांच्या गुजारतीनें . . . . | | ४०३--८--७ |
| जमा होण्यासाठीं . . . . | २९६-११-११ | |
| वाजंत्री याजबद्दल . . . . | ८३-११--१ | |
| श्रीरामनवमीच्या उत्साहांतील दारूसामान | १२-१०--३ | |
| श्रीदेव घाडवस याजकडील नंदादीप | १०--७--४ | |
| | ४०३--८--७ | |
| कार्तिकमासीं तुलसीची लक्षपूजा लावणें गुजारत श्रीराम रामकृष्णभट कशाळकर | | १९-१३--० |
| कार्तिकमासीं महारुद्र करण्याबद्दल | | २४--१-- |
| श्रीदेव नारायणाकडे नंदादीप लावणें-- गुजारत रघुनाथ वामनभट पुजारे | | १०--७--४ |
| श्रीदेव नारायण यास नित्याप्रमाणें खिरापत ग॥ विश्वनाथ पांडुरंगभट पुजारे | | ४४--७--४ |
| श्रीदेव नारायण देवालयांत दररोज आठ सांजवाती लावणें | | २४--३--० |
| श्रीदेव नारायण याजकडे नित्य विष्णुसहस्र-नामपाठ ग॥ नारायण धोंडभट पित्रे | | ६५--६--२ |

श्रीदेव नारायण याजकडे रुद्रस्तोत्रपाठ गु॥
विष्णु माधव पित्रे ३७–१३––०
श्रीदेव नारायण व धाडवंस यास श्रावण मासांत
मंत्राभिषेक गु॥ वासुदेव दिनकरभट उपाध्ये ६–१०––०
श्रीदेव धाडवंस याचा नैवेद्य गु॥ लक्ष्मण धोंडो धाडी ३–१५––८
श्रीदेव नारायणास श्रावणमासीं महारुद्र
गु॥ रघुनाथ विष्णु साधले २५––८––०
जजिरे सिंधुदुर्गपैकीं गु॥ दामोदर गोपाळभट
पुजारे व पारपतदार १७५––२––५

८३९–१५–१०

(११६–११–०) ग्रामखर्च सदरांतून मिळतात ते

(४८––४–८) सुपरिंटेंडेंट देवस्थान शेरी यांच्या गुजारतीनें किरकोळ

आषाढी एकादशीस तेल ०––३––६
गोकुळाष्टमीच्या दिवशीं घुगऱ्या-बद्दल ०–१४–१०
कार्तिक शु॥ एकादशीस तेलाबद्दल ०–१४–१०
माघमासीं महाशिवरात्रीस घुगऱ्या-बद्दल ०–१४–१०

३––०––०

**श्रीदेवरामेश्वर यांजकडे**

दहींकाल्याबद्दल ४––५––९
बारमाही जागरास तेल ०–१३–११

५––३––८

**श्रीदेवी माउली हिजकडे**

गोंधळाबद्दल १–११–११
नवरात्रांत तेल ०–१३–११

२––९–१०

श्रीरामनवमीचे उत्साहाबद्दल  २९-१०--२
पाटगांवपैकीं मिळतात ते  ३-११--०
श्रीदेवी खनरबीईची जत्रा आश्विन
शु॥ ८ मी दिवशीं करणें व  २-१४--०
देसरुड करणें
आश्विन शु॥ नवमी दिवशीं महार- १--४--०
लोकांकडे देवणी करण्याबद्दल.

३७--७--२

४८-४-८

(६८-६--४) श्रीदेवनारायणाचे देवालयीं
दहीकाला करणें  ७--६--२
बारतीराबद्दल  ०-१३-११
श्रीचीं मोहरीं उजवणेंबद्दल  ०--७--०
मशाल धरणेंबद्दल  १-१३--८
जंजिरे सिंधुदुर्गपैकीं  ५७-१३--७
दामोदर गोपाळ पुजारीपारपतदार

६८--६--४

६८-६-४  ११६-११--०

८-१२-० वर्षासन हक्काबद्दल देवस्थान शेरी यांच्या गु॥
२-१२-० आजगांवपैकीं
६--०-० पाईलोटे व शेरी गहाणाबद्दल
३--०-० श्रीदेव धाडवंश याजकडे दरसाल सांजवात करण्या-
बद्दल गुजारत लक्ष्मण धाडी वगैरे यांजकडून
देवस् ठिकाणचे उत्पन्नांतून मिळतात ते

२०--८-०

१३६––९–४ जमिनीचे उपार्जनाबद्दल व मोतर्फा मिळून

३–१३–३ श्रीदेवनारायणाचे जाग्यांतील मोईतर्फा

१३१–१२–१ जमिनीचे खंडाबद्दल

०–१४–० ठिकाण देवस् याजबद्दल

१५––०–० ठिकाण राजिवडेबद्दल

३६––८–० ,, थवीबद्दल

१–१३–७ ,, [illegible]

८––९–९ ,, खाजणाची फाळी

०–१४–० ,, तळपाचे खाजणावरील

४–११–० ,, सतीचा कुणगा

०––८–० ,, तळपाकडील

०––२–० ,, खळनाथ कुणगा

२०–१५–९ ,, गोंघळ

१–१४–३ ,, डोबा

३––०–० ,, घळण

५––०–० ,, तळीकडील

०–१३–९ ,, देवळासमोरची जागा

३२––०–० ,, पडोस रामेश्वराच्या कीर्तनाचे

१३२–१२–१ चाकरीबद्दल हरिदास यास ठरवून दिले तें.

१३६––९–४

१६––५–१० किरकोळ उत्पन्न (वसूलप्रमाणें)

[ रु. २५ चा आंकडा आहे. ]

११३०––२–०

खाते वजा

१०८०–१२–१ दरसालीं खर्च

११६–१०—१ श्रीदेव नारायणाच्या ख़र्चासाठीं पारपतदार यांचे मार्फत होणारा खर्च जंजिरेपैकीं — २३३—०—०

नित्य अभिषेक करणें. गुजारत उपाध्ये — १५–१३–११

गंगाधर रामकृष्ण उपाध्ये ३--१५—८

विश्वनाथ पांडुरंग व बापू सदाशिव ३--१५—८

यशवंतभट रामकृष्णभट ३--१५—८

दिवाकर वामनभट ३--१४–११

१५–१३–११

श्रीस नित्य नैवेद्य करण्याबद्दल — ७१—४—३

रघुनाथ वामनभट ३५–१०–१

पुजारे

दामोदर गोपाळ १७–१३–१

बाळकृष्ण पुरुषोत्तम १७–१३–१

७१—४–३

श्रीस तुळसीमाळा समजी करण्याबद्दल नारायण रामचंद्र — २—२—०

श्रीस दररोज २४ तुळसीपत्रें गु॥ बाळकृष्ण पुरुषोत्तम पुजारे — ४—४—०

मंत्रपुष्प दररोज रघुनाथ वामन भट — ६—६—०

श्रीस नमस्कार व प्रदक्षिणा करण्याबद्दल रघुनाथ पांडुरंग व बापू सदाशिव उपाध्ये — ४—४—०

श्रीसंनिध अभीष्टचिंतनाबद्दल गु॥. सीताराम केशवभट कशाळीकर — ३—३—०

वैशाखमासीं वसंतपूजा गु॥ दामोदर गोपाळ — २—९—०

पुराणिक, दामोदर गंगाराम पुराणिक ३--३--०
हरिदास यांस कीर्तनाचे चाकरीबद्दल ३-१५--८
सीताराम अनंत
स्वर मंडळी २--२-०
काशिनाथ भागवत १-१३-८
३-१५-८
श्रीस धोतरजोडा २-१२--७
मृदंग वाजविणें ३-१५--८
हुद्दे रुमाल घालण्याबद्दल २--२--०
सिंग वाजविणें २--२--०
अबदागिराचे चाकरीबद्दल २--२--०
श्रींचीं उपकरणें घासणें २--२--०
करणेकरी २--२--०
मशालीचे चाकरीबद्दल २--२--०
श्रीकडे नंदादीप २०-१४-८
वतन पारपतदार दामोदर गोपाळ पुजारे ७५--८-३

१७५--२-५ इतलाख
५७-१३-७ ग्रामखर्च
२३३-०-०

इतलाख सदरांतून परभारें नेमणुका मिळून खर्च होतो तो. २५३--३--२
कार्तिकमासीं लक्ष तुळसीपूजा १९-१३-०
श्रीराम रामकृष्णभट कशाळीकर
कार्तिकमासीं महारुद्र करणें ब।। २४--१-४
श्रीकडे नंदादीप, रघुनाथ वामनभट पुजारे १०--७-४
श्रीदेव नारायणास नित्य एकादशणी ४४--७-४
विश्वनाथ पांडुरंगभट उपाध्ये
श्रीदेवालयीं नित्य आठ वाती २४--३-०

श्रीकडे नित्य विष्णुसहस्र नामावली ६५--६-२
पाठ गु॥ नारायण घोंड दीगे
श्रीकडे हरिहर स्तोत्राचा पाठ ३६-१३-०
गुजारत विष्णु महादेव दीगे
श्रीकडे श्रावण मासांत खर्च २८--०-०
पंचामृत अभिषेक २-८-०
महारुद्र करणें रघुनाथ २५-८-०
विष्णुभट साधले

२८-०-०

२५३--३-२

ग्रामखर्च सदरांतून परभारें मिळतात ... ९-१०-१०
कार्तिकमासीं दहिकाला करण्या ब॥ ७--६--२
मशाल धरण्या ब॥ १-१३--८
श्रींचीं मोहरीं उजळणें ०--७--०

९-१०-१०

सुपरिटेंडेंट देवस्थान यांच्या गुजारतीनें होणारा खर्च ५००-१२--१
श्रीरामनवमीचे उत्सवासंबधानें होणारा खर्च
[ १५५-१३-१० ]
नऊ दिवस पूजा लावणें ब॥ ०-१२--०
नऊ दिवस पूजा लावणें ब॥ १--०--०
नऊ दिवस समाराधना व जेवण . . ६--४--०
दररोज पांच ब्राह्मणांस दक्षिणा १२ आणे.
नऊ दिवस पुराण सांगणें १--८--०
रामजन्माबद्दल हरिदास यांस २--८--०
रामसहस्रनामाच्या जपाबद्दल ६--०--०
एक महिना गंधाची पूजाअर्चा ७--८--०
चैत्र शु॥ ११ दिवशीं पयअभिषेक २--९-१०
नऊ दिवस कीर्तन हरिदास यांस २५--०--०
नऊ दिवस नाच गायन ३२--०--०

| | |
|---|---|
| दारू सामान | ६——०——० |
| दशावतारी यांस दहिकाल्याबद्दल | ४——४——० |
| नऊ दिवस झांज वाजविणें | ०—१२——० |
| ,, ,, मशाल धरणेंस | १——०——० |
| ,, ,, भजन करणें | ०——८——० |
| ,, ,, हरकामी यांस | २——०——० |
| ... ... ... ... ... | १——८——० |
| झुंबर-हंड्या लावणें व॥ | १——०——० |
| रोषणाईस तेल वगैरे | १८——०——० |
| श्रीकडे नऊ दिवसांस कापूर | ०——४——० |
| किरकोळ खिळे, सुंभ | १——०——० |
| प्रसादासाठीं ५ रु. सुंठवडा ५ रु. नारळ | १०——०——० |
| अत्तर, उदबत्त्या | २——०——० |
| वाजेची सामराधना करण्याबद्दल | २०——०——० |
| श्रीकडे गायन करणेंबद्दल | २——८——० |
| | १५५—१३—१० |

तपशील

१२६——३——८ इतलाक प्रमाणें
२९—१०——२ ग्रामखर्च प्रमाणें

१५५—१३—१०

| | | |
|---|---|---|
| ग्रामखर्च जमवून प्रों. किरकोळ खर्च | | ३——०——० |
| आषाढी एकादशीस तेल | ०——३——६ | |
| श्रावणमासीं गोकुळअष्टमीस घुगऱ्या | ०—१४—१० | |
| कार्तिकमासीं महाएकादशीस जागरास तेल | ०—१४—१० | |
| माघमासीं महाशिवरात्रीस घुगऱ्या | ०—१४—१० | |
| | ३——०——० | |
| आश्विन शु० १५ ( कोजागिरी ) फराळ व दक्षणा ग्रामखर्चप्रमाणें | | ०——७——० |

| | | |
|---|---|---|
| श्रीत हुद्दे रुमाल घातल्या ब॥ | | १–१३–७ |
| ग्रामखर्च वर्षासन हक्कांप्रा ो. | १––२–१० | |
| इतलाकप्रमाणें | ०–१०––९ | |
| | १–१३––७ | |
| श्रीस गंधाकरतां बारमाही ग्रामखर्च प्रा ो. | | २––८–० |
| श्रीच्या अंगास लावण्याकरतां अत्तर | | ०–१३–० |
| श्रींच्या नित्यपूजेकडे पंचारत | | २––८–० |
| | ५–१३–० | |
| मार्गशीर्षमासीं जागरा ब॥ ग्रामखर्च प्रा ो. | | ३––२–७ |
| तेल सोमवार, एकादशी, अमावाशा पौर्णिमा व जागराचे बाकीचे दिवस | ०–८––९ | |
| हरिदास व पुराणिक यांस– | २–९–१० | |
| हरिदास १-४-११ व १-४-११ पुराणिक यास | | |
| | ३–२––७ | |
| वहिवाटदार कारकून याचे असलेले सुप. देवस्थान यांचे | | ८०––०–० |
| एस्टॅब्लिशमेंट पगार–– | ७२––०–० | |
| भत्ता–– | ८––०–० | |
| | ८०––०–० | |
| शेख अलि शेख इसाक तासेकरी यांस बारमाही पगार | | ४८––०–० |
| नगारजी सेख हमीद सेख उमर यास | | ६२––०–० |
| पगार | ५४––०–० | |
| नगाऱ्याची सांधणावळ | ५––०–० | |
| सरपण व बत्ती | ३––०–० | |
| | ६२––०–० | |

... राजकीय, ... ...
(८७) 23282 दि: ९.५.१९९१
क्रमांक 2328 नों: दि: ५।५।५६

| | | |
|---|---|---|
| वाजंत्री यांस बारमाही पगार इतलाक प्रा ी. | | ७८—०—० |
| जमिनीचे उत्पन्नाप्रमाणें | | ६२–१०–१ |
| निशाणदार यास | १—६—० | |
| श्रींच्या सभामंडपांत दोन सांजवाती पूर्व पश्चिम दरवाजांत लावणें | ६—०—० | |
| फाल्गुनमासीं शिमग्याचे मांडा ब॥ | १—०—० | |
| एकवट धर्मादाय खर्च अतिथि, शास्त्री, पुराणिक यांच्या संभावनेसाठीं | १५—०—० | |
| श्रींच्या फुलबागेचे सिंपणें, नवंबर महापर्यंत सात महिने | १४—०—० | |
| डागडुजी–शाकारणी वगैरे | ८—०—० | |
| श्रीच्या तलावाच्या कांठावर बारमाही दिवा | १२—०—० | |
| सर्व देवस्थानाकडील भांड्यास कल्हई दुरुस्ती | ५—०—० | |
| इनाय ठिकाण थवी यांचे भागेलीपण खंडास ठरवून दिल्यामुळें | ०—४—१ | |
| | ६२–१०–१ | ५००–१२–१ |

१४–८–० श्रीदेव रवळनाथ या देवासाठीं जमिनीचे उत्पन्नाप्रमाणें

| | |
|---|---|
| दरसाल आषाढमासीं पावणेर करणेबद्दल गोंधळ देवसूं ठिकाण चालत असे. आतां देवस्थान-कडून करावा लागतो. | १०—८—० |
| सांजवात बारमाही करण्यासाठीं | ३—०—० |
| देवालयाच्या शाकारणीबद्दल देऊळ व धर्मशाळा | १—८—० |
| | १४—८—० |

२१–९–० श्रीदेव घाडवंस या देवालयीं श्रावणमासांत पूजा व अभिषेक करणेंस

| | |
|---|---|
| इतलाक सदरांतून गुजारत वासुदेव दिनकरभट उपाध्ये | ४––२––० |
| नैवेद्य व चाकरी गु॥ लक्ष्मण धोंडो घाडी | ३–१५––८ |
| नंदादीपा ब॥ इतलाकप्रमाणें | १०––७––४ |
| सांजवात बारमाही लावणेंस परभारे घाडी यांजकडून खर्च होतात. | ३––०––० |
| | २१––९––० |

३७–३–८ श्रीदेव रामेश्वर या देवासाठीं

| | |
|---|---|
| वार्षिक दहींकाला करणें ग्रामखर्च प्रों. | ४––५––९ |
| बारमाही जागरास तेल | ०–१३–११ |
| हरिदास यांस कीर्तनाचे चाकरी–बद्दल ठिकाण पडोसें | ३२––०––० |
| | ३७––३––८ |

५–५–५ श्रीदेवी माउली हिजकडे

| | |
|---|---|
| दरसाल गोंधळ घालण्या ब॥ ग्रामखर्च प्रा।. | १–११–११ |
| नवरात्रांत तेल ग्रामखर्च प्रा।. | ०–१३–११ |
| जमिनीचे उत्पन्नाप्रमाणें सिंग व मृदंग वाजविणे ब॥ | २–११––७ |
| | ५–५–५ |

३–६–२ श्रीदेवी खनरबी या देवीसाठी

| | |
|---|---|
| आश्वियमासीं जत्रा व देसरूड करणेस | २–१४––० |
| देवळाचें छप्पर शाकारणीसाठीं | ०––८––० |
| | ३–६–० |

| | | | |
|---|---|---|---|
| बारतीराबद्दल | | | ०-१३-११ |
| आश्विन शु॥ ९ स म्हारदेवाकडे | | | |
| देवपण करण्यासाठीं | | | १--४--० |
| | | १०८०-१२-१ | |
| | शिल्लक | ४९--४-१ | |

एकूण अकराशें तीस रु. दोन पै ११३०--०-२

२६ जानेवारी सन १९०५

सदाशिव पांडुरंग ( क्लार्क ) Sd. / **A. B. Kanitkar**

सुपरिंटेंडेंट देवस्थान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
२३२४२ दि. २५.५.
२३७ ०१५१

[redacted]

REFBK 0010198

REFBK-0010198

१०१९८

# अभिप्राय

माझे तरुण स्नेही श्री. गुं. फ. आजगांवकर हे कवि आणि लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची नव्यानें ओळख करून देण्याची गरज नाहीं. चार वर्षांपूर्वी त्यांचें ' आजगांव–दर्शन ' हें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्याचा परिचय करून देतांना ' लेखकानें हाच उपक्रम चालू ठेऊन कोकणच्या इतर प्रसिद्ध अशा खेडयांची ओळख करून द्यावी ' असें मी लिहिलें होतें. आणि तें भाकीत आज खरें होत आहे याचा मला आनंद वाटतो. वालावल हा गांव दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यांत मोडतो. यांचें क्षेत्रफळ ३१८९ चौ. एकर आहे. मराठ्यांच्या वेळीं सावंतवाडीकरांचें मुख्य आरमारी ठाणें येथें होतें. येथून खालीं थेट पश्चिमेकडे कर्ली नदी वहात अरबी समुद्राला जाऊन मिळते. याच नदींतून सावंतवाडीकरांचें आरमार निघत असे व तें मराठ्यांच्या आरमाराशीं झुंज देत असे. त्या वेळीं विठोबाच्या पायथ्या-खालून नस्त असल्यामुळें मराठ्यांच्या ' सिंधुदुर्ग ' या आरमारी ठाण्यावर सरळ सरळ हल्ला करणें सोपें पडत असे. आज हा मार्ग अस्तित्वांत नाहीं; काळाच्या उदरांत तो गडप झाला आहे. पण अजूनही त्याचे अवशेष आढळतात. लेखकानें या माहितीचें संशोधन करणें जरूर होतें. अशा या ऐतिहासिक व भौगोलिक दृष्टचा महत्व असलेल्या वालावल गांवचा इतिहास पुस्तकरूपानें लिहिला जाणें अवश्य होतें. ती कामगिरी यशस्वी रीत्या पार पाडल्याबद्दल श्री. आजगांवकर यांना धन्यवाद !

श्रीदेव नारायण हें येथील पुरातन देवस्थान असून आजही त्याचा लौकिक कायम आहे. येथें रामनवमीला प्रचंड यात्रा भरते. कोकणांतील हें एक रमणीय असें स्थळ आहे. येथील बरीच मंडळी बाहेरगांवीं जाऊन नांवारूपाला आलेली आहे. आशियांतील सुप्रसिद्ध ' धि ग्रेट रॉयल सर्कस ' चे मालक श्री. वालावलकर बंधू हे येथलेच. अशा लहानथोर मंडळींचा थोडक्यात परिचयहि या पुस्तकांत करून देण्यांत आला आहे. ठिकठिकाणीं प्रसिद्ध अशा स्थळांचीं छायाचित्रें दिल्यामुळें पुस्तकाच्या सौंदर्यांत आगळीच भर पडली आहे. प्रत्येकानें हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें.

मुंबई.

**जि. शं. सरतांडेल**
संपादक ' दर्यावर्दी '